
मालवणी रंग
अनुजा कुलकर्णी

# मालवणी रंग

तीन दीर्घकथांचा संग्रह

## काळोख + भोवरे + *हिरणं*

लेखक – अरुण कुळकर्णी.

छापिल पुस्तक **किंमत -प्रिंट कॉपी रु. ३२०-००**

**डिजीटल कॉपी फ्री (eshaity.com)**

**प्रथम आवृत्ती १० एप्रिल २०२२**

ई साहित्य प्रतिष्ठान

मालवणी रंग (तीन दीर्घकथा)

लेखक : अरुण कुळकर्णी, बडोदे, गुजरात
**संपर्क व व्हॉटसएप क्रमांक 7359212211/7228884030**
**Email : arungk1940@gmail.com**

मुखपृष्ठ
सुहास जगताप, पुणे

*या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.*

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000.. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

डिजिटल प्रकाशन- २६ जानेवारी २०२२

ई-साहित्य प्रतिष्ठान (esahity.com)

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १० एप्रिल २०२२- रामनवमी शके १९४४

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# **अर्पण**

नानू,

गोप्या

बाबू

सीता, शामळी, सुंदरी,

सुशी आणि गुलाब

आणि

**आई, बाबा**

मला समृद्ध केल्याबद्दल या पात्रांनाच हे पुस्तक कृतज्ञतापुर्वक समर्पित.

**अरुण कुळकर्णी.**

# काळोख

चारी बाजूला अंधाराचं साम्राज्य. अमावास्येची काळोखी रात्र. आजूबाजूला अथांग पसरलेलं पाणी. दूरवर मिणमिणणारे बंदरातील दिवे. समुद्र संथ असूनही उसळणाऱ्या लाटा. त्या लाटांवर झोके घेणारा मासेमारीचा पडाव. क्षणात त्याचा पुढचा भाग आकाशाकडे तर क्षणात लाटेवरून उतरत समुद्राच्या पाण्याची खोली दाखवणारा.

नानू, गोप्या व बाबू कामात दंग. बाजूला टीनच्या बारदानातून बनवलेला ठाणवी सारखा घासलेटचा दिवा. त्याची ती ढणढणणारी, वाऱ्यावर हेलकावणारी मोठ्ठी ज्योत. ज्योतीच्या हेलकाव्यांबरोबर नाचणाऱ्या त्या तिघांच्या सावल्या. पडावाच्या केबीनवर भुतांसारख्या

नाचत, कधी लांबच लांब होत तर कधी एकदम ठेंगण्या होत. या सगळ्याला दूरवर किनाऱ्यावर फुटणाऱ्या लाटांच्या गाजेचं पार्श्व संगीत.

भयाण शांततेत नानू, गोप्या, बाबू जाळे समुद्रात टाकण्यात गर्क असलेले. बोलायला, आवाज करायला बंदी, मासे पळून लांब जातील ही भीती.

पडावातून करायच्या मासेमारीचा अनुभव घ्यायचा विचार केव्हा पासून होता. आज योग आला होता.

पण त्या काळोख्या भयाण वातावरणात पोचलो आणि माझं अक्षरश: धाबं दणाणलं होतं. ही शांतता, तो समुद्राचा अथांग आकार, लाटांचे हेलकावे, त्याच्यावरचे एका लहानशा पडावातले आम्ही चौघे. तीन कसलेले मासेमार खलाशी आणि मी बघ्या. बघ्याच, बावळटासारखा आजूबाजूला निरखत होतो. त्या हलत्या पडावात ते तिघे अगदी सहज इकडे तिकडे फिरत होते. काम करताना पडावभर हात सोडून सहज कुठेही जात होते. मी मात्र माझे कुल्ले पडावाच्या फळीवर दाबून दोन्ही हातानी ती फळी दोन्ही बाजूला घट्ट पकडली होती.

जरा उठलो तर जणू काही मी एकाद्या बॉलसारखा समुद्रात पडलो असतो. पोटात जाम मोठा गोळा आला होता.

"आजून कायच दिसणा नाय रे बाबू. जाळा टाकूया काय जावया दुसरीकडे?" नानूने बाबूला विचारलं आणि मी परत थरथरलो. आता हे इंजीन चालू करतील, जोरात पडाव पळवतील, समुद्राच्या लाटांवर पडाव

आपटत आणखी हिंदकाळून सोडेल. भीतीने जीव कंठात य़ेऊन बसणार. हे सगळे विचार सर्रकन मनात आले. समुद्राच्या वाऱ्याने आधीच एक थरथर अंगात येत होती. त्यात भीतीची थरथर भर घालीत होती आणि आता पडाव पळवायला लागले तर? विचारानेच गोट्या कपाळात गेल्या. भीतीचा काळोख मनात पसरला.

रात्रभर हे असेच मासे रापत इकडे तिकडे फिरणार होते. मनासारखे मासे मिळे पर्यंत थांबणार नव्हते. कदाचित पूरी रात्र समुद्रातच गेली असती तर माझं काय झालं असतं? एवढ्यात बाबू ओरडला, "नान्या! ता बग काय ता" सगळेच तिकडे बघू लागलो.

चांदी सारख्या चमकणाऱ्या माशांच्या थव्याने पाण्याबाहेर झेप घेतली होती. रात्रीच्या काळोखात मासे चमकतात हे पहिल्यांदाच पहात होतो. अनवधानाने मी पडावात केव्हा उभा झालो आणि माशांना पहायला पडावाच्या काठाकडे धाव घेतली मलाच समजले नाही.

आ वासून मी तो थवा पहात होतो. दोन तीन क्षणांत ते दृष्य पाण्यात गायब झाले न झाले तोच त्यांच्या उलट्या दिशेने दुसऱ्या थव्याने आकाशाकडे झेप घेतली. नान्याने व गोप्याने वल्ही काढली. बाबूने पडावाच्या मागच्या बाजूला जाऊन सुकाणूचा ताबा घेतला. आता ते पडाव वल्हवत नेत होते. एक पडाव पुढे नेण्यासाठी तीन लोक लागतात तर. हे नव्याने माहीत पडत होतं. म्हणूनच हे मासेमार एवढे एकोप्याने रहातात वाटतं.

हळू हळू होडी त्या थव्याच्या प्रदेशात आली आणि नानूने व्हलं पडावात घेतलं. त्याने जाळं हळू हळू समुद्रात सोडायला सुरवात केली. त्या मिट्ट काळोखात हे काम कसं करतात तेच समजत नव्हतं. गोप्या व्हलवत होता, बापू सुकाणू असं काही फिरवत होता की होडी त्या समुद्रात एक मोठा गोलाकार तयार करत होती. नानू पडावाची गती जाणून जाळं टाकायचा वेग ठरवत होता. जाळं अगदी मस्त गोल पडायला पाहिजे होतं. म्हणजे मोठा गोलाकार झाला असता. जेवढा गोल मोठा तेवढे जास्त मासे मिळण्याची शक्यता.

जाळयाच्या खालच्या बाजूला शिश्याचे गोळे लावलेले तर दुसऱ्या बाजूला प्लास्टीकचे बॉल्स. जाळे पाण्यात टाकत गेले की रुंदीच्या बाजूने उभे रहात असे. लांबीच्या वरच्या आणि खालच्या बाजूला भक्कम दोर ओवलेला असे. जाळे गोल फिरवून पाण्यात उभे झाले की हे दोर बापू किंवा नानू हळू हळू ओढू लागत. जाळयाच्या चारी बाजू एकत्र होऊ लागत व जाळयाची एक पिशवी तयार होई.

जाळयाच्या गोलात असलेले मासे या पिशवीत अडकून जात.

आत्ताही त्यांनी तसेच जाळे ओढायला सुरवात केली. मिट्ट काळोखात फक्त त्या ढणढणत्या ठाणवीच्या प्रकाशात तीन काळे कभिन्न मासेमार जोर लावून जाळे खेचत होते. मधेच बाबूच्या तोंडून आवाज येई "खेच" नाहीतर "ह्या" प्रत्येक आवाजा बरोबर जाळं एक दोन फूट वर खेचलं जाई.

दोरीला बहुतेक कांही खुणा केलेल्या असाव्यात जाळयाच्या चारी बाजू बंद होऊन पिशवी तयार झालेली समजली की ते थोडी विश्रांती घ्यायला थांबत. जाळयात अडकलेले मासे आता बाहेर जाणार नाहीत याची खात्री असे.

"काय रे बाबू जाळा वजनाक हा ना?" गोप्या विचारत होता.

"रांडेच्या थय बसून आमका ईचारतं? जाळा ओडूक इलं नाय तो?"

"अरे ह्यो इलंय बघ. दोघव बसा. मी एकटोच काडतय बगा जाळा."

आणि खरंच बलदंड गोप्या एकटाच जाळं खेचू लागला. "इतक्या काय जड नाय रे! काय गावतला देवाक ठावक"

जाळं आता पाण्यातून वर य़ेऊन पडावाच्या बाजूला टेकलेलं होतं. मी पडावाच्या काठावरून वाकून जाळयातले मासे पहायचा प्रयत्न केला.

त्या काळोखात चंदेरी साडी वाऱ्यावर हलावी तसा त्या फडफडणाऱ्या माशांचा भास झाला. काळोखाला न जुमानता आपल्या अस्तित्वाचं दर्शन ते अट्टाहासाने करत आहेत असं वाटलं.

"येवा रे! जाळा आत उचलून घेवक येवा."

जाळं पडावात खेचून जाळं उघडताच हे मासे फडफड करत पडावाच्या तळात पसरले. दोन तीन मोठ्या टोपल्या भरतील एवढे होते.

"तारल्यो नाय बांगडे हत रे! दोनचार पापलेटा दिसतं हत. चला वायच फुडे जावन जाळा टाकुया. पापलेटा गावतीत बघा" गोप्या घाई करत होता.

इंजीन सुरू झालं पण पडावाने घेतलेल्या गिरकीने वाऱ्याची जोरदार झुळूक आली. पडावातली ठाणवीची वात एकदा फरफरली व दुसऱ्या क्षणी विझून गेली आणि परत एकदा आम्ही त्या अथांग काळोखात झेप घेतली.

डोळ्यात बोट घातलं तरी काही दिसणार नाही अशा काळोखात बोट पुढे चालली होती. आता थोड्या अंतरावर एक आमच्या पडावाच्या सारखीच ठाणवी भगभगताना दिसू लागली. क्षणभर अधांतरी जळतेय असे वाटे. दुसऱ्या क्षणी लाटेआड दडून नाहीशी होई. त्याच बरोबर वाऱ्यावर डोले, थरथरे, कधी लहान तर कधी एकदम मोठी.

लाल भगव्या ज्योतीचा तो नाच चाललाय असंच वाटू लागे. ज्योत जशी जवळ येत गेली तसा तो नाच जास्तच लयदार वाटू लागला. जणू एखादी बेली डान्सर त्या काळोखाच्या पार्श्वभूमीवर आपली कला स्पॉटलाईट मधे सादर करतेय.

माझं असं स्वप्न रंजन चालू असतानाच. त्या तिघांकडे नजर वळवली आणि छातीत धस्स झालं. बोटीत पंचांचे तीन फेटे आणि नाडीच्या तीन चड्ड्या तरंगत होत्या. कोकणात भुताखेतांच्या गोष्टी ऐकलेला मी ते दृष्य पाहून थरथरू लागलो.

परत पडावाच्या फळीवर घट्ट बसलो. दोन्ही हातांनी फळी घट्ट पकडली.

खरंतर ते काळे कभिन्न मासेमार काळोखात मिसळून गेले होते. त्यांच्या चड्ड्या व डोक्याला गुंडाळलेले पंचे त्या अंधुकशा प्रकाशात

तरंगतायत असा भास होत होता. हळू हळू हे ध्यानात आलं. हे तर जिवंत देवचार होते. स्वत:च्या भित्रेपणाची लाज वाटली. फळीवरची पकड आपोआप ढिली झाली. छातीतली धडधड कमी झाली.

तेवढ्यात बाबूची हाळी आली "को रे तो?"

"अरे तो देवडीचो भंडारी आसतलो. गाववालोच रे. पण आधी तो दिवो लाव. नायतर तो आपटात पडावार."

बाबूने ठाणवी लावली खरी पण भोवतालचा काळोख काही कमी झाला नाही. आता परत ते तिन्ही देवचार स्पष्ट दिसू लागले आणि जीव थारावला.

जसा जसा पडाव पुढे जात होता तसे तसे त्या ज्योतींचे ठिपके त्या पाण्यावर नाचताना दिसू लागले. पण फक्त त्या ज्योती दिसत होत्या. आजूबाजूला बोटी वाढल्या होत्या. तरीही त्यांचा प्रकाश एवढा हळवा होता की काळोख भेदून जवळच्या कोणत्याही वस्तूला त्या प्रकाशीत करत नव्हत्या. ना त्यांच्या पडावाला की आतील मासेमारांना.

अनभिषिक्त राजासारखे काळोख की समुद्र आपलं साम्राज्य एकमेकांवर गाजवीत होते. त्यांचं एकमेकांशी द्वंद्व चालू असावं.

आता आमचा पडाव थांबला. नानू आणि गोप्या धावले. रिकामी केलेलं जाळं त्यांनी हळू हळू समुद्रात सोडायला सुरवात केली. आता इंजीन बंद करून बाबू सुकाणू कडे धावला. पडावाला तो गोलाकार फिरवणार होता. तो गोलाकारही असा की जाळ्याच्या लांबी एवढाच परीघ होईल.

चौथी पाचवी पासून भूमिती शिकताना व्यासावरून परीघ, त्रिज्या काढताना केलेल्या चुका आणि मास्तरांच्या खाल्लेल्या छड्या आठवल्या. हे तिघेही दुसरी, चौथी शिकून शाळा सोडलेले. आता त्या काळोखात जाळयाच्या लांबी एवढा परीघ असलेला बोटीचे वर्तुळ त्या समुद्राच्या पाण्यावर काढणार होते. एक सुंदर वर्तुळ बनवून काळोखाला, समुद्राला आणि भूमितीला तिघानाही हरवणार होते.

या तिघांचेही लहानपण, शाळा, मग समुद्रावर जाणं सगळं माझ्या डोळया समोर आलं. लहानपणच कशाला जवळ जवळ आत्ता पर्यंतच्या त्यांच्या अशिक्षित व माझ्या उच्च शिक्षित आयुष्याची तुलना करणारा समुद्र तयार होऊ लागला.

नानू, गोप्या बाबू तिघेही शेजारी. मासे मात्र पकडायला एकत्र जात. काळोखात समुद्राशी झुंजत. मिळतील त्याचे तीन भाग करीत व सुखाने रहात. खूप मासे मिळाले काय की थोडे मिळाले काय यांचा आनंद कधी कमी होत नसे. सकाळी घरी आले की मासे बायकांच्या हाती देऊन. हे दोन कळशा डोक्यावर उलट्या करीत. एक नाडीची पट्ट्याची चड्डी चढवत व गावात फिरायला निघत. निघता निघता दोरीवरचा पंचा खस्सकन ओढून डोक्याला गुंडाळीत.

तिघेही एकमेकांना हाळी घालत एकत्र होत.

चड्डीचा रंग व टॉवेलचा रंग सोडला तर त्या उघड्याबंब शरीरावर जणूकाही काळोखाचा अंगरखा चढलेला. शाळीग्रामा सारखी तुळतुळीत अंगकांती होती तिघांचीही.

हे मस्त मजेत बाजारात फिरायला निघत. पस्तीशी चाळीशीकडे झुकलेले हे तिघे बाजारात फिरताना भेटेल त्याची थट्टा मस्करी करत हिंडत व मग हळूच एकाद्या झोपडीत शिरत.

जाताना दोन पायावर ताठ चालणारे बाहेर येताना धडपडत का? हे मला समजायला बरीच वर्षं लागली. सोरा हा नविन शब्द कुठल्याही पाठ्यपुस्तकात नव्हता त्याची ओळख आणि गुण माहीत झाले. आता तर वासावरून पण ओळखायला यायला लागलं होतं. घरी पोचताच त्यांच्या घरवाल्या भाताचा डोंगर आणि माशांचं "निस्त्याक" त्यांच्या पुढ्यात सरकवीत. स्वत: समोर बसत. तिघांच्याही घरात हाच प्रकार. मग घरवाली सांगे "काल माशाक भाव बरो ईलो. आयतवार (रविवार) होतो ना. आज भाव नाय. सोमवार न्हय वो." असंच बोलणं चाले. त्यांच्या बाया बोल घेवड्या. हे भात ओरपण्यात गुंग. जेवून होताच ते आडवे होत आणि क्षणात घोरू लागत. दोन वाजता झोपलेले चक्क रात्री आठ वाजता उठत. मग तयारीला लागत आता अमावास्येजवळच्या रात्री, लवकर जावे लागे. चंद्राच्या प्रकाशात मासे कमी मिळत. म्हणून यांचं वेळापत्रक दररोज बदले. पौर्णीमेला हे कितीतरी वेळा जायचंच टाळीत.

काळोख आवडीचा, गरजेमुळे, मासे जास्त मिळतात म्हणून. पण एकंदर वागणूक नजर लागण्यासारखी. स्वभावात, बोलण्यात की वागण्यात कुठेही काळोखी काळेपण नाही. पैशाने कफल्लक असले तरी वृत्ती अतिशय चोख. कुणाशी भांडण तंटा केल्याचे ठाऊक नाही.

मस्तराम होते. दोघांना एक मुलगा, एक मुलगी व नानूला दोन मुलगे. सर्वच समवयस्क. शाळेत जात पण प्रगती यथा तथा. आई बाप पण एवढं मनावर घेत नसत. रुपयांच्या नोटा आणि खुर्दा ओळखून हिशोब आला की मासेमारांच्या पोरांच्या शिक्षणाचा अंत व्हायचा. "ओगीच शाळेत जावन येळ कशाक फुकट घालवायचो. नंतर माशे ईकून पैशे मोजूक ईले की झाला पोरग्या लग्नाचा. चुकून शिकला तर शिकललो घोव (नवरा) खय गावतलो" हे मुलींच्या बाबतीतलं तत्वज्ञान.

तर "जाळा सांदुक (दुरूस्त) येवक लागला नी पडाव वलवूक नी वळवूक येवन माशे पागाक लागलो काय झील(मुलगा) तयार झालो. शिक्षाण काय देता?" हे मुलांच्या बाबतीतलं तत्वज्ञान.

अज्ञानाचा अंधार यांच्या आयुष्यात भरतोय हे यांना समजत कसं नाही हा सुशिक्षितांचा विचार. हे सुखी कसे होतील? हा प्रश्न. पण हे खरं होतं?

मी त्यांना जवळून पहात होतो. त्यांच्या आयुष्यात कसलाच अंधार दिसत नव्हता. अंधाऱ्या रात्री हे समुद्रावर तर त्या काळजी कवटाळून कूस परतत तळमळणाऱ्या. कदाचित या विरहामुळेच मिळालेला प्रत्येक क्षण ते छान जगत. कधी नवरा बायकोत खटका नाही की अबोलाही नाही.

नवऱ्याच्या पुढ्यात बसून त्याला प्रेमाने वाढणाऱ्या त्या आणि रोजचाच भात आणि निस्त्याक चवीनं ओरपणारा तो.

हे चित्र डोळ्यासमोर आलं की वाटायचं या सुखी माणसाचा सदरा मागायचा का? दुसऱ्या क्षणी हसू फुटायचं. याच्याकडे सदरा आहे तरी का? काळोखाचा अंगरखा मला होणार नाही आणि झेपणारही नाही. असा उघडाबंब होऊन बिनदिक्कत बाजारात फिरणं जमेल?

मग समजलं यांच्या गरजा अतिशय कमी आहेत. महत्वाकांक्षा तर नाहीतच. "ठेवीले अनंते तैसेची रहावे" हे यांच्या आयुष्याचे तत्वज्ञान. म्हणूनच ते प्रत्येक क्षण हसत सुखात घालवत जगत होते. खरेखुरे श्रीमंत.

"अरे मेल्या सावर सावर पडावाक. कसली रांडेची लाट ईली रे!"

मी त्यांच्या विचारात गर्क असल्यामुळे काय झालंय ते समजलंच नाही. एवढं मात्र खरं की जोरदार धक्क्याने मी फळीवरून पडावात खाली घसरलो होतो.

त्या काळोखात मला लाट दिसली नव्हती. त्यामुळे घाबरलो नव्हतो. अज्ञानात सुख हे असं असतं का?

गोप्या सुकाणू एका बाजूला फिरवत होता वाकडा होत आलेला पडाव आता सरळ होत होता. ठाणवी फरफरून स्थिरावली होती. पण

आजूबाजूचा काळोख अजूनही गडद होता. होडी सरळ होताच त्यांनी जाळे खेचायला सुरवात केली. आता जाळ्यात एक पापलेटांचा थवाच मिळाला होता.

ठाणवीच्या प्रकाशात मी त्या तिघांचेही आनंदी चेहरे न्याहाळत होतो.

"जावया काय रे?" नान्या

"अरे अर्दी रात पण नाय सरली, इतक्यात खय जातं? पापलेट गावतत ना रे? दोनचार जाळी खेचूया मग जावया तवसर फाटपट(पहाट) होयत."

आणि पडावाला एक गीरकी देऊन बाब्याने पडाव काळोखाला कापीत समुद्रात दौडवला.

बाबूने पडाव आता आणखी खोल पाण्याकडे पळवला. वाऱ्याने जोर पकडला होता. आधीच माझं अंग चुरचुरू लागलं होतं. आता हा वाढलेला वारा माझ्या हुळहुळया अंगावरून जाताना कित्येक ठिकाणी भगभगू लागलं.

दूरवर दिसणारे बंदराकडचे दिवे आता मधुनच दिसत. पडावाच्या हेलकाव्यांबरोबर ते कधी क्षितीजा आड जात तर कधी क्षणभर दर्शन देत. बोट जशी जशी आत जात होती तसे तसे हे दिवे दिसण्याचे कमी कमी होत जात होते. आता तर पूर्ण दिसेनासे झाले. जमिनीशी असलेलं एकमेव नातं आता परत कधी जुळणार असा विचार मनात येऊन घाबरायला व्हायला लागलं.

रात्रीचा तो काळोख, सभोवती पाणीच पाणी, त्या लाटा, महाकाय नसल्या तरी माझ्यासारख्या नवख्याला हलवून सोडणाऱ्या. आज पहिल्यांदा निसर्गाचा तो अजस्रपणा आपण किती खुजे आहोत ते समजावत होता.

लहानपणी अजस्र राक्षसांच्या गोष्टी ऐकताना जी स्थिती व्हायची तशीच आत्ता होत होती. त्यावेळी महाकाय राक्षस आपला आ वासून गिळून टाकेल की काय म्हणून पोटात गोळा येई. आता अजस्र समुद्राच्या पडावावर येणाऱ्या लाटा आणि आकाशात भरलेला भयानक काळोख हे दोन राक्षस आपल्याला गिळून टाकतात की काय ही भीती पोटात हुडहुडी आणू लागली होती.

बाबूने पडावाचं इंजीन बंद केलं. पडावाला उलटी एकदोन व्हली मारून थांबवला.

"अरे बेगीन बेगीन (लवकर लवकर) जाळा सोडा रे. मोठ्या पाण्यात इलव. सुरमायो गावतल्यो बग. नायतर ते ट्रावलर वाले येवन पळवून लावतीत. तेच्या आदी दोनदा तरी जाळा टाकूक येयत काय बगुया." बाबू ओरडला.

आता ते त्यांच्या समुद्रातून बाहेर पडून दुसऱ्यांच्या प्रदेशात घुसले होते. समुद्रातही जमिनीसारखे मळे तयार करायला लागलेल्या माणसांच्या स्वार्थाचा साक्षात्कार होत होता. मोठ्या समुद्रात ट्रॉलरवाले मासेमारी करत.

लहान पडाव व बोटींना त्यांच्या प्रदेशात मज्जाव होता तर उथळ समुद्रात ट्रॉलरना मज्जाव होता.

बिचाऱ्या लहान पडाव व बोटीवाल्यांना लहान माशांवर गुजराण करायची वेळ आली होती. मग ते असे मोठ्या समुद्रात भुरटी मासेमारी करीत. आताही ते असेच घुसले होते.

मी हे पहात व त्या विचारात असतानाच नानूने जाळे फिरवून ओढायला पण सुरवात केली होती.

"अरे येवा रे ओडूक! लय जड लागता हा जाळा पाण्यातय." गोप्या आणि बापू सुकाणू सोडून जाळे ओढायला धांवले. पडाव तिघांच्या आणि जाळयाच्या वजनाने एका बाजूला कलला व माझ्या पोटात गोळा आला. ते जाळं ओढत होते व पडाव एका बाजूने हेलकावे खात होता. जाळं पाण्याच्या वर येवू लागताच वजन वाढल्यामुळे पडाव अजून कलला आणि माझ्या तोंडून आपोआप रामरक्षा चालू झाली. आता पडाव उलटा नक्कीच होणार. मी त्या काळोख्या समुद्रात समाधी घेणार असं मनांत आलं.

मी भिऊन फळीवरून खाली उतरलो. तळात पसरलेल्या माशांवर बैठक मारून बसायच्या फळीला घट्ट पकडून बसलो. नजर बोटीतील माशांवर खिळवली. बाहेरच्या भीतीदायक वातावरणातून पळायचा एक दुर्बळ प्रयत्न होता. त्या समुद्राच्या समुद्राच्या भयानक अक्राळविक्राळतेतून व काळोखाच्या अजस्र विळख्यातून सुटायचा निष्फळ प्रयत्न होता तो.

"घ्या वर जोर लावन." बाबू गरजला. "जाळा फाटला काय रे? अरे ती बग ती बग अरे सुरमय भायर पडूक फडफडता. पकड तीका. वाव भर लांब हा. पकड पकड."

हे ऐकून भीती केव्हा पळाली, रामरक्षा बंद झाली. दुसऱ्या क्षणी मी पडावाच्या कडेवर रेलून फडफडणारी भली मोठी सुरमई पहाण्यात दंग झालो. नान्याने सुरमई पकडायचा प्रयत्न केला. तोल जाऊन तो समुद्रात पडला. आणि मी किंचाळलो "अरे नानू पडला वाचवा त्याला."

बाबूचा खोखो हसण्याचा आवाज आला. "तो काय मरात. ह्या पणी कापत सकाळी पोचात बायलेकडे." हा वर ताशेरा. आता गोप्या आणि बाबूने जाळे होडीत घ्यायसाठी जोर लावला आणि समुद्रातून जाळे वर ढकलायला नानू मदत करू लागला. ठाणवीच्या मिणमिणत्या प्रकाशात काहीच दिसत नव्हतं पण खालून नानू बोलत होता "खेचा" त्याच वेळी हे जोर लावून जाळे पडावात घेत होते. जाळे पडावात आले आणि कललेला पडाव सरळ व्हायच्या आत नानूने पडावाचा काठ पकडला. पडाव सरळ झाला तेव्हा नानू बराच पाण्या बाहेर लटकत होता. गोप्याने हात देऊन नान्याला पडावात घेतले. माझ्यातून एक सुटकेचा निश्वास निघाला.

यांचं आयुष्य, यांची मासेमारी अगदी मृत्युच्या अवती भोवती घोटाळतेय हे ध्यानी आलं. "पापलेट जोडी शंभर रूपये" ऐकल्यावर "साठान देतेस?" म्हणणारा मी पुरता ओशाळलो.

आता सात आठ सुरमई पडावात थाड थाड उडत होत्या. एवढ्या मोठ्या होत्या की एक एकीचं वजन सहज सहा सात किलो भरलं असतं. पडाव त्यांच्या फडफडण्याने डुचमळत होता. आणि मी त्यांना आणि त्या तीन मासेमारांना न्याहाळत होतो.

"एकदा टाकुया काय रे जाळा परत?"

"काय टाकतलं! फाटला बग ता एकठय. ओवन सांदुचा लागतला. चला जावया घराक. मॉप माशे गावले हत. उद्या टोपल्यो उचलाक तरी येतीत काय रे बायलेंका?" नानू विचारत होता.

"ए हेका आज बायलेची याद जोरात येता हा रे. सारको सारको घराक जावया म्हणता. ता बग सप्तरुषींचा नक्षातर आजून डोस्क्यारच हा. फाटपट होवक तीन तास तरी हत काय रे गोप्या जावया की पागुया आजून?" बाबू हट्ट धरत होता.

"चल रे तेचा काय आयकतस. धा मिनटा दी जाळा फाटला थय बांदतय मग टाकुया.

बाबूने पडाव चालू केला आणि आपल्या हद्दीकडे पळवला. परत एकदा धक्के खात आम्ही पाण्यावर सरकत होतो आणि पायाखाली सुरमई थडाथड उड्या मारत होत्या.

मला आता याची सवय होऊ लागली होती. मजा यायला लागली होती. ह्या तीन मासेमारानी त्या काळोखाला आणि समुद्राला सहजपणे नमवलं होतं. त्यांच्याकडे मी टक लावून पहात हरवून गेलो होतो.

थडथडत हिंदकळत पडाव जलद गतीने उथळ समुद्राकडे चालला होता. थोड्याच वेळात बंदराकडच्या दिव्यांची मिणमिण दिसू लागली. अर्धी रात्र सरत आली होती. दिव्यांची संख्या खूपच कमी झाली होती.

आता सुरमयींची फडफड थांबली होती. पापलेट, बांगडे, सुरमयींचा ढीग पहाता पहाता डोळ्या समोर आल्या त्या तिघांच्या बायका. या सर्व माशांचे तीन भाग केले असते तरी प्रत्येकीच्या डोक्यावर एक भलं मोठं फाटं (मोठी टोपली) चढणार होतं.

फाटे डोक्यावर चढवून एका सुंदर लयीत उड्या मारत चालणाऱ्या त्यांच्या बायका सीता, शामळी आणि सुंदरी दिसू लागल्या. नवऱ्यानी पकडलेले मासे घेवून बाजारात चालल्या होत्या. सुंदर लयीत चालत होत्या. डावा हात शरीरा पासून दूर, दुसऱ्या हाताने डोक्यावरचं फाटं पकडलेलं, डोक्यावरचा वजनाचा भार कमी व्हावा म्हणून मारलेली एक छोटीशी उडी, त्याबरोबर वर उचलले गेलेले फाटे डोक्यावरचा भार क्षणा दोन क्षणांसाठी कमी करे. परत खाली येणारे फाटे डोक्यावर परत वजन देई. प्रत्येक वेळी डावा पाय उचलते वेळी फाटे डोक्यावर असे. त्यामुळे भार उजव्या पायावर येई. तो कमी करण्या साठी आता उडी येई. मग डावा पाय जमिनीवर लागेपर्यंत फाटे खाली यायला लागे. सोबत लांब केलेला डावा हात मागे पुढे फलकवत तोल सावरत चालण्याची एक सुंदर लय तयार होई.

ही लय शब्दात वर्णन करणं फार कठीण आहे. ती पहाताना फार लोभसवाणी वाटत असे. नृत्यांगना ठुमकत चालल्यात असा भास होई.

तिघी सम वयस्क, एकाच चक्रात दररोज फिरणाऱ्या. घरून निघाल्या की बंदरावरच्या बाजारात पोचे पर्यंत थांबणं शक्यच नसे.

माशांच्या फाट्यातून ठिबकणाऱ्या पाण्याने त्यांच्या केसांना खतपाणी घातलं होतं की काय देव जाणे. घनदाट, काळ्याभोर केसांचा गलेलठ्ठ आंबाडा व त्याच्यावर माळलेला गजरा त्यांच्या चाली बरोबर वर खाली डोलत असे.

यांचा गहूवर्ण कसा याचा विचार करताना लक्षात आलं की रात्रभर मेहनत करून घरी येणाऱ्या धन्याची तळमळत वाट बघणाऱ्या त्या, पहाटे पहाटे ते घरात प्रवेशताच यांच्या मनांत आनंदाची प्रभा व्हायची. त्यामुळेच यांचा रंग उजळ झाला असावा. नाहीतर या वाळूवरच्या उन्हात जास्त वेळ असत. यांचे धनी रात्रभर समुद्रात असुनही कभिन्न काळे आणि या दहा अकरा वाजेपर्यंतचे ऊन घेवून पण उजळ.

निसर्गाचे नियम अपवादात्मक असतात याचा निर्वाळा होता तो.

तिघींची मैत्री पण वाखाणण्या सारखी. बाजारात गिऱ्हाईक एकी कडे आलं आणि भाव करून जाऊ लागलं की दुसऱ्या दोघींना संदेश खुणेने पोहोचे. त्या मग त्या गिऱ्हाईकाला भाव वाढवून सांगत. धंदा आणि त्याच्या खाचा खोचा यांच्यात पुऱ्या ठासून भरल्या होत्या. अकरा वाजेपर्यंत जे मासे शिल्लक रहात ते मोठ्या व्यापाऱ्यांना घालून येत. त्यांचा भाव आधीच्या

लिलावावरून माहीत झालेला असे. छोटे मासे बर्फात घालून संध्याकाळी बाजारात बसणाऱ्या बायांना घालीत.

या घरी परतत तेंव्हा बारा वाजत आलेले असत. सोरा चढवून धनी घरी यायला अजून तासभर तरी असे. या लगोलग कामाला लागत.

बाजारातून येताना सुका व ओला मसाला, नारळ, घेवून येत. वाटप करून माशांचे निस्त्याक करायला घेत. भात शिजवायला टाकत. भाताला वाळून वाफेला ठेवतानाच ते तिघेही घरात शिरत.

हसऱ्या चेहऱ्याने स्वागत करताना त्या म्हणत,"रांधून झाला हा, बसतलास खावक? मगे पोरा नी मी बसू. तुमी बसा पयले पोटभर खावा. रातीची म्हेनत करूक पोटभर लागता ना!"

या सगळयातून नवऱ्यावरच्या प्रेमाचं व काळजीचं अपूर्व दर्शन व्हायचं.

"झाला रे जाळा सांदून जावया काय रे परत? ट्रावलर नाय ना दिसत खयचो?" गोप्याच्या बोलण्याने मी स्वप्नरंजनातून परत पडावात आलो.

आता परत खोल समुद्रात जायचं तरी घाबरलो नाही. भीती खूप कमी झाली होती. मी आता त्या समुद्राला व काळोखाला ओळखू लागलो होतो. मनाने सशक्त होत होतो.

पडावाचे इंजीन चालू झालं आणि एका जोरदार झटक्याने आम्ही खोल समुद्राकडे सुसाट निघालो.पडावाला लाटा वर उचलत असत त्यावेळी माझी बैठक फळीवर जोरात दाबली जात होती. दुसऱ्या क्षणी लाटेवरून उतरताना मी फळीवर अल्लद उचलल्या सारखा होत असे. अगदी सीता, शामळी व सुंदरी यांच्या डोक्यावरच्या त्या फाट्यासारखा.

आता आम्ही परत खोल समुद्रात पोचलो होतो. नानूने जाळे सोडता सोडता बोंब ठोकली, "अरे चारय बाजूक ध्यान ठेवा ट्रावलर येवचो येळ झालो हा. सगळे माशे घेवन जातीत पकडलानी तर."

हा काय प्रकार आहे याच्यावर विचार करत होतो तोच यांचं जाळं गोल टाकून झालं होतं. आता खेचायला सुरवात केली, एवढ्यात बाबू ओरडला, "ट्रावलर ईलो रे पडाव पळवतय जाळ्याचे दोर पकडून ठेवा." दुसऱ्या क्षणी पडावाने आपल्या प्रदेशाकडे धाव घेतली. यांना त्या काळोखात ट्रॉलर कुठे दिसला ते मी शोधत होतो.

पडावचं इंजीन जोरात रोरावत होतं. बाबूने इंजीनला पुरा वेग दिला होता. मला तर त्या काळोखात काही दिसत नव्हतं. काय झालंय तेही समजत नव्हतं. ट्रॉलर तर नजरेत येत नव्हता.

आम्ही आमच्या उथळ समुद्रात पोचत आलो आणि वेग कमी झाला. आजूबाजूच्या काळोखात कित्येक मिणमिणत्या ठाणव्या उथळ समुद्राकडे धाव घेताना दिसू लागल्या.

नानू जाळं हळू हळू ओढत होता. त्याला मदत करायला गोप्या धावला. भराभर जाळं वर खेचून त्यांनी जाळयाचं तोंड एका जाड दोऱ्याने घट्ट बांधलं व जाळं परत समुद्रात सोडून दिलं.

मला समजेना हे काय चाललंय. एवढ्यात उजव्या बाजूला क्षितीजा वर एक लाल दिवा व इतर सफेद दिवे काळोख कापत पुढे पुढे येताना दिसू लागले. दिव्यांवरून ती बोट आहे असं मला वाटत असतानाच बाबू बडबडला, "येवा आता, कोणाक धरशात? आमी तर आमच्या पाण्यात हव."

जवळ जवळ सगळ्या ठाणव्या आता उथळ पाण्यात आल्या होत्या एक दोन अजूनही त्यांच्या प्रदेशात दिसत होत्या.

नानू आणि गोप्याने जाळयाचे दोर पडावातल्या फळीला घट्ट बांधले आणि पडावात खाली बसून मोठ्या सुरमई इतर माशांच्या खाली दडवू लागले. मलाही मजा वाटली पडावात खाली बसून मी पण मासे वर खाली करू लागलो. पापलेट व बांगडे एवढे होते की त्या सुरमई त्यांच्या खाली, खूप खाली सहज दडल्या.

"येवा आता अक्करमाशानु लय दादागीरी केलास तर पोलीसात नेतव की नाय बगा."

एवढं नाटक का? हे मला अजून उमगत नव्हतं. ट्रॉलरचा वेग एवढा होता की पुढच्या पाच मिनीटात तो खोल पाण्यात अजून असलेल्या त्या दोन चुकार ठाणव्यांकडे पोचला.

जोरजोरात बोलण्याचा आवाज येत होता पण काही समजत नव्हतं. त्या ठाणव्या आता आमच्या जवळ पोचत आल्या. ट्रॉलर त्यांना आडवं जाऊन रोखायला पहात होता. त्याला गुंगारा देऊन पडाव आपल्या हद्दीत यायचा प्रयत्न करीत होते. शेवटी ते दोन्ही पडाव आमच्या अगदी जवळ आले. मागोमाग ट्रॉलरही उथळ पाण्यात आला. फ्लड लाईट टाकून ते लोक पडाव तपासत होते.

बाबू जाळे टाकत असल्याचे नाटक करीत होता. गोल फिरत असताना ट्रॉलरच्या अगदी जवळ जाऊन ओरडला, "तुमचा ह्या हयसून काढा आमच्या जाळयार ईलासात." ट्रॉलरने आमच्या बोटीत फ्लड लाईट मारला. त्या प्रकाशात माशांवरून फिरवला व बाजूला झाला.

सगळे पडाव वाले आता एकत्र आले व जोरजोरात ओरडू लागले. दहा मिनीटं हा प्रकार चालला होता. सगळे पडाववाले ट्रॉलरवाल्यांवर दादागीरीत बोलत होते. ट्रालरवाले बोटीवर प्रकाशझोत टाकून त्यांचे नंबर वाचायचा प्रयत्न करीत होते. पण मासेमार अनुभवावरून हुशार झाले असावेत. त्यांनी आपले नंबर मिळेल त्या कपड्याने, गोणपाटाने, टोपलीने आधीच झाकून टाकले होते. हे नाटक जवळ जवळ अर्धा तास चाललं. आता ट्रॉलर मोठ्या समुद्राकडे निघाला. सगळ्या वरून मला थोडाफार

अंदाज आला. तरी देखील मी त्यांना विचारलं,"का रे आपण पुढे जाऊन मासे पकडायचे नाहीत? समुद्र तो, तो असा वाटता येतो का?"

"बग बामणाचो झील पण समजता समुंदर कोणाच्या बापाचो नाय, पण सरकार खय समाजता! पाच किलोमिटरच्या आतल्या पाणयात आमी नी नंतरच्या खोल पाणयात ते. आमका गावल्यो तर हातभर लांब सुरमय गावतत. हेंका वाव दोन वाव. आमका काय कमाई होतली?"

खरं होतं त्यांचं. फार मेहनत होती त्यांच्या मासेमारीत. पण सरकारला पुळका या मोठ्या मासेमारांचा.

"अरे पण तुम्ही पुढे खोल पाण्यात गेलात तर सरकार थोडंच बघायला येतं?"

"ह्या बगा! ते बोटी तपासतत आणि मोठे माशे बोटीत गावले तर सगळे माशे घेवन जातत. नायतर फोटू काडतत. मग तक्रार करतत. माशेय जातत नी वर दंड भरूचो येता." आता सगळ्या पळापळीचा अर्थ लागत होता.

मेहनत तर होतीच पण असले कायदे त्यांना फार त्रास देत.

आता ट्रॉलर फार लांब गेला होता. मोठ्या पाण्यात टाकलेलं जाळं अजून बाहेर काढायचं होतं.

बाबू व नानू जाळं खेचू लागले. गोप्या जाळं वर येताच मदतीला धावला. जाळं पडावाच्या काठावरून आत आलं. यावेळीही पडाव एका बाजूला कलला होता. तरी देखील मी जाळं आत घ्यायला मदत करावी म्हणून गेलो. सुरमई बरोबर लांब शेपटीच्या भल्या मोठ्या पाच सहा घोळी

देखील जाळ्यात होत्या. त्या काळोखात त्यांना मी दिसलो नाही. मला अनुभवही नाही. दोन्हीचा परीणाम असा झाला की मी पडावात आडवा झालो आणि फडफडणाऱ्या माशांनी भरलेलं जाळं माझ्यावर मस्त विसावलं. लागलं काहीच नाही पण माशांच्या त्या फडफडीने जबरदस्त गुदगुल्या होऊ लागल्या. त्यांच्या सारखा मी पण वळवळू लागलो, ओरडूही लागलो आणि हसूही लागलो. गोप्याने जाळ्याचे दोर सैल करून जाळे उघडले आणि मासे माझ्यावरून घसरून पडावात पसरले. सगळेच हसत होतो. पण ते हसताना ठाणवीच्या प्रकाशात त्यांचे दात चमकत होते. जांभळ्या ओठांत ते आणखीच पांढरे शुभ्र वाटत होते.

मी उठलो तेव्हा पुरा ओला झालो होतो. माशांचा वास सगळ्या अंगाला येवू लागला होता. समुद्रावरचा वारा आता ओल्या कपड्यांमुळे मला हुडहुडी आणत होता.

"बामणानु! काळोखात काय दिसला नाय वो! तुमी इलात ता म्हायत नाय पडला वो" ओशाळ्या स्वरात नानू सांगू लागला व परत आपल्या कामात गुंग झाला. रिकामी झालेलं जाळं सरळ करून परत समुद्रात टाकायचं होतं.

सप्तर्षींचं नक्षत्र त्यांना वेळ सांगत होतं. मी कितीतरी गोष्टी या समुद्रपुत्रांकडून, समुद्राकडून शिकलो होतो. त्या काळोखातला पहिला धडा. काळोख सांगत होता "मला भिऊ नको. मी एक प्रकाश विरहीत पोकळी आहे. बस्स्"

या वेळी नानू घरी जाऊ बोलला नाही. पण म्हणाला, "उद्या बायलेंच्या पाठसून फाटा नेवचा लागतला रे. तयार रवा. आताच किती माशे झालेत बगा. आजून तुमचा पोट भरणा नाय?"

"मेल्या! आज नशिबान चांगले गावतत ना रे! मग खळवटुया मिळतीत ते. तुजा बरा हा पोरगी नाय तुका. आमका हत आवंदा (यावर्षी) लगीन करूचा हा. चार पैशे हातात नुको?"

नान्या गप्प झाला पण माझ्या डोळ्यासमोर तो चार आठ दिवसांपुर्वीचा प्रसंग आला.

बाबूची सुशी आणि गोप्याची गुलाब नजरे समोर आली. आता बारा तेरा वर्षाच्या होत आल्या होत्या.अगदी चुणचुणीत हसऱ्या होत्या. गावभर बागडायच्या. दहा वर्षाच्या झाल्या आणि शाळा सोडली. आयांबरोबर बाजारात जाऊ लागल्या. गिऱ्हाईकाकडून पैशे देण्याघेण्याचं काम आयांनी यांच्यावर टाकलं. नोटा मोजायला येवू लागल्या. हिशोब समजू लागला. आता त्यांच्या लग्नाचे वेध लागले होते.

सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे बाजारात शामळीची सुशी सुंदरीकडे आणि सुंदरीची गुलाब शामळीकडे असत. आईकडे धड शिकत नाहीत हा ठाम समज म्हणून ही अदला बदल.

आमचं घर या मासेमारांच्या घरापासून चार पावलांवर त्यामुळे यांच्याशी घरोबा. आमच्याकडे पाहिजे तो मासा येत असे. हल्लीच एकदा आई आणि मी बाजारात गेलो तेव्हा आईला हे दिसलं. तिने विचारलं, "काय गो सुंदरे तुजी पोरगी शामळीकडे आणि शामळीची तुज्याकडे असा कित्या गो? साटालोटा करुचो इचार हा काय तुमचो?"

*(साटालोटा - अदलाबदल. एकमेकांच्या मुली सुना म्हणून आणणं.)*

"वयनीबाय! काय छान सांगलंस गे. आता बोलतय शामळीशी. तेची पोरगी माज्या पोराक आणि माजी शामळीच्या पोराक. घरातच रवतल्यो न्हय गे. काय छान सांगलंस. आता बोलतय शामळीशी.

काय घेवक ईलंस, काय देव?" आईन दोन पापलेटं सांगीतली तर हीने तीन टाकली. आईने दिलेले पैसे न मोजताच सुशीकडे दिले. सुशी मोजून म्हणाली,"वीस रुपयान पापलेट साठ होतत धा कमी हत."

"गप रव गो! वयनीबाय ती कमी देवची नाय. बग तीणा तुका आता माज्याच घरात कायमची धाडलान."

सगळेच हसत बाहेर पडणार तोच सुंदरी म्हणाली, "वयनीबाय! शामळी जवळ बारके सवंदाळे हत बग जा तिच्याकडे पेडवेय घी आणि साटालोट्याचाय बोल माजा काम कमी होयत. इचारल्यार नाय म्हणल्यान तर वायट येयत मनात मग संबंद खराब होयत. तू बोलून सांग माका."

आईने होकार भरला मग शामळी कडे गेली तिथे तोच प्रकार आईने सवंदाळे घेतले, पेडवे घेतले, साट्यालोट्याचं बोलली आणि दोन सोयरीकी पक्क्या करून घरी आली.

माझ्या डोळ्यासमोरून हा प्रसंग जात होता.

एक जोरदार गिरकी पडाव घेत होता आणि मी एका बाजूला घसरत गेलो आणि त्या बाजारातून परत पडावात आलो. आता कुठे नानूने जाळ्याचा अर्धाच गोल पुरा केला होता.

मी परत माझ्या स्वप्न रंजनात दंग झालो. ही चार दिवसांपुर्वीचीच गोष्ट होती आणि आज गोप्या नानूला सांगत होता, मुलींच्या लग्नाला पैसे लागणार. बहुदा यांच्या बायकांनी यांना मुलींच्या लग्नाचं सुतोवाच केलं असणार. "गोप्या पोरींची लग्न करताय आवंदा?" मी विचारलं.

"बामणानु ता काम आमच्या बायलेचा. आमचा नाय. ती ठरवात तेवा सदरो घालून नटायचा, मिरवायचा दोन दीस बकरो कोंबडो सोऱ्याची मजा करायची. बाकी काय. कायतरी करतहत एवडा कानार ईला हा. पोरींचा भला तेंका म्हायत आमी अर्दे पाणयात नी अर्दे घराक झोपेत. नान्या येव काय रे जाळा फिरवाक?"

यांचं मन कामात होतं मी विषय सोडून दिला आणि परत त्यांच्या मुलींचा विचार करू लागलो.

सुशी आणि गुलाब दोघीही चुणचुणीत होत्या. लहान असताना समुद्रावरच्या वाऱ्यासारख्या गावात भिरभीरत. शाळेत अभ्यास कच्चा पण आता पैशांचा तोंडी हिशोब करतात. यांच्या गणिताची भाषा वेगळी. "पाच विसाचो एक शेकडो, दोन पाच म्हणजे एक दसको" हे मात्र पटपट समजत. नोटा तशाच मोजत. पाच दगड घेऊन पची खेळतानाही असंच मोजत.

यांचा रंग आयांच्या वळणावर गेलेला. दोन जाडजूड घट्ट वेण्यांवर सुरंगीचा, आबोलीचा किंवा कोरांटीचा हार घातल्याशिवाय कधी दिसल्या नाहीत. फुले केसात माळण्याचा यांना आणि यांच्या आयांना भारी सोस. घराच्या आजूबाजूला या सगळ्या फुलझाडांची गर्दी असे माशांचा कचरा दररोज पडे त्याच्या खतावर अगदी जोमात उगवलेली ती झाडे नेहमी ऋतुप्रमाणे बहरलेली असत. तीच यांच्या वेण्यांवर आंबाड्यावर सजत.

"गाबतांची चेडवा कशी नक्षत्रासारकी हत." आमच्या शेजारची गंगुमावशी म्हणे. ते ऐकले की यांच्या आया संध्याकाळी दृष्ट काढत. त्यांत भुतं खेतं झाल्यावर गंगूमावशीचं नाव हमखास घेत.

या विचारात असताना नानू म्हणाला, "बामणानु हसतास ते? काय इला मनांत?"

या बोलांसरशी मी परत पडावात परतलो. जाळं गोल घालून नानू परतला होता. बाबूने जाळं खेचायला सुरवात केली होती. बाप्या नक्षत्र न्याहाळून पहात म्हणाला. आजून दोनदा तरी जाळा टाकूक होयत फाटपटी परयात."

"आता जावन काय करतलं होटी हा. पडाव किनाऱ्याक कसो लागात?"

यांना नक्षत्रावरून भरती, ओहोटी, वेळ दिशा सगळंच कसं कळतं? शाळेत हे कधीच शिकवलं नाही. या मासेमारांना हे ज्ञान जरूरी असेल तर ते शिकवायला नको का? मला आता मी शाळेत जाऊन जे शिकलो त्यातलं किती वापरतो, किती उपयोगी पडतंय त्याचा विचार आला. वाटलं समुद्र आणि काळोख, पाण्याची खोली व मासे, आकाशातले तारे व दिशा वेळ. यांना जे येतं त्यातलं मला शाळा संपायला आली तरी काय येतं. काहीच नाही.

एवढ्यात कांहीतरी गरम वाटलं. वळलो तर बाबू केबीन मधून शेगडी पेटवून घेऊन आला.

फुललेल्या निखाऱ्यांनी काळोख थोडा कमी झाला. पण शेगडी कशाला?

कुडकुडलेला मी शेगडीकडे बसून हातांना शेक देऊ लागलो.

"बाबू भुकाळलो रे." नानुने बाबूला टोला मारला.

"नको खावत तुमी. एकटोच खातय मिया. बरा झाला एक हातभर लांब सुरमय भाजतय नी खातय एकटोच. नायतरी घराक पोचाक आज दिवस उजवाडतलो. भरतीचा पाणी पुरा पोचाक नुको. पुऱ्या काठाक लागला तर माशे घराक नेवची खेप कमी होत." बाबू सांगत होता.

मला आता डोक्यात प्रकाश पडला. पुऱ्या भरतीचं पाणी भरलं की मगच यांचा पडाव काठावर जाणार होता. मग घर जवळ असणार होतं.

गोप्या आता जाळं हळूहळू सोडवत बसला होता. थोडंसं एकमेकात गुंतलं होतं.

बाबूने दोनवीत लांबीच्या दोन सुरमई काढल्या. समुद्राच्या पाण्याने साफ केल्या. एका छोट्या थाळीत मिरचीची पावडर, मीठ, कैरीची पावडर व बचकाभर मसाला घातला. हळद पाणी घालून माशात भरायचा मसाला तयार केला. दोन्ही सुरमईंना आतून बाहेरून ठासून भरला. एक सळी तोंडातून घालून शेपटी कडून बाहेर काढली. आणि सुरमई निखाऱ्यांच्या धगीवर ठेवली. दुसरीलाही तशीच सजवून शेगडीवर ठेवली. दोन्ही सळ्या हळू फिरवताना बाबू तोंडाने शीळ घालत "मे रा जुता है....." गाणे वाजवू लागला. मासा, मसाला, आणि शेगडीची उब काय सुंदर वातावरण तयार झालं होतं.

हे अनोखं वातावरण तो गाबतांच्या तापत्या मसाल्याचा सुवास, गार खारा वारा, लांबून ऐकू येणारी समुद्राची गाज. समुद्राच्या लाटांवर मिळणारे हिंदोळे, एक मैफिल जमली होती.

बाबूचे मासे भाजून झाले. "येतास काय रे? की आमी खाव सगळाच? बामणानु भाजको मासो खाशात ना?" भाजताना सुटलेल्या वासामुळे माझ्या तोंडाला पाणी सुटलंच होतं. मी तोंडातले पाणी सावरत मान हलवून होकार भरला. पुढच्या क्षणी अर्धी सुरमई बाबूने हातानेच मोडून शेपटी कडचा भाग माझ्या पुढे धरला. "बापरे एवढा!"

"जातली वो! समुद्रार भूक लागता जोरात. खावा होई तेवडी. रवली तर मी खायन."

मी पहिलाच घास घेतला. तिखटजाळ, आंबट पण अप्रतीम रुचकर मासा खाताना गुंगून गेलो. दोन्ही हात बरबटत होते. एका हातानेच जेवायचा बामणी संकेत झुगारून मी त्यांच्यातलाच एक झालो.

आजुबाजूचा अथांग समुद्र, त्यावर हेलावणारा आमचा पडाव, बोचरा थंड वारा, तिखटजाळ रुचकर भाजलेला मासा व शेगडीची ऊब त्या थंडीला बोथट करीत होते. शेतावरचं बार्बाक्यू कॉलेजच्या दिवसात केलेलं आठवलं. पण हे त्या काळोखी समुद्रातलं त्या मासेमारानी केलेलं बार्बाक्यू जगावेगळा आनंद देत होतं.

मी त्या काळोखावर, भयानक लाटा उसळवणाऱ्या समुद्रावर फिदा झालो होतो. त्यांच्यावर प्रेम करू लागलो होतो.

मासे खाऊन झाले तसे सर्वांनी कामाला सुरवात केली होती. नानू जाळे टाकत होता. गोप्याबरोबर सुकाणू फिरवायला मी गेलो. गोप्याने सुकाणूचा दांडा हातात देऊन सांगीतलं "दांड्याचा टोक डाव्या हाताक नेलास तर

पडाव डाव्या दिशेक वळतलो. उजव्या दिशेक नेलास तर उजव्या बाजूक वळतलो. नजर पडावाच्या फुडल्या टोकार ठेवा आणि डाव्या बाजूक छान वळवत गोल फिरवा. बगुया कसो पडाव फिरवतास तो."

मी पडाव वळवू लागलो नानू आणि बाबू व्हली मारून पडाव हाकीत होते. सुकाणूचा डाव्या बाजूला एका जागी स्थिर ठेवला की मस्त गोल येणार हे मला समजलं होतं पण जाळयाच्या लांबी एवढा परीघ कसा होणार ते अजून माहीत पडत नव्हतं. सुकाणूवर मला सोडून गोप्या पुढे निघाला. पडावाच्या अगदी मागे, शेवटच्या फळीवर बसून मी सुकाणू पकडलं होतं. माझ्या मागेच समुद्राचं पाणी उसळी मारत होतं. अगदी एक दोन फुटांवर उसळणाऱ्या पाण्याचे थेंब अंगावर येत होते. हळू हळू मी त्याही स्थितीत थारावलो. सुकाणूवर लक्ष ठेवलं. गोल फिरणाऱ्या पडावाचा बाजूच्या भागावर आता लाटा आपटू लागल्या आणि पडाव एका बाजूला हेलकावे खात सरकू लागला.

"वायच डाव्या बाजूक करा दांडो. पडाव सरळ होयत" गोप्या ओरडला. मी दांडा जास्तच डाव्या बाजूला केला. पडाव सरळ होऊन दुसऱ्या बाजूला कलला आणि गोप्या उड्या मारत धावत माझ्याकडे आला. सुकाणू पकडून त्याने पडाव सरळ केला. व हसत म्हणाला, "येयत तुमकाय पण जरा सवय लागात इतक्याच. जरा हळू हळू दांडो वळवुचो. फाटकन वळवलास तर पडाव एकदम वाकडो होयत. घ्या दांडो हातात चालवा पडाव."

गोप्या त्या सगळ्यांचे जीव बिनधास्त माझ्या हातात देत होता. आता मी मनावर ताबा ठेवत सुकाणू हलवत होतो. पडाव वळवत होतो. पुरा गोल तर मला मारता येणार नव्हता पण. होईल तेवढा चांगला गोल मारण्याचा प्रयत्न करायचा होता. सर्व लक्ष होडीच्या पुढच्या टोकावर व दांड्या वर होतं. वर्तुळ तयार होत होतं पण ते कंपासा शिवाय हाताने बनवलेल्या वाकड्या तिकड्या रेषेचं बनावं तसं बनत होतं. ते तिघे आपल्या कामात दंग होते.

अर्ध्या तासाने त्यांनी बोट थांबवली.

"काय नाय जरा वाकडा तिकडा पडला हा पण माशे गावतीत बगा." बाबू मला धीर देत होता. नानूने जाळे ओढायला सुरवात केली. जाळं वर आलं तेव्हा मासे भरले होते. पण थोडे कमी वाटत होते. "काय बामणानु आमची कला शिकुची हा? लय म्हेनत हा. येतलास उद्या पण?" गोप्या विचारत होता आणि हसत होता. त्याला आणि मला दोघांनाही माहीत होतं हे शक्य नाही.

"फाटपट झाली रे! वळवा होडी. आजूनय जाळा टाकुचा नाय मा?"

"नानू एकदा खोल पाणयात जावया काय रे? मोठ्यो सुरमय गावतीत." बाबू नान्याला चिडवत होता.

"होय! ते बग! तुजो बापुस आजो नी सगळे ट्रावलर घेवन फिरतं हत. जातलं?"

खरंच खोल समुद्रात दोन ट्रॉलर मासेमारी करताना दिसत होते. त्यांची मासेमारी अगदी पहाटे चालू होते ती अकरा बारा वाजे पर्यंत चालते. त्यांचे परतणे माशांनी बोट भरण्या वर असते. हे सांगताना गोप्याने दोन अस्सल कोकणी शिव्या देत सांगीतलं, "सगळा खळवटून खरडून नेतत xxxx. माशे रवतले काय अशान? एक दीस समुंदर खाली करतले xxxx."

आता ट्रॉलर अंधूक दिसू लागले मी वळून पुर्वेला पाहिलं. तांबडं फुटणार असं वाटत होतं. गोप्याने होडीचं तोंड पुर्वेला केलं आणि आम्ही बंदरा कडे निघालो. अजुनही काळोख सोबत करीत होता.

पडाव हळू हळू जात होता. कारण अजून भरती पूर्ण आली नव्हती. पूर्ण भरतीमुळे ते किनाऱ्याच्या अगदी जवळ पोचले असते.

पुर्वेवरच्या ढगांना तांबुस रंग येऊ लागला. काळोख हळू हळू पश्चिमेकडे सरकत होता. निरोप घेत होता. पश्चिमेकडे तोंड करून काळं क्षितीज पहात मी त्याला नमस्कार केला. काळोखाचा एवढा सुंदर अनुभव घेतला होता. तो आता जन्मभर निश्चित साथ करणार होता. काळोखाची भीती उर्वरीत आयुष्यात वाटणार नाही असंच वाटत होतं.

तो भीतीदायक समुद्र पण खोली सांडत होता. निळसर, हिरव्यागार पाण्याने आता पिवळसर मातकट रंग घ्यायला सुरवात केली होती. पडावाच्या काठावरून वाकून मी ओंजळभर पाणी घेतलं. ते तोंडाला लावून परत समुद्रात सोडत होतो. त्याला प्रेमाने चुंबन देत होतो.

"बामणानु सुर्याची पुजा करतास? करा! करा! आमका काय तेतुरला समाजणा नाय."

मी चमकलो माझ्यावर गोप्या लक्ष ठेवून होता तर. थोडा ओशाळत बोललो, "नाय रे बाबा! समुद्राने एवढा आनंद दिला ना काल रात्रभर, म्हणून त्याचा निरोप घेत होतो. आता परत कधी पडावातून येईन की नाही देव जाणे."

"असा कित्या, जेवा वाटात तेवा या. आमी घेवन जाव तुमका. पायगुणाचे आसात. बगा केवडे माशे गावलेत ते. पाच सा फाटे भरतीत. एवडे नाय गावत कदी."

मला माहीत होतं, मला बरं वाटावं म्हणून गोप्या हे बोलतोय. आम्ही खोत, गावाचे मालक, म्हणून सगळेच असा मान देत.

त्या मानाचे खरे हक्कदार हे तिघे होते हे स्पष्ट दिसत होते.

पडाव अगदी किनाऱ्या वर आला. नानू व बाबू उड्या मारून उतरले. गुडघाभर पाण्यातून धांवत किनाऱ्यावर गेले. दोर पकडून नानू पडाव ओढत होता. बाबूने लाकडाचा एक गोल ओंडका पडावा खाली सरकवला. गोप्या उडी मारून खाली उतरला पडावाच्या मागे जाऊन धक्का मारू लागला. मला समजलं. ते पडाव पाण्याबाहेर काढत होते. दुसरा ओंडका बाबूने पडावाखाली सरकवला. तोपर्यंत मी पण उडी मारून उतरलो होतो. आता

आम्ही तिघेही पडाव खेचत होतो आणि गोप्या मागून पडावाला धक्का मारत होता. पडाव लाकडाच्या ओंडक्यांवर गडगडत पुढे सरकत होता. थोड्या अंतरावर बाबू परत ओंडका पडावा खाली ढकलत होता. पडाव आता पूर्णपणे किनाऱ्यावर सुक्या वाळूत आला होता. ते तीन आणि मी अर्धा, साडेतीन लोकांनी ते पडावाचे अजस्र धूड किनाऱ्यावर गडगडत आणले होते. मला खरंच वाटत नव्हतं. शाळेत शिकवलेल्या शास्त्राचं आता प्रात्यक्षिक करून बरंच काही शिकलो होतो.

सुर्य वर आला होता. सीता, शामळी, सुंदरी, सुशी आणि गुलाब हसऱ्या चेहऱ्याने मोठी मोठी फाटी घेवून स्वागताला उभ्या होत्या. त्यांच्या चेहेऱ्यावर तिघे सुखरूप घरी आल्याचा आनंदाचा सुर्योदय होताना दिसत होता.

या तिघांच्या शरीरावर सुर्याची किरणे पडली होती. त्यांची कांती काळ्या शाळीग्रामा सारखी चकाकत होती.

"गे बाय! खूप माशे गावलंले दिसतंत. बाजारात नेतलाव कशे?"

या वाक्याने मी भानावर आलो. आता ते मासे फाट्यात भरत होते परत एकदा मला धक्का बसला. सगळे छोटे मासे एका फाट्यात. मग मोठे मोठे दुसऱ्या दोन फाट्यात. त्यातही पापलेट एका फाट्यात तर सुरमई दुसऱ्या फाट्यात. ही वाटणी बरोबर नव्हती. मग बाबूने फोड केली माशांची वाटणी गिऱ्हाईकांना खेचण्यासाठी करायची. छोट्या माशांना गिऱ्हाईक जास्त. मोठ्यांना कमी. मग छोट्यांबरोबर दोन मोठ्या सुरमई ठेवायच्या. ती भाव

चढा सांगणार. जीच्याकडे सुरमई जास्त ती भाव कमी सांगून खप वाढवणार. सर्व झाल्यावर पैसे सारखे वाटून घेणार.

भलभल्या मार्केटींगवाल्यांनी धडा घ्यावा असं या अनपढांचं मार्केटींग ऐकून मी थक्क झालो. हे सर्व बायकांचं काम.

आज मासे जास्त होते. बरेचसे मोठे मासे बाजूला काढून गोप्याने टेंपो बोलावला. मासे चढवून सर्व त्यात बसून बाजारात पोचलो. बाजार वाळूवर भरायचा. टेंपो समुद्राच्या अगदी कडेने ओल्या वाळू वरून बाजारात पोचला. विकायची फाटी उतरवलीआणि गोप्या मोठे मासे घेऊन मोठ्या व्यापाऱ्यांकडे निघाला. माझ्यातील उत्कंठा वाढली होती. मी पण बरोबर गेलो. वजन करून त्या व्यापाऱ्याने रोख पैसे मोजले. आज लिलावात फुटलेला भाव सुरमई व पापलेटला मिळाला होता. गोप्या खुष झाला.

आता सर्व काम संपलं होतं पुढचं काम यांच्या बायका सांभाळणार होत्या. आम्ही चालत बाजारात आलो. रमत गमत घरी पोचलो खरा. पण विचारांच्या लाटा येवू लागल्या. कोण स्वस्थ व आनंदी जगत होते? हे मासेमार खरे जगत होते की टाय सूट घालून फिरणारे बाबूलोक, धंदेवाले, मोठ्या मोठ्या ऑफिसात दिमाखात भल्या मोठ्या खुर्चीत बसून लठ्ठ पगाराची गुलामी करणारे?

यांच्या दिनक्रमावर विचार आला आणि दिसलं सगळेच गुलामी करून थकलेत. आठ तासात यांचा कणा पार पिचून गेलाय. जाताना टाय, शर्ट, पॅंट व्यवस्थित पेहेरून गेलेले हे संध्याकाळी घरी येताना पॅंटीतून उसवलेला शर्ट, विस्कटलेली टाय व बरोबर टोपलीभर उद्याच्या कामाच्या चिंता बांधून घरी येणारे.

विचार गडद होत होते तसतसा मनात काळोख वाढत होता.

हे टाय सूटवाले भवसागर नावाच्या समुद्रात नशिब पागत होते. चिंतांच्या काळोखात.

पण खऱ्या खुऱ्या समुद्रात बेफिकीर पणे मासे मारणारे ते तिघे? वा! हे खरे खुरे जगत होते. हे आनंदात जगत होते. मेहनती नंतर सोरा मिळाला व वर शेराचा भात आणि निस्त्याक बायकांच्या प्रेमळ हातून मिळालं की यांचं जीवन सार्थ होत होतं.

गरजाच नाहीत, महत्वाकांक्षाही नाहीत. मस्तरामांचं जीवन जगत होते ते. यांच्या आयुष्यात सुर्याचं झगझगीत उबदार उन पसरलेलं दिसलं.

........

आज हा अनुभव, हा विचार, मी मुद्दाम आपल्या समोर ठेवलाय. काय खरं? हा संभ्रम माझ्या मनांत गडद काळोख करतोय. तो कोणी दूर करेल का? वाटा पहातो.

# मनोगत

## *काळोख ची जन्मकथा*

काळोख ही कथा कशी सुचली?

कित्येकांनी हा प्रश्न विचारला. तसा कोळ्यांशी माझा पहिला संबंध १९५२-५३ सालीच आला होता. मला माझे काका मुंबईला टेक्निकल स्कूल मधे घालायला म्हणून घेवून आले पण घातले म्युनिसिपल स्कूल मधे.

आम्ही त्या वेळी खारला २१व्या रस्त्यावर अगदी खाडी काठावर राहात होतो. शाळेत ९०% कोळ्यांची मुलं होती. त्या वेळी मी कोळी बोली छान शिकलो होतो.

लहानपणापासून हूड, दंगेखोर वगै
त्यामुळे पुढच्याच वर्षी गावी रवानगी झाल
आठवणींवर माझी एक गोमती नावाची क



मैत्रबंध ह्या कथा संग्रहात वाचायला मिळेल) गावी आल्यावर कोळयांचा संपर्क पूर्णपणे संपला. १९६८ मधे योगायोगाने परत आला.

मी इंजिनीयर होऊन नोकरी करू लागलो. माझ्या डिपार्टमेंटला मालाड मार्वेच्या कोळयांचा भरणा होता.

नारायण नावाचा कोळी त्यात दांड्या मारण्यात पटाईत होता. एकदा मी त्याला हटकताच तो म्हणाला, "कंपनी काय पगार देते? चार रुपये रोज. समुद्रात आठ तास बलेव(पडाव) फिरवला तर सहज दिडशे दोनशे कमावतो मी."

मी पहातच राहीलो. महिन्यातल्या २५-२६ वर्किंग डेज मधले हा बारा चौदा दिवस भरायचा. हळू हळू त्याला समजून घेतला. तेव्हा समजलं हा इतर दिवशी मासे मारायला पडाव घेऊन समुद्रात जातो.

लहानपणी मुंबईत असताना सारखं वाटे, आपण एकदा समुद्रात जाऊ. तो विचार बळावत गेला.

मी तेव्हा मोठ्या बहिणीकडे गोरेगावला राहात होतो. एक दिवशी नारायणच्या घरी गेलो आणि समुद्रात जायचा दिवस पक्का करून आलो.

त्या रात्री अनुभवलेला तो समुद्र, तो काळोख मनात बसून गेला.

त्यानंतर तब्बल पन्नास वर्षांनी, तीन वर्षांपुर्वी मुंबईला गेलो होतो. मार्वे-मनोरी कडे जाताना नारायण आठवला. मिळतो का बघायला मार्वेच्या खारवणा आधी लागणारा उजव्या बाजूला जाणारा रस्ता अंदाजाने शोधला. मुंबईने प्रचंड कायापालट केला होता. पण रस्ता मिळाला. आता तो बराच

मोठा झाला होता. दोन्ही बाजूला मोठमोठ्या इमारती झाल्या होत्या. पण शेवटी खारवणाच्या बाजूच्या त्या कोळयांची जुनी घरं दिसली. आनंद झाला. नारायण आता माझ्या सारखाच झाला असणार. आहे तरी की… असा नको तो विचार क्षणभर आला. त्या घरां पर्यंत चालत गेलो. चौकशी केली साकीनाक्याला कंपनीत नोकरी करायचा ही ओळख दिली. लगेच एकाने घर दाखवलं. नारायणाचा मुलगा समोर आला. अगदी दुसरा नारायण. त्याने बाबाला बोलावलं. “कोण तुम्ही ओळखलं नाही. मी म्हटलं, “मलीक आठवते? तुझा साहेब आठवतो? तुझ्या बलेव मधून एक रात्र तुझ्या बरोबर समुद्रात आलेला?”

नारायण जवळजवळ ओरडलाच, “कुळकर्णी सायब तुम्ही? किती वर्षे झाली? आठवण ठेवलीत?” पहिला आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर माझं आदरातिथ्य चुरचुरणाऱ्या ताज्या उतरवलेल्या गोड ताडीने केलं. तो त्यांचा रिवाज होता.

मी विचारलं कसा आहेस? हा काय एकदम फिट. आजून बलेव घेऊन जातो. दोन मणांचं जाळं खेचतो. आता माशांना भाव येतो. दोन बलेव यमाचं(यमाहा) इंजीन बसवलेलं आहेत. मेहनत करतो. फिट आहे डॉक्टरकडे अजून कधी गेलो नाही.

हे सगळं तो कोळी भाषेत बोलत होता. मी खजील होत होतो. दहा बारा गोळ्या रोज खाल्या नाहीत तर आपलं काय होईल असा जगणारा मी.

लवकरच निघालो. निघताना मुलाने आवर्जून माझा फोन नंबर त्याच्या फोन मधे घेतला.

परत एकदा कोळयांच्या जीवनाची उजळणी माझ्या मनात मधूनच व्हायला सुरवात झाली. हेवा वाटायचा त्यांच्या सगळयाच आयुष्यक्रमाचा.

सहा महिन्यां पूर्वी फोन आला. नारायणचा मुलगा रडत सांगत होता. बाबा गेला. त्याला करोना झाला त्यातच गेला.

सगळं परत आठवलं. तो समुद्र, ती काळोखी रात्र. घरी जाताना त्याने पिशवी भरून दिलेले मासे, घरी पोचल्यावर बहिणीने केलेली उलट तपासणी. भाओजीनी वडलाना लिहिलेले माझे प्रताप. सर्व डोळया समोर आलं.

कोणत्याही कथेचा गाभा हा अनुभव असतो. त्याशिवाय गोष्ट जीवंत होऊ शकत नाही.

कोळी भाषेत मी लिहायला असमर्थ होतो म्हणून गावच्या गाबीतांना गोष्टीत आणले. मालवणी बोली वापरली व थोड्या रंजक प्रसंगांचा समावेश केला एवढाच फरक.

कित्येकांची कष्टाळू आयुष्य पाहीली आहेत. सुचतील तशी आपल्या समोर ठेवायचा मानस आहे.

ही आहे काळोख या कथेची जन्मकथा.

# भोवरे

३, ४ वर्षांचा असेन बाबाने पहिल्यांदाच पोहायला शिकायसाठी गावच्या नदीवर नेले. पोहायला जायचं या विचारानेच अंगात एक अनामिक उर्जा संचारली होती. खूप काही मनात ठरवून ठेवलं होतं. सकाळपासून हवेत हात मारत भिर भिर फिरत होतो. कोणी पहात नाही पाहून झोपाळ्यावर आडवे झोपून हवेत लटकणारे पाय व हात मारून पाहिले होते.

आमची नदी देखील पल्याड गावाला फितूर असल्यासारखी पसरली होती. आमच्या गावाकडचा काठ अगदी पाऊल भर पाण्या पासून चालू व्हायचा. पल्याड गावाच्या बाजूला उंच घळ तुटलेली व पाणी दोन अडीच पुरुष खोल होते.

बाबाच्या मागून पाण्यात उतरलो. हात पकडायला गेलो तर सोडवून घेत म्हणाला,"पाऊलभर पाण्यात पकडतं कशाक. पाणी गळ्यापर्यंत इला की घेयन पाठीर. पलीकडच्या घळीवर जावचा हा." बापरे! तिकडे तर दोन

पुरुष पाणी. पहिल्याच दिवशी मोठ्या पाण्यात? पण हरकत नाही बाबा आहे बरोबर अशी मनाची समजूत काढली.

सरसर पोहत जाणाऱ्या बाबाच्या पाठीवर झोपून गळयाला घट्ट मिठी मारली होती. घळीवर बाबा मला पाठीवर घेऊनच चढला."चला मारा उडी" हुकूम सोडला.

खाली हिरवे निळसर पाणी खोली सांगत होते. एकदा वाकून पाहिलं आणि पोटात गोळा आला. बाबाने विडी पेटवून झुरके मारायला सुरवात केली होती. म्हणजे ती संपे पर्यंत हा काही ऊडी मारणार नाही. एकटाच कसा उडी मारणार? माझ्या मनात भिती वाढत होती."एकटोच मारू ऊडी? बुडाक नाय व्होवचा?"

"पाणयात पडला काय येतला बरोबर. मार उडी."

परत एकदा खाली बघीतलं. हिम्मत होईना. एवढ्यात कुल्याखाली हात आला आणि मला त्याने पाण्यात ढकललं. ८ - १० फूट उंची वरून त्या खोल पाण्यात पडलो चार पाच फूट खोल पाण्याखाली गेलो. वाकडे तिकडे हात पाय हलवत वर आलो आता गटांगळया खात होतो. नाका तोंडात पाणी गेलं होतं. डोकं पाण्याबाहेर आलं की जोरात ओरडायचो. "मेलंय, बुडतंय, रांडेच्या भायर काढ माका" *कोकणात त्या काळात बाबाला पण एकेरीत संबोधत आणि शिव्या तर सर्वच एकमेकाना घालीत. आता खूप सुधारलेत. असो*

तीन चार गटांगळ्या नंतर एक हात पोटाखाली आला. मला पाण्यावर तरंगायला मदत करू लागला. "मार हात पाय, येतला बग तरंगूक" मी त्याच्याकडे जायचा प्रयत्न करायचो तो लांब व्हायचा. मला पोटाखालून हाताने ढकलत समोरच्या किनाऱ्या कडे नेत होता. पाणी कमी होत गेले. माझेपाय जमनीला लागले आणि मी किनाऱ्याकडे धूम ठोकली. कपडे वगैरे गोळा न करता घरच्या दिशेने धूम ठोकली. नाकातून गेंगाणा आवाज येत होता. कानात गेलेले पाणी फुरफुरत होते. तोंडाने त्याला शिव्यांची लाखोली वहात मी घर गाठले. अंग न पुसताच कणगीमागे दडून बसलो. आता बाबा आला की ठोकणार ही भिती.

बाबा पट्टीचा पोहणारा म्हणून काय त्याने आपल्या पोराला असा एकदम खोल पाण्यात ढकलायचा? राग आला होता बाबाचा. कणगी मागे बसून असले विचार करता करता मी बाबाला शिव्यांची लाखोली वहात होतो. बरोबर भिती पण होती, घरी आला की ठोकणार हा मला. ठरवलं कणगीमागून बाहेर पडायचं नाही. पण हळू हळू पोटात खड्डा पडतोय जाणवू लागलं. तो यायच्या आत घरातून पोहे आणि गुळाचा खडा पळवून आणायचा क्षणभर विचार आला. नको रे बाबा तेवढ्यात बाबा आला तर आयते हातात सापडू. मारा पेक्षा भूक बरी. विचारांचे असंख्य भोवरे मनात फेर धरत होते. भुकेने पोटात गुरगुरायला लागलं होतं. त्यातच नाक सुरसुरायला लागलं होतं. तीन तीन भोवऱ्याना तोंड देत मी चूप बसायचा आटोकाट प्रयत्न करत होतो.

"झील इलो काय गो?" बाबा आला होता.

"नाय बा! अजून येवक नाय" कोणीतरी कामगार बाईने उत्तर दिलं.

"नाय कसो! पोचलो आसतलो. दडान बसलो असात."

बाबाला मी काय करणार हे आधीच कसं माहीत पडतं. माझी शोधा शोध सुरू झालेली समजली आणि जास्तच अंग चोरून मी कणगी व भिंतीच्या मधे घुसायला पाहिलं.

" काय केलान तेणी? दडात कशाक?" कोणी बाई विचारीत होती. बहुदा आते होती.

"काय नाय वाघाच्या पोटाक शेळी जन्माक ईली ती. पोवक शिकाक गेल्लो. मेलो पाणयाक भिता कसलो! चल माका भूक लागली हा. वाढ जेवक." बाबा

"मी हय भुकेलय नी बाबा जेवतलो. घास जाता तरी कसो हेका?" माझ्या मनात आले. पण तेवढ्यात घात झाला. नाकात सुरसुरत होते आता जोराची शिंक आली. बेंड फुटले. आतेने कणगी मागून बाहेर काढले. बावळा पकडून नेऊ लागली आणि मी भोकांड पसरून तिला सांगू लागलो,"गे कुटात माका तो. सोड माका. दैत्य हा. मारून टाकीत."

माझा अवतार बघून सगळे हसू लागले. तेवढ्यात बाबाचा आवाज आला, "ये रे माज्या सोन्या. मारीत नाय आता तुका. भुक लागली ना? ये जेवक बस हय." मग वर मान करून माझ्या कडे बघून एकदम हसू लागला "कोणीतरी चड्डी घाला गो तेका. नदी वरसून दिगंबरच ईलो हा तो. भित्रो,

शेळपट.... " दहा बारा विशेषणं आणि पंधरावीस शिव्या ऐकता ऐकता मी त्याच्या पासून दोन हात लांब बसलो. न जाणो जवळ गेल्यावर मारलंन तर!

पण मग काहीच झाले नाही. भरपूर जेवून उठलो आणि झोपाळ्यावर लवंडलो तो गाढ झोप लागून गेलो.

जाग आल्यावर हुंदडताना बाबावरचा राग केव्हा पळाला ते समजलं नाही. रात्री जेवून झाल्यावर तासाभराने बाबाने झोपायची तयारी केली. त्याने भजनं किंवा कविता म्हणायला सुरवात केली की समजायचं, हा थोड्याच वेळात खर्ज लावणार.

त्याच्या भजनाचा आवाज आला आणि मी धावतच येवून त्याच्या कुशीत शिरलो. तो गायचा पण मला आवाजाचे भोवरे बनवायला मजा यायची.

मी त्याच्या कुशीत शिरून एक हात आणि एक पाय त्याच्यावर टाकून त्याला अगदी चिकटून झोपे. एक कान त्याच्या पोटावर दाबे. आता त्याचे भजन एकाद्या मडक्यातून घुमत आल्या सारखे वाटे. त्याने आलाप घ्यायला सुरवात केली की कानाचा दाब कमी जास्त कमी जास्त करत बसे. आवाजाच्या लहरी त्यामुळे मस्त फेर धरीत. या लहरी मेंदूत गोल गोल भोवरे निर्माण करत. गुंग होऊन हा खेळ करायला जाम मजा वाटायची. त्याच गुंगीत झोपून जात असे.

हा भोवरा आज काल बाबा रामदेवने शिकवायला सुरवात केली आहे. त्याने त्याचं नाव भ्रामरी प्राणायाम ठेवलंय. करत असाल तर

कानावरची बोटं जरा दाबा हलकी करा दाबा मग मेंदूत आवाजाचे तयार होणारे भोवरे तुम्ही देखील अनुभवाल. पण मी आवाज बाबाचा वापरायचो एवढंच. तो भोवरा असा मी लहानपणीच अनुभवला होता.

सकाळी न्याहारी करताना बाबा विचारू लागला, "काय रे पोवक जायचा ना?"

"तू जा. मी नाय येवचंय तुझ्याबरोबर बूडवून मारशीत माका."

"अरे! पोवक नको येवक. पूर येवन पाणी भरला गावात तर काय करशीत?"

"शिकान माजो मी. जायन संभू बरोबर तो शीकवात माका."

संभू आमचा शेतीचा गडी.

पोहणं शिकणं ही गावची गरज होती.

गावाच्या पुर्वेला सह्याद्री, उत्तरेला नाटळची नदी, दक्षिणेला एक मोठा ओढा आणि पश्चिमेला पुरी हद्द ठरवत वाहणारी गडनदी. त्यामुळे पाऊस जरा जास्त झाला की तिन्ही दिशांनी पाणी गावात शिरे. कुठे पाऊलभर पाणी तर कुठे पुरुषभर पाणी. कोकणाची जमीन सपाट मिळणं कठीण. सगळी कडे उंच सखल शेतं,खड्डे. पुराचे पाणी हा हा म्हणता भरे. त्यामुळे पोहता येणं ही गरज होती.

गडनदी तुडुंब भरून व्हायला लागली आणि तिने काठ सोडला नसला तर तिचं रौद्र पहायला मजा येई. मातकट रंगाच्या पाण्याने दुथडी भरून वाहणारी गडनदीचे पाणी रोरावत धावत असे. खडकं, कपाऱ्या, घळीवर आपटत पाणी धावत असे. आपटण्यामुळे पाण्याची दिशा बदले. त्यामुळे पाण्यात असंख्य भोवरे तयार होत. हे भोवरे म्हणजे मृत्युचे सापळे होते. एखादा या भोवऱ्यात सापडला तर जिवंत सुटणे कठीण.

या भोवऱ्याकडे व धावत्या पाण्याकडे पहाताना हळू हळू आपल्यालाही भोवळ यायला सुरवात होई.

भोवळ-मेंदू गरगर फिरू लागला की माणूस पडतो किंवा मटकन बसतो कारण त्याच्या मेंदूत भोवरा फिरू लागलेला असतो.

नदीच्या भोवऱ्यानी खूप काही शिकवलं. धैर्य, हिम्मत, संकटाशी दोन हात करण्याची क्षमता. एवढंच काय जगायचं कसं हे शिकवलं ते या भोवऱ्यानी.

आता मी संभा बरोबर दररोज नदीवर जाऊ लागलो. गुरांना पाण्यात प्रवाहाच्या खालच्या दिशेला सोडून आम्ही वरच्या दिशेला पाण्यात शिरू. दहा वाजता पाणी थंडगार असे. अंगावर शिरशीरी येई. एकदा पाण्यात शिरले की थोड्याच वेळात थंडी गायब होई.

संभाने पोटाखाली हात घालून हात कसे मारायचे पाय कसे मारायचे शिकवले. हळू हळू ती लय सवयीची झाली. दोन दिवसात मी छान पोहू लागलो. इथेही घळीच्या बाजूला पुरूषभर पाणी होते. तिसऱ्या दिवशी मी पुरुषभर पाण्यावरून पोहायचे ठरवले. गोल चक्कर कापायची. मी खोल पाण्याकडे जाऊ लागलो तसा संभा कोकलू लागला, "धन्यानु पाठी फिरा! लय पाणी हा." पण मी कशाला ऐकतो. मस्त मजा येत होती. संभा जोरात हात मारत माझ्या जवळ आला आणि बाजूने पोहू लागला. मी चक्कर पुरी केली. छान दमछाक झाली होती. कंबरभर पाण्यात हापत उभा होतो. संभा कौतुकाने बघत म्हणाला, "धन्यानु चांगला येवक लागला पोवक. आता जावा मोठ्या धन्यां बरोबर नी दाकवा उडी मारून. भालकोंड पार करश्यात सहज."

बाबाने पहिल्यांदा नेले होते ती भालकोंड होती. आता आम्ही आलो होतो ती उंबराची कोंड होती. मधे होडीचा साणा आणि एक कोंड होती. म्हणजे आम्ही बाबा पासून खूप लांब होतो.

पावसाळ्यात नदी दुथडी भरून वहायची. पावसाळा संपला की महिना भर प्रवाह एकसंध असायचा. कोकणातल्या वलाटपट्टीतल्या नद्याचे पाणी भरभर वाहून जायचे. मग राहायच्या त्या कोंडी. आमच्या गावच्या हद्दीत चार पाच कोंडी होत्या. भालकोंड, होडीचा साणा, उंबराची कोंड अशी काय काय नावं आज आठवतात. या कोंडी प्रवाहाने आता जोडलेल्या नसत.

पाऊस संपला की महिना दोन महिने चांगला मोठा प्रवाह या कोंडी ना जोडलेला असे. गडनदी तेव्हा एकसंध असे. अशा एकसंध मोठ्या प्रवाहात. खूप लहान मोठे भोवरे असत. म्हणून प्रवाह छोटा होईपर्यंत गावचे लोक मुलाना नदीवर जायला देत नसत. भोवऱ्यांच्या चिकार गोष्टी ऐकायला मिळायच्या. गावातला कुणी गडनदीत बुडून वाहून गेला की या गोष्टीना उत येई.

"भोवऱ्यान खेचला आसतला नायतर पट्टीचो पोवणारो होतो." इथपासून ते भोवऱ्यात सापडलं तर तो फोडून बाहेर कसं पडायचं इथ पर्यंत सगळया गोष्टी उगाळल्या जात.

"संभा तुका भोवरो फोडूक येता?" माझा प्रश्न ऐकून संभा एकटक माझ्या कडे पहात म्हणाला, "धन्यानु अजून मॉप येळ हा तुमका भोवऱ्यात शिरूक. दोन चार वर्सा जावदे. थोडे मोठे झालास की शिकवान तुमका. पण आदी खावन पिवन टुणटुणीत व्हा. लय ताकद लागता भोवरो फोडूक." केव्हा का असेना संभा भोवरा फोडायला शिकवणार हे ऐकून मी खूष झालो. त्या आनंदात एक दगड पाण्यात फेकून गोल लहरी उठवल्या. आणि त्यात सूर मारून एक चक्कर पोहून घेतले. जणू काही आजच मी भोवरा फोडल्याचा आनंद मिळवीत होतो.

अशीच दोन तीन वर्षे गेली. दर वर्षी पावसाळ्याचे दिवस व ऑक्टोबरच्या मध्यापर्यंतचे दिवस सोडले तर दिवाळीअगोदरपासूनच

आम्ही नदीत डूंबायला जात असू. दहा वाजायच्या आत कपडे एकत्र करून नदीकडे निघत असू. पाण्यातले कित्येक उद्योग आता हळू हळू माहिती होत होते.

दिवाळी नंतर नदी एक संथ प्रवाहात वाहायची तेव्हा कित्येक ठिकाणी लांब रुंद असा संथ वाहणारा पाण्याचा पट्टा तयार झालेला असायचा. या पट्ट्यात पाण्याची खोली चार पाच फुटांपेक्षा जास्त नसे.

कोकणी सगळे मासेखाऊ. दररोज मिळाले तरी त्यांना कंटाळा नाही. समुद्राचे मासे एवढ्या लांब वलाटी गावात येत नसत. मग मोसमा प्रमाणे मासेमारीचे प्रकार बदलत. आम्ही वर सांगीतलेले पट्टे आधीच हेरून ठेवलेले असत. मग नदीवर येतानाचे सामान वाढलेले असे. कपड्यां बरोबर एक परात, एक पातेलं, एक जुना पंचा किंवा धोतराचा मोठा तुकडा व जरा आंबवलेली पेंड. हे सामान वाढायचे. आता मासे पकडायचा उद्योग चालू व्हायचा.

परातीवर कपडा घट्ट खेचून बांधायचा त्याला मधोमध एक भोक करायचे थोडीशी आंबवलेली पेंड आत टाकायची. आणि परात कंबरभर पाण्यात नदीच्या तळाला दगडांच्या आधाराने घट्ट बसवायची. आम्हा मुलांच्या अशा सात आठ पराती एका लाईनीत लागायच्या. पाण्यातून हळू बाहेर पडून नदीत वर लांब जाऊन डुंबायला, खेळायला लागायचो. अर्धा एक तास झाला की परत येवून हळू पाण्यात शिरायचे. आपल्या परातीवरच्या भोकावर हात ठेवून परात पाण्यातून बाहेर काढून किनाऱ्यावर

यायचे. परातीत मासे फडफड करीत असायचे. किनाऱ्यावर प्रत्येकाने आपले पातले नदीच्या पाण्याने अर्धे भरून ठेवलेले असे. परातीत पकडले गेलेले मासे त्या पाण्यात काढून परात कपडा बांधून त्याच ठिकाणी लावून यायचे. असे चार पाच वेळ केले की एक वेळच्या कालवणाच्या माशांची सोय होई.

पेंड खायला कपड्याच्या भोकातून आत शिरलेल्या माशाना बाहेर पडता येत नसे. आम्ही मात्र दोन तीन तास नदीत डुंबत डुंबत. मजेत वेळ घालवू व घरी जाताना मासेही घेऊन जाऊ.

घरी पोचायला एक दीड वाजून जाई. बाबा झोपलाय याचा कानोसा घेऊन मगच आत मी शिरे. बाबा जागा असेल तर गोठ्यात थोडावेळ दडून बसायचे ठरलेले.

एवढा वेळ नदीत डुंबत होतो समजले असते तर बाबाने उभा आडवा फोडून काढला असता. असा मार कित्येकदा खाल्लापण होता.

खरं सांगू मासे पकडण्यापेक्षा तो खेळ मजा द्यायचा. परातीत पाच सहा मासे मिळाले तर ते कोणते आहेत हे पहायचे. सगळ्या मुलात चढाओढ असायची. कोणाला किती मळवे मिळाले किती खवळे मिळाले, किती शेंगट्या याचा हिशोब व्हायचा. मग सगळ्यात जास्त मासे कुणाला व सर्वात जास्त मळवे कुणाला मिळाले यावर नंबर ठरे. ही मजा तीन तास अनुभवायची तृप्त होऊन मग घरी जायला निघायचे. काय आनंदी दिवस होते ते! पण या दिवसात नदीच्या पाण्यात भोवरे नसायचे आणि आमच्या



Fig 9: Hook and line



Fig 10: Outside view Box trap



Fig 11: Inner view Box trap

आयुष्यातही. सगळं कसं वेळा पत्रकाप्रमाणे आयुष्य चालायचं. पावसाळया अगोदर लोंढा नदीत कितीतरी लोकानी कीव बांधलेले असत. त्याचे धबधबे लोंढ्यात जाग जागी दिसत. या गावच्या लोकाना हे भौतिकशास्त्र कसं माहीत पडलं याचा मला प्रश्न शाळेत सहावी सातवीत गेल्यावर पडू लागला होता. कीव हे प्रकरणच तसे जबरे होते.

चार पाच घरचे लोक एकत्र येवून नदीच्या उताराचे पाणी दगडाची पारी बनवीत अडवीत जात व शेवटी दोन दगडांचेच खांब बनवून त्यावर एक वासा आडवा ठेवत. ऊभे दहाबारा वासे नदीच्या पात्रात लावत. वर झाडांचे टाळ टाकत व त्यावर नदीतले दगडगोटे टाकून झाले की मस्त नदीचा पारीतून आलेला प्रवाह त्यावरून जाई. आडव्या वाशाच्यापुढे एक छान तीन चार फुटी धबधबा तयार होई.

इथून पुढे मात्र शास्त्राचा एक अजब आविष्कार पहायला मिळे. आडव्या वाशाच्या खाली मागच्या बाजूला छान पोकळी झालेली असे. वाशामागे वरून मोठ्या बांबूतून बनवलेले पाईप त्या खालच्या पोकळी पर्यंत घुसवीत आता वरून जाणारे पाणी. व खालच्या पोकळीमुळे जो दाबातील फरक तयार होई त्यामुळे पाणी जोरात खाली खेचले जाई. त्या

बांबूच्या खालच्या बाजूला नदीतल्याच चिवट वेलींची करंडी बनवून लावत. त्या बांबूंच्या पाईप मधे एवढी खेच तयार झालेली असे की पाण्याबरोबर मासे खेचले जाऊन खालच्या करंडीत जमा होत. रात्रभर असे जमा होणारे मासे त्या दहा बारा करंड्यातून सर्व कीव बांधणारे वाटून घेत.

## कीव व त्याची रचना

पहिल्या फोटोत दिसणारा ऊताराचा भाग. दोन्ही बाजूने दगडांचा बांध बनवून पाणी कीवावर जाण्याची केलेली योजना स्पष्ट दिसते. पाणी या बांधातून येवून दुसऱ्या फोटोत दिसणाऱ्या कीवा वरून धबधब्या सारखे पडते.

आडवा लावलेला वासा व ऊभे लावलेले दांडे दुसऱ्या फोटोत स्वच्छ दिसतात.

पाऊस पडला कीं यावरून कमीत कमी एक ते दीड फूट ऊंचीचा प्रवाह वाहू लागतो. व कीवा वरून पडू लागला की वाश्याच्या मागे एक पोकळी तयार होते. तिसऱ्या फोटोत वाश्याच्या मागे करंड्या लावलेल्या दिसत आहेत. या करंड्या वरून घुसवलेल्या पोकळ बांबूच्या नळ्यांवर बसवलेल्या असतात. कीवावर दीड फूट पाणी व कीवा खालील पाण्याची पातळी अजून दीड दोन फूट खाली. त्यामुळे बांबूच्या नळ्यातून पाणी खाली जोरांत खेचले जाते. बरोबर मासेही खेचले जातात. हे मासे करंडीत अडकतात. पाणी मात्र जाळीदार करंडीतून वहात रहाते. कीवा खाली बुडून करंडी तोंडावर हात ठेवून बाहेर काढायची व फडफडणारे मासे गोळा करायचे. चार महिने मासेच मासे मिळत रहातात. तेही ताजे.

केवढे मोठे हायड्रॉलीक ईंजीनियरींग वापरलेय या कोकण्यानी?









मागे बसवलेली बांबची नळी



वेलीतून बनवलेल्या करंड्या

बडोद्याहून माझ्या कांही मित्राना गावी घेऊन गेलो होतो तेंव्हा हे कीव प्रत्यक्ष दाखवल्यावर ते आश्चर्यात पडले होतै.

कित्येक लोक या किवातून माशाच्या करंड्या काढताना आत अडकून जीव गमावून बसले होते. तरीही हे आजही बांधले जातात. माशाच्या कालवणासाठी मालवणी माणूस काय डोके लढवेल ते त्यालाच ठाऊक.

नेहमी प्रमाणे संभाकडून मी कीवात बुडी मारून करंड्या काढायचे व परत बसवायचे तंत्र अवगत केले होते. आता मात्र तशी बुडी मारायची हिम्मत होत नाही.

दहा अकरा वर्षाचा झालो होतो. अर्ध्या शेराचा भात कालवणा बरोबर सहज रीचवत होतो पण अंगावर काही चढत नव्हतं. नुसतं हाडं आणि कातडी. बाबा म्हणायचा उनातानात तिडतीड करतो काय खाल्लेलं अंगाला लागणार!

मी सारखं संभाकडे टुमणं लावायचो. "संभा या वर्षी मला तू भोवरा फोडायला शिकवायचा. बघ विसरू नको." संभा हसत म्हणे, "धन्यानु जरा मास चढवा आंगार. नायतर भोवरो दोन चार हाडा पिळवटून ठेवीत तर नसती पंचायत."

या वर्षी काही झालं तरी पाऊस संपता संपता गावी यायचं आणि संभाच्या खनपटीला बसून भोवरा फोडायला शिकायचंच असा निश्चय

केला. आता शाळेसाठी आम्ही कणकवलीला रहात होतो. गाव दहा बारा मैल सह्याद्रीच्या पायथ्याला होतं. मंगळवारच्या कणकवलीच्या बाजारासाठी आलेल्या बैलगाडीतून गावी जायचं किवा सोबत बघून चालत जायचं. पावसाळ्यात तुडुंब भरलेल्या नद्यांचे पाणी ओसरायला अजून वेळ होता. बस पाणी ओसरल्यावर चालू व्हायच्या. बैलगाडीचा प्रवास म्हणजे एक दिव्य होतं. दगडाळ खडकाळ रस्त्यावरून बैलगाडीतून जाताना हाडे खिळखिळी होत. पण तरीही गावच्या ओढीने सगळं सहन करण्याची सवय पडून गेली होती.

या वर्षी मी सप्टेंबरातच गावी जायला निघालो. आमची बैलगाडी आली नव्हती म्हणून गावातल्या एका ओळखीच्या बैलगाडीवाल्याला विचारून सोय केली.

हा प्रवासही मजेदार होता. गाडी चढावर आली की मी आणि बैलगाडीवाला दोघेही उतरून चालत असू. तेवढेच बैलांना वजन कमी. उतार आला की बैलांना गाडीवाला पळवे. मग असले धक्के बसत की माय आठवे.

शाळेला दांडी मारून, सुट्टी अगोदर महिनाभर लवकर निघालो होतो. शेती कामासाठी सगळेच जात त्यामुळे शाळा सुस्तावलेली असे. खरं शिकवणं दिवाळीच्या सुट्टी नंतर चालू होई. शाळेची परवानगी वगैरे गोष्टी आमच्या गावच्या शाळेत आल्या नव्हत्या. सगळेच शेती करायला जात, मास्तर सुद्धा. मग कोण कुणाची परवानगी घेणार?

रात्रभर बैलगाडीचा प्रवास करून पहाटेला गावी पोचलो. घर सगळं सुस्त झोपलं होतं. बाहेरच्या ओटीवर झोपलेल्या संभाला दबक्या आवाजात हाक मारली. संभाने आडणा काढून मला घरात घेतले. मी तोंड धुवून सर्व आवरून बाबाच्या बाजूला पहुडलो. आता सकाळी बाबा उठला की त्याला मी आलेला बघून धक्का बसावा ही मनोमन इच्छा होती.

जरा झोपेची गुंगी चढतेय तो पर्यंत पहिल्या कोंबड्याने बांग दिली आणि घर जागे होऊन कामाला लागले. जात्याच्या घरघराटातून ऐकू येणाऱ्या ओव्या आता नवीन गुंगी चढवू लागल्या. केव्हा गाढ झोपेत गेलो समजलं नाही. पण झोपेत एक सुंदर स्वप्न पडले.

संभा मला वेगवेगळे भोवरे दाखवतो आहे. फोडायचे कसे ते सांगतो आहे. मी भोवऱ्यात जायला उतावळा होतोय आणि तो माझा हात घट्ट पकडून मला पुढे जाऊ देत नाही. मी ओरडतोय. "सोड! सोड!" तेच ओरडत जागा होतो.

सगळे आटपून मी दहा वाजता तयार होतो. संभाला गाठून सांगतो, "चल लवकर. आज भोवरा फोडायला शिकव."

"धाकलं धनी. जागराण झालाहा आज आराम करा उद्या शिकवतय. आज धन्यानी वय बांधुचा काम दिला हा. ता पुरा करतंय सांच्या पर्यंत. मग उद्या जावक बरा."

मी खट्टू झालो. सप्टेंबर महिना, नुकताच पाऊस संपलेला, नदी तुडुंब भरली असणार, पावसाची लक्षणंही दिसतायत. बाबा पण जायला देणार नाही. शेंदायचे काढणे गपचुप उचलले आणि विहीरीवर आंघोळीला गेलो.

संभा हुशार होता मला त्याने मुद्दामच नदीवर नेलं नव्हतं. दुपारची झोप काढून नुकताच उठत होतो तर बाहेर चाललेलं बोलणं कानावर पडलं.

"धन्यानु! धाकले धनी भोवऱ्यात जावसाठी खनपटीक बसलेत माज्या. काय करू?" संभा बाबाला विचारत होता.

"जा घेवन! नायतर तो एकटोच गेलो नजर चुकवून तर घोळ करून ठेवीत. पण अगोदर तेचो श्वास बघ किती रोखता तो. तुका म्हायत आसा काय काय बघायचा ता. आणि हो! त्या मोहन ठाकराक घेवन जात जा. तो पट्टीचो हा पोवणारो. पुरातय पोवता."

मला आनंद होत होता. बाबा भोवऱ्यात जायची परवानगी देत होता. आता नक्कीच मला भोवरा फोडता येणार होता.

संध्याकाळी संभा म्हणाला,"उद्या जावया हा नदीर पण आदी थोडी तयारी करूची लागतली. या बसा माज्या फुड्यात. आणि खोल श्वास घेवन रोखून धरा. मीय धरतय तुमच्या वांगडा (बरोबर). कोण जास्त धरता बघुया."

मग आमची श्वास रोखायची शर्यत सुरू झाली. मला माहीत होतं, भोवऱ्यात जायची ही पूर्व तयारी होती. मी खोल श्वास घेतला. रोखून धरला. बोटानी नाक गच्च बंद केलं होतं. संभानेही माझ्या बरोबर श्वास रोखला

होता. थोड्याच वेळात डोळे जड होऊ लागले. श्वास घ्यायला जीव अधुरा झाला पण तसाच रोखून धरला. संभा श्वास सोडत नाही तोपर्यंत मी पण सोडणार नाही ठरवले. थोड्याच वेळात डोक्याची शीर ताड ताड उडू लागली. भोवळ आल्यासारखे वाटू लागले. श्वासासाठी कासावीस होऊ लागलो. आणि भसकन श्वास सुटला. संभाने हळू हळू श्वास सोडला व म्हणाला, "बरो धरलास! पण एवढो नाय पुराचो. दोनचार दिवस श्वास पकडूचा करुया. मगच भोवऱ्यात शिरूया. घाय करायची नाय. ह्या भलता जोखमीचा काम हा." भोवऱ्यात जायला मिळणार मग मी सगळं मान्य करत होतो. संध्याकाळीच एकटा बसून श्वास रोखून धरला. मनात एक दोन मोजायला सुरवात केली. कमीत कमी शंभर मोजे पर्यंत श्वास सुटता नये हे संभाने सांगीतले होते. मी कसाबसा साठ सत्तर पर्यंत पोचत होतो. खूप मेहनत घ्यायला लागणार हे मला माहीत पडलं होतं.

दुसऱ्या दिवशी नदीवर जाताना संभाने सांगीतलं, आज भोवऱ्यात शिरायची घाई नाही करायची. तो मला लहान मोठे भोवरे ओळखायला शिकवणार होता.

नदी वर पोचलो. नदी दुथडी भरून वहात होती. पाणी काचेसारखे स्वच्छ होते. होडीच्या साण्यावर नदी थोडी सरळ होती. म्हणून भोवरे कमी होते. होते ते जरा लहानच होते. संभा मुद्दाम मला तिथे घेऊन आला होता. लहान लहान भोवरे तेवढे धोक्याचे नसतात म्हणूनच तिथे आणलं होतं. मग संभा सांगू लागला, "धन्यानु! भोवऱ्यात वर बघा कशी गोलाई असता ती.

पाणी गोल फिरता. मधीच खड्डो पडल्या सारखो दिसताना तोय बगा. जेवडो खड्डो जास्त तेवढी भायरची गोलाई मोठी. असे भोवरे खूप खेचतत. जेंची गोलाई नी खड्डो कमी त्या भोवऱ्यात खेच कमी." आपल्या ताकतीच्या भोवऱ्यात शिरायचा. मोठ्यात शिरूक बगायचा नाय. गरागरा फिरवल्यान तर बुडून जाशात."

माझी शिकवणी जोरात सुरू झाली होती. पण संभा मला पुढे जाऊ देत नव्हता. मी देखील घाई करत नव्हतो. आता इथपर्यंत पोचलोय, आज ना उद्या नक्कीच भोवऱ्यात शिरायला मिळणार मग उगीच उतावळेपणा कशाला.

आज आयुष्यात पहिल्यांदा असा संयमी विचार मनात आला. भोवरा फोडायच्या आधीच आतून ही जाणीव येत होती. मला भोवरा प्रगल्भतेकडे ढकलत होता की काय? मी दुडदुड्या, मला संयमी बनवत होता की काय?.

एवढ्यात पाणी हळू हळू मातकट होतेय की काय वाटू लागले. छाती भर पाण्यात होतो पण आता ते गळ्या पर्यंत पोचत आले. संभाने मला पकडून काठाकडे धाव घेतली. "धन्यानु धावा होऊर (पूर) येतलो. जीव घेवून धांवत काठावर पोचलो. पाऊस नाही तरी पूर. हे कसं?

"वर डोंगरात कोसाळलो आसतलो. आता बगा कसा पाणी वाढात ता. आणि जोरदार भोवरे पण उठतीत ते."

काठावर ऊभे असलेले आम्ही हळू हळू मागे सरकत होतो. पाणी वाढत होते. मातकट रंग गडद होत होता. लहान मोठे भोवरे गर गर फिरत

होते. काहींचा मधला खड्डा तर चांगला वीतभर खोल दिसत होता. घेर देखील तीन चार फुटाचा दिसत होता. तिकडे बोट दाखवत संभा म्हणाला," धन्यानु! तो मोठो भोवरो बघितलास? यम हा तो. मीच काय पण माझो बापूस पण असल्या भोवऱ्यात जावचो नाय."

मोठ्या भोवऱ्याचं आज दर्शन झालं होतं. गढूळ मातकट पाणी गरगर फिरत होतं. वहात येणाऱ्या झाडांच्या फांद्या त्या भोवऱ्यात खेचल्या जाऊन त्याच्या पोटात नाहीश्या होत होत्या.

नदी पात्रातून बाहेर आलो खरे पण अजूनही आम्ही नदी पात्राच्या सुक्या किनाऱ्यावर होतो. पाणी वाढत होते. आम्ही हळू हळू मागे सरकत जात होतो. आता पूर्ण पात्र भरले आम्ही नदी काठच्या ऐनांच्या झाडा खाली आलो. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीचे मातकट पाणी त्यातील भोवऱ्यांचे दर्शन मला घडवीत होते. काठाकडचे भोवरे लहान होते मधल्या पात्रातले जोर पकडून फिरत होते. आता नदीचा आवाजही वाढू लागला होता. स्वच्छ पाण्याची खळखळ कमी होऊन नदी रोरावू लागली होती.

"धन्यानु जावया घराक? आता नदीत उतराक नको. जोराचो होऊर ईलो हा."

"थांब जरा. पाणी बघायला मजा येतेय." खरं तर मी लहान मोठ्या भोवऱ्यांचे निरीक्षण करत होतो.

"होऊर इल्ललो समजालो तर मोठे धनी काळजीत पडतीत. आणि उशीर केलव तर माका करवादतीत. चला जावया."

मी गपचुप त्याच्या मागून निघणार एवढ्यात समोरून मोहन ठाकर जाळं घेवून येताना दिसला. त्याच्या खांद्यावर जाळे, डोक्यावर टोपली आणि कमरेला बांधलेली करंडी होती. अवतारच दिसत होता. जवळ येताच म्हणाला," संभा! अरे हय काय करता? नदीत पोवक ईलास काय?"

"अरे धाकल्या धन्यांका भोवरो फोडूचो नाद लागलो हा. तेच्या साठी, पण आठावला बग! धन्यानी सांगीतला हा तुका बरोबर घेवक. मीय आसतलंय दोघे मिळून शिकवूया एक दोन ल्हान भोवरे फोडूक."

मोहनने मला पायापासून डोक्यापर्यंत न्याहाळले मग म्हणाला,"आजून दोन वर्षा जाव दे. उंची नाय नी जाडीय नाय. तुका म्हायत नाय भोवरो फोडूक ताकद किती लागता ती? येतय भेटूक धन्याकनी."

मला मोहनचा राग आला. दोन वर्ष थांबायचे? शिकवायचं तर शिकव नाय तर गेलास उडत. मनात म्हणत होतो.

एवढ्यात मोहनने काठावर टोपली ठेवली. ती वाऱ्याने उडून जाऊ नये म्हणून आत एक दगड ठेवला व जाळे घेवून पाण्यात शिरला. आता मी ढीम हलायला तयार नव्हतो. त्याला जाळे टाकताना, मासे पकडताना पहायचं होतं. एवढ्या जोरदार वाहणाऱ्या पाण्यात तो कसा तग धरून उभा राहाणार, जाळे टाकणार ते बघायचं होतं. संभा वर खाली होत होता.

मोहन आता कंबरभर पाण्यात उभा होता त्याने मस्त फुलोरा करून जाळे फार पुढे टाकले. हळू हळू जाळयाची दोरी ओढत तो पुढे पुढे खोल पाण्यात जात होता. पाण्याचा जोर जबरा होता. पाणी छातीभर झाले तसा

थांबला. दोर पुरा ओढून झाला. होता तो परत मागे कंबर भर पाण्यात आला. जाळे पाण्याबाहेर काढले तर आत आठ दहा मासे फडफडत होते. कांही चांगले वीत भर लांब होते. मासे करंडीत टाकून त्याने परत जाळे टाकले. तसाच पुढे पुढे जाताना दोर ओढत गेला. चार पाच वेळ जाळे टाकून झाले तशी करंडी भरली म्हणून बाहेर आला. सगळे मासे टोपलीत टाकून परत गेला.

"धन्यानु चला घराक! तो काय येवचो नाय तासभर. मोठे धनी माका जीतो नाय ठेवचे." संभा कोकलू लागला.

"जावा तुमी! मी येतय धन्यांका भेटूक. माशेय देयन तेंका." मोहनने ओरडून सांगीतले. आता नाईलाज झाला होता. घरी निघायलाच हवं होतं पण मन मात्र नदीवर घोटाळत होतं.

घरी पोचलो तर वडील बोललेच,"संभा अरे नदीक पूर ईलो हा ना? मग काय पुरात पोवत होतास काय रे?"

"नाय! नाय! मोहन ठाकर ईलो जाळा घेवन. धाकले धनी माशे पागतत कशे ते बघुक थांबले न्हय वो. मग काय करू? मोहन तुमका भेटूक येतय म्हणालो."

तासभर झाला असेल, मोहन आल्याचा आवाज आला मी बाहेर धावलो. बाबाला माशे दाखवून म्हणाला,"भोनी करा तुमी. काय देव?" मग बाबाने भरपूर मासे घेतले. त्याचे पैसे दिले व म्हणाले,"मोन्या माझ्या

झिलान(मुलाने) मनात धरलान भोवरो फोडूक शिकायच. ह्या काम कर बाबा. तुकाच जमात ता."

"आताच अजून कोवळे हत भोवरो फोडूक जावदे दोन वर्षां"

"बाबा! नाय थांबुचो तो. ते च्या ताकदीत बसात असो बघून शिकव."

"येतय उद्या"

मी आनंदलो. आता उद्या भोवऱ्यात जायला मिळणार याचा आनंद होता तो.

मोहन उद्या येतो म्हणून सांगून गेला, पण दुपार टळता टळता परत आला. बाबाने विचारले, "अरे आत्ताच ईलंस? काय काम काढलं?"

"काय नाय वायंच धाकल्यांका शिकवतंय. बगतंय तेंका दिशा पकडूक येतत काय."

मग मला बोलावले. मोहनने समोर ऊभे करून सांगीतले. तो मला गरगर फिरवणार होता. व तो थांबला की मी घरच्या दाराच्या दिशेलाच जायचे. दुसरीकडे गेला तर खरोखरच्या नदीत किनाऱ्या ऐवजी मोठ्या पाण्यात जायला होईल, बुडायलाही होईल. म्हणून कितीही गरगर फिरलं तरी दिशा पक्की मनात पकडता आली पाहिजे.

त्याने समोर उभे करून गरगर फिरवायला सुरवात केली आणि एकदम म्हणाला "भायर पडा." मी इतका गरगरलो होतो की कुठे जातोय तेच माहीत पडत नव्हते. बाहेर धावायला गेलो तर सरळ धावताच येईना. सगळं घरच

गरगर फिरत होतं. झोपाळ्यावर आपटणार एवढ्यात मोहनने पटकन पकडले. गरगर अजून थांबली नव्हती. दाराकडे जायच्या ऐवजी मी झोपाळ्या कडे गेलो होतो.

"असा नाय चलूचा, दाराकडे जायचा. भोवरो तुमका असोच फिरवतलो पण आपण किनाऱ्याची दिशा विसरायची नाय."

त्याने मला परत परत गोल फिरवून प्रॅक्टीस दिली पण मी दारा ऐवजी भलतीकडेच जात होतो. असे पाच सहा वेळ झाल्यावर मोहन वैतागला व संभाला म्हणाला "संभा तू ये उद्या. खोल पाण्याच्या दोन बाजूक सांभाळूचा लागात. मोहन गेला आणि मी विचारात पडलो. भोवरा फोडायला एवढं सगळं शिकायला लागतं? मग बाबाला, मोहनला, संभाला कोणी शिकवलं.

बाबाला विचारलं तर म्हणाला,"आम्ही तुझ्यासारखे शिरपुडे नव्हतो. आंगात ताकद होती. बारके बारके भोवरे फोडता फोडता मोठे भोवरे फोडायला आले. एक सांगतो ते लक्षात ठेव. भोवऱ्याने आत खेचले की विरोध न करता खोल श्वास घेवून खाली जायचं. खाली जोर कमी झाला की बाहेर मुसंडी मारायची. डोळे उघडे ठेवून नदीचा तळ बघायचा. तळ नदीपात्राकडे खोल होत गेलेला असतो. किनाऱ्याकडे चढ असतो. आपण चढाच्या दिशेने मुसंडी मारत पाण्या बाहेर यायचं."

हे शास्त्र मनाला पटलं. पण आता पोटात हुळहुळ वाढत होती. पहिल्यांदा भोवरा फोडणं सोपं वाटलं होतं. आता त्याची थोडी थोडी भिती वाटू लागली होती.

दुसऱ्या दिवशी साडेनव दहाला मी आणि संभा नदीवर पोचलो. होडीच्या साण्यावर आजही पाणी जोरदार होते. मोहन वरच्या बाजूला नदीत जाळे टाकताना दिसला. संभाने त्याला हाळी दिली.

मोहन आल्या बरोबर मी पाण्यात उतरू लागलो. तसा मोहन दम मारत म्हणाला, " धाकल्यानु पाठी फिरा. आमी येतव. आधी ऐका कसा भोवऱ्यात शिरायचा ता."

मी थांबलो. मोहन आणि संभा दोघेही पाण्यात उतरले. नदी पात्राच्या मध्याला भोवऱ्याला चुकवत संभा पोचला. मोहन प्रवाहाच्या खालच्या बाजूला गेला. मला ओरडून सांगू लागला, धाकल्यानु, " भोवऱ्याच्या वरच्या बाजून पोवत येवा भोवरो जवळ ईलो काय जोरात श्वास घ्या. जरा वेळ लावलास नी भोवऱ्याने खेचल्यान तर श्वास घेवक येवचो नाय."

छान फिल्डिंग लावली होती. भोवरा फोडून मी नदीच्या मध्या कडे गेलो तर संभा पकडणार, प्रवाहाच्या दिशेने गेलो तर मोहन पकडणार. प्रवाहाच्या विरूद्ध वरच्या दिशेने जाऊच शकणार नाही. राहीली ती दिशा किनाऱ्याकडे जाणारी. ज्या दिशेने मला जायला पाहिजे.

मी नदीच्या वरच्या बाजूला प्रवाहात शिरलो. पोहत भोवऱ्याकडे निघालो भोवरा जवळ येत होता गोल वर्तुळं दिसू लागली. श्वास घ्यायला गेलो. त्या आधीच भोवऱ्याने खसकन मला खेचले गोल गोल फिरवत पाण्यात दाबले. केवढा जोर होता. तो मला घुसळत आत नेत होता.

भोवऱ्याने खेचले व मी खोल पाण्यात गरगर फिरत ओढला गेलो खरा पण मी आता श्वासासाठी तडफडत होतो. खाली पोचताच जोर कमी झाला होता. पण बाहेर पडण्याऐवजी मी श्वासासाठी वर जायला पहात होतो. भोवरा मला घुसळत होता, पिळत होता माझी श्वासासाठी तडफड चालू होती. मरणार आता नक्की मरणार एवढ्या विचाराने हादरलो. झटकन कोणीतरी मला खेचले. भोवऱ्यातून बाहेर पडलो. श्वास रोखायची माझी ताकद संपली होती. तळमळत मी पाण्याखाली श्वास घेतला. नाका तोंडात पाणी जाऊ लागले. मी आता बुडणार मरणार वाटता वाटता शुद्ध हरपून गेली.

परत जाग आली तेंव्हा मी नदीकाठी दगडावर झोपलो होतो. मोहन माझे छाती पोट दाबत होता. खोकत ठसकत मी उठून बसलो. ठसक्या बरोबर तोंडातून पाण्याची धार लागली. मोहन पाठीवर धबाधब मारत होता. तसे राहिलेले पाणी बाहेर येत होते.

"दोन तांबे पाणी काढला तरी आजून येता? किती खाल्ला पाणी?"

मला बोलायलाही कठीण पडत होते. श्वास अर्धाच झालाय वाटत होते. डोके हलवले की नाकातून पाण्याची धार लागत होती. मी सावध व्हायला अर्धा तास तरी गेला असेल. उठायला गेलो तर भोवऱ्याने

पिरगळलेल्या शरीराच्या कित्येक भागातून प्रचंड कळा आल्या. जरा देखील हलू नये वाटत होते.

"धन्यानु जावया? चलशात? काय उचलून घेव?" संभा विचारू लागला. मी हातांनीच थोडा थांब म्हणून खूण केली.

"धाकल्यानु! सगळा इसारलासना श्वास घेवचो सांगितलंय तरी घेवक नाय. मी खेचलंय म्हणून हाताक गावलास. नायतर आज गेल्ललास वर. आमका तुमच्या बाबानी जिता ठेवला नसता. चला घराक जावया लवकर." मोहन रागावून बोलत होता. कसातरी उभा झालो चार पावले चालायला ब्रम्हांड आठवले. पायातून कमरेतून असह्य कळा उठत होत्या. थांबत थांबत चालत होतो. शेवटी संभाने मला न विचारताच उचलून माझी मुटकुळी खांद्यावर टाकली आणि झपझप चालू लागला. मागून मोहन होताच.

घरी पोचलो तर घरातले सगळे गोळा झाले. काय झालं चा कालवा सुरू झाला. झोपाळ्यावर माझी मुटकुळी ठेवता ठेवता संभा सांगू लागला. झोपण्याच्या हालचालीने अंगात दहा ठिकाणी कळा उठल्या आणि मी जोरात कण्हू लागलो. संभाचे शब्द माझ्या कानात पडले, "दोन वर्षा थांबा सांगी होतय मी. नाय ऐकलानी. आमच्या जीवाक केवढो घोर लागललो हे शुद्धीत येयसर. वाचवल्यान त्या रवळनाथान."

बाबा सगळं ऐकत होता. "काय नाय झाला. पाणी काढलासमा पोटात्सून. आता काय काळजी नाय. होयत बरो दोन चार दिवसात. जावा तुमी तुमच्या कामाक." मग घरातल्या बायकांना उद्देशून म्हणाला,"ऐकलास

गो! न्हाणीच्या पाण्यात पिशवीभर लिंगडीची पालो चुरगळून घाला आणि या जखमी शूर विराक कडकडीत पाण्यान न्हावक घाला. आधी खोबऱ्याचा तेल लावा सगळ्या आंगाक. दुखी जायत दोन आंघोळीत."

साग्रसंगीत मालीश आणि आंघोळ झाली. थोडं बरं वाटलं. पण चालताना अजूनही पाय दुखत होते. जोरात श्वास घेतला की बरगड्यातून कळा येवून जीव कासावीस होत होता. दुपारी जेवून बाबाच्या शेजारी पहुडलो. गच्च डोळे मिटून होतो. भोवऱ्याने नामोहरम करून माझे चिपाड केल्याचा भयंकर अपमान पचवायचा कसा हाच विचार सारखा येत होता. भोवरा फोडला नाही याची खंत जोरात उफाळून आली की अनवधानाने कुशीवर वळे. मरणाच्या कळा सगळ्या शरीरात उठत. भोवऱ्याला शिव्यांची लाखोली आपसूक मनात जागी होई.

भोवऱ्याने मला यावेळी हरवले पण मी सोडणार नाही. परत फोडणारच भोवरा. बरे होई पर्यंत आठ दहा दिवस जातील. पाणी उतरेल. भोवरे नाहिसे होतील. या वर्षी नाही तर पुढच्या वर्षी भोवरा फोडायचाच. वर्षात मस्त दांडगट बनायचं. पुढच्या वर्षी भोवरा नक्की फोडायला तयार व्हायचं.

या विचाराने थोडं बरं वाटलं झोपी गेलो. संध्याकाळी सडसडून ताप भरला. कण्हत उठलो. मग परत बाबाने सगळ्याना सांगीतले, "काय वशेदाची(औषधाची) जरूरी नाय. रात्री भरपूर पेज द्या तेका. उद्या बरो होयत."

बाबाचा स्वभाव आता माहीत पडत होता. तो मला दगडा सारखा घट्ट बनवायला बघत होता. त्यात सहानभुतीला जराही स्थान नव्हतं. एकुलता असुनही मरण पाहून आलेल्या मुलाला त्याने जराही काळजी दाखवली नव्हती की बोलून सहानभुती दाखवली नव्हती. तो जणू काही काहीच झाले नाही असा वागत बोलत होता. एवढेच काय पण एकदाही त्याने कसं वाटतं आता हेही विचारलं नव्हतं की डोक्यावरून हातही फिरवला नव्हता.

"भोवरो फोडूचो म्हणजे काय ता आता समाजात तेका. पुढच्या वेळेक सगळा बरोबर लक्षात ठेवन भोवरो फोडीत. असाच शिकतत सगळे. आयुष्यभर असेच भोवरे फोडूचे लागतले. संसारातले, नोकरी धंद्यातले, पोरा बाळाच्या शीकपणाचे. घेयत हेच्यात्सून धडो."

मी मनोमन आनंदलो. बाबा भोवरा फोडायला परत पाठवणार. राजी आहे तो. पण पुढे बोलत होता ते तितकसं समजलं नाही.

पण मी निश्चय केला, पुढच्या वेळेला नक्की भोवरा फोडतो बघा.

दोन दिवस झाले होते. अंग दुखायचं कमी होत होतं. लिंगडीचा पाला घातलेल्या पाण्याची आंघोळ आणि तेलाच्या मालीशने पुढच्या तीन चार दिवसात मी ठणठणीत बरा झालो.

सकाळी दहा सुर्य नमस्कार घातले. दमछाक झाली. पण आता चंग बांधला होता. दम वाढवायचा, शक्ती वाढवायची, श्वास रोखायचा अवधी वाढवायचा. पुढच्या वर्षात भोवरे फोडता आलेच पाहिजेत हा प्रण केला.

दहा वाजता नदीवर जायची अनावर इच्छा झाली. सात दिवसापूर्वी भोवऱ्याने पिळून काढलेलं सगळ्याना माहीत होतं. बाबा जायला नक्कीच परवानगी देणार नाही. मग काय करायचं? बाबाला विचारू? काय फारतर शिव्यांची माळ लावेल. न सांगता पळून जाऊ? नको नको आल्यावर मरेस्तोवर कुटून काढेल. मनात नक्की काय ते ठरत नव्हतं.

कपडे गोळा करताना मुद्दाम बाबाला समजावं असा फिरत होतो. त्याने आंघोळीला जातोय हे पहावं, मग विचारेल कुठे जातोय ते. मग सांगू.

बाबा माझ्यापेक्षा जास्त पावसाळे पाहिलेला. पाहूनही ढीम्म्. कांहीच बोलेना. मग मीच बाबा पासून दहा हात लांब राहून विचारलं, "मी नदीवर आंघोळीला जाऊ?"

"जा! पण तासाभरात परत ये."

शब्द अमृतासारखे कानांत शिरले. तेवढ्यात आतून आतेबाय कोकलायला लागली, "जा काय? आठवडोय नाय झालो. बुडा होतो म्हायत नाय? गप न्हाणयेत न्हा रे. नायतर मीच तंगडी तोडून ठेवीन."

बाबाने डोळा मारत हळूच खूण केली. पळ तू. मी सांभाळतो.

आतेबाय स्वयंपाक घरातून यायच्या आत मी नदीकडे धूम ठोकली. मग चालताना विचार आला. बाबाला समजणं कठीण आहे. शिव्या नाहीत,

दम मारला नाही सरळ परवानगी दिली. संभालाही सांगीतलं नाही बरोबर जा. कसं काय हे?

नदीवर पोचलो पाणी खूपच कमी झालं होतं. चार पाच मुलं अगोदरच आली होती. पाण्यात घुसलो. थंड पाण्याची पहिली शिरशीरी एक छान डुबकी मारून घालवली आणि नदी पात्राचं निरीक्षण करू लागलो. अजून प्रवाह सलग जोडलेला होता. भोवरे देखील होते पण ते अगदीच लहान होते. त्यांच्यात खेचण्याचा जोर असेल असं वाटत नव्हतं.

दूर प्रवाहाच्या मधे एक जरासा मोठा भोवरा दिसला. खूप इच्छा झाली. फोडून बघावा का? पण विचार परतून लावला. मग एकदम चमकलो. हा माझा स्वभाव नव्हता. मग हा बदल कसा झाला? प्रत्येक गोष्टीत उतावळेपणा करणारा मी. आता विचार करून निर्णय घेऊ लागलो? जाऊ दे. पोहण्याची मजा घेऊ. बरेच दिवसात सवंगड्यांबरोबर पाण्यातले खेळ खेळलो नव्हतो. त्यांच्या जवळ गेलो तर प्रत्येक जण कालावाला करत विचारू लागले, "बरो झालंस? भोवऱ्याने खेचललान ना तुका? कसा वाटता रे भोवऱ्याने खेचलान काय?" असंख्य प्रश्नांचा भडीमार ते करत होते. मग मी हुशारलो. असली फुशारकी मारायची संधी कोण सोडेल? भोवऱ्यात शिरलेल्याचे वर्णन मी मीठ मसाला लावून मस्त सांगीतलं. व शेवटी म्हणालो, "पण शेवटाक श्वास कमी पडलो म्हणून वांयच पाणी खाल्लंय, ठसाकलंय एवढाच. तुमी भोवरो फोडूच्या आधी श्वास कोंडून धरूक शिका.

शंभर तरी मोजूक येवक होये. बरा श्वास पकडूचो खेळ खेळूया? श्वास पकडून पाण्याखाली जायचा. कोण जास्त वेळ रवता पाण्याखाली बघुया?"

तो खेळ चांगलाच रंगला. मोहन ठाकराच्या मुलाने, म्हाद्याने बाजी मारली. दरवेळी तोच जास्त वेळ पाण्या खाली रहात होता. त्याला विचारलं मग तू भोवरा फोडायला शिकत का नाहीस. माझ्या पेक्षा सहा महिन्यानी लहान असणाऱ्या त्याने मला धक्का दिला.," बापाशीन माका भोवरो फोडूक केवाच शिकवल्यान. माशे पागूकय शिकवल्यान. आमका माशे विकून पैशे कमवूचे लागतत. नायतर खातलव काय?"

एका झटक्यात गरज आणि शौक यातला फरक समजून गेलो. गरजवंत सगळे लवकर शिकतात हे खरे.

बाबाने लवकर बोलावले म्हणून मी बाहेर पडलो. आणि घरचा रस्ता पकडला. पण आता म्हाद्याचे शब्द डोक्यात गरगर फिरत होते. एक मोठा भोवरा तयार करीत होते. मला ते नामोहरम करीत होते. माझ्यापेक्षा लहान म्हाद्या भोवरे फोडू शकत होता. आणि घरच्या आमदनीत भर पण घालत होता.

बाबाने झटकन दिलेली नदीवर जायची परवानगी, माझ्यापेक्षा लहान म्हाद्या भोवरे फोडतो. त्याचा श्वास रोखायचा वेळही माझ्यापेक्षा कितीतरी जास्त, बाबा भोवरे फोडायला स्वतःच शिकला. हे सगळे विचार रिकामटेकडा असलो की मनात फेर धरत. कांही सुचत नव्हते.

"बाबा! तुला भोवरा फोडताना कुणीच मदत नाही केली?" दुपारी बाबा जवळ झोपलो असताना माझ्या तोंडून अनवधानाने प्रश्न गेला.

"केली तर. गावातली मुले पोहायला असत. सगळे एका मागोमाग भोवऱ्यात शिरू. एखादा अडकला तर लात मारून दुसरी मुलं बाहेर ढकलत. नाका तोंडात थोडे पाणी केव्हा केव्हा जाई. मग काठावर येवून ठसकत, खोकत जीव थाऱ्यावर येई पर्यंत बसू. पोटातले पाणी काढायची रीत सगळेच शिकलेले. पण आम्ही अगोदर लहान भोवरे फोडू. मग हळूच एखादा जरा मोठा भोवरा फोडायचा प्रयत्न करू. असं पायरी पायरीने शिकत गेलो. ती गरज होती. पावसात नद्या भरल्या की इतर गावांशी संपर्क सुटत. पूल नव्हते की साकव नव्हते. कमी पाणी असलेल्या पात्रातून नदी पार करून जावं लागे. मग वर पाऊस पडला की एकदम पाणी वाढे. जोरदार प्रवाह ढकलून मोठ्या पाण्यात नेई. मग पोहत बाहेर पडताना कितीतरी भोवरे लागत. कितीही चुकवत गेलो तरी एखादा भोवरा खेचून घेई. भोवरा फोडता येणं ही गरज होती. आजच्या गरजा आणि त्यावेळच्या गरजा फार वेगळ्या होत्या. आता सोई होतायत व जुन्या गरजा नाहीश्या होतायत. जग असंच बदलत रहातं. त्या बरोबर आपणही हळूच कसे बदलतो समजत नाही. तू भोवरा फोडायला पहातो ते शौक म्हणून. गरज नव्हे."

परत डोक्यात विचार फेर धरू लागले. किती खडतर होतं ते जगणं! पण त्यात एक साहसी मजा होती. मजा? की जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती? डोळ्यांवर आडवा हात ठेवून बाबाच्या बोलण्यावर मी विचार करत होतो.

विचारांना गती मिळत होती. बाबाने आज त्यांचे जगणे आणि आताचे जगणे यातला फरक सहज समोर ठेवला होता. हो आता नदीवर काही पूल झाले होते, काही साकव झाले होते. पुलावरून जायला भिती वाटत नसे. पण डुगडुगत्या लाकडी साकवावरून जाताना पोटात गोळा येई.

खालून उसळत जाणारे पाणी, वर आम्ही. पडलो तर? एवढ्या एकच विचाराने पाय थरथरत. बाबाचा हात धरायला गेलं की झटकून टाके. म्हणे, "अरे पोहायला येतं ना? हात सोड. भितोस कसला. पायाखाली एवढा साकवाचा आधार असताना भिती कसली?" बाबाला कसलीच भिती कशी नाही वाटत?

आता ह्या आठवणीही फेर धरू लागल्या. भोवरा डोक्यात गरगर फिरू लागला.

प्रत्येक आठवण जशी या मनातल्या भोवऱ्यात फिरत घुसळली जात होती तसा त्यातून एक साक्षात्कार होत होता. बाबा मला हळू हळू निर्भय बनवत होता. चिकाटीने सर्व करायला न बोलता लावत होता. आता हातांचा मार जात होता. शब्दांचा मार सुरू झाला होता. पुर्वी झाडावर चढलो तरी ठोक देणारा बाबा आता मला आंबे काढायला, फणस उतरायला झाडावर चढू देत होता. कोवळ्या काजूचे गर काढू देत होता. तीन चार वर्षापूर्वी ज्याला बंदी होती. त्याला आता परवानगी सहज मिळत होती. कारण काय? मग प्रश्न त्यालाच विचारला, "बाबा भोवऱ्याने खेचून बुडवलं तरी मला तू एकट्याला नदीवर जायला कसं दिलंस?"

बाबा जोरात हसला. म्हणाला, "मला वाटलं त्या भोवऱ्याने तुला काय करायचं नाही याचा छान धडा दिलाय. तू भोवरा फोडशील पण आता घाई करणार नाहीस. मनुष्य धर्म सगळयातच असतो. जगण्याची दुर्दम्य इच्छा असतेच. आततताई वागण्या नंतर धोका समजत नाही तो माणूस कसला? याचा विचार करूनच मी तुला परवानगी दिली. तू मला जाऊ का विचारलंस तेव्हाच समजलो की तू आता सरळ विचार करू लागला आहेस. तुझ्या मनात द्वंद होतं, न सांगता पळून जाऊ? की विचारू? तू विचारलंस तिथेच मी समजलो तू सारासार विचार करून निर्णय घेशील."

बाबा एवढा मनकवडा आहे? माझ्या मनातलं याला कसं समजलं?

"आम्हीही लहानपणी स्वच्छंदी होतो. मारही खाल्लाय. आणि आमच्या पिताश्रींनी असेच संस्कार केलेत." परत एकदा माझ्या मनातला विचार पकडत तो बोलून गेला.

"बाप लेकाचे भोवरे फोडून झाले असतीत तर जेवक चला." आतेबायचा खणखणीत हुकूम सुटला. आणि दोघेही विचारांच्या भोवऱ्यातून बाहेर फेकले गेलो.

रजा संपायला दोन दिवस उरले होते. माझा दिनक्रम ठरून गेला होता. सकाळी उठून न्याहारी अगोदर जमतील तेवढे सुर्य नमस्कार घालत होतो.

श्वास रोखायची क्रिया दररोज चालू होती. हे सर्व बाबा पहात होता. बोलत काहीच नव्हता.

दुपारी आतेबायला म्हणाला, "गव्हाची कापा कर गो. गुळाचो पाक दोन तारी ठेव नायतर तोडताना दात पडतीत. भरपूर कर तुजो भाचो जातलो परवा. दे तेच्या बरोबर डबोभर."

मी सगळं आटोपून नदीवर गेलो. आज नदीवर डुंबायचा शेवटचा दिवस. सगळे सवंगडी आले होते. गुरे प्रवाहाच्या खालच्या बाजूला पाण्यात सोडून त्यांनी पितळ्या लावायचा घाट घातला होता. नदीचं पाणी आता खूप कमी झालं होतं. दोनचार दिवसात प्रवाह तुटून कोंडी तयार होणार असं लक्षण दिसत होतं. भरपूर डुंबून मी गावच्या नदीचा निरोप घेतला. म्हाद्याने आज पितळी लावली होती बरोबर पागायचे जाळे पण आणले होते.

सगळ्यात पुढे होऊन त्याने पंधरावीस मोठे मळवे मासे मला देऊ केले तसे मी म्हणालो, "अरे मी पैसे नाही आणलेत. जाताना घरी ये"

"पैशे खंय मागतय? अरे उद्या तू जातलंस ना? भेट म्हणून दिलंय." मग प्रत्येकाने आपल्यातले थोडे थोडे मासे मला भेट दिले. घरी एकटाच निघालो होतो. ते अजून नदीत डुंबणार होते.

रस्ताभर डोक्यात त्यांच्या प्रेमळ भेटीचा विचार चालला होता.

या शबरीच्या बोरानी माझ्या टॉवेलात एक मोटली बनवली होती. टॉवेल खांद्यावर घेतल्याने ती मोटली चालताना पाठीवर हळूच आपटत होती व मी सुखावत होतो.

आता मे महिन्यात रजेत येणार. नदी सुकी खडखडीत झालेली असणार. एक दोन कोंडीत पुरुषभर पाणी असणार. म्हणजे नदीवर आंघोळीला मजा येणार नव्हती. या विचारात मी घरी पोचलो. गरम गुळाचा घमघमाट नाकात शिरला. आतेबायने कापं (वड्या) करायला घेतली होती. धांवत घरात शिरलो. गरम कापे ताटात नुकतीच कापून ठेवली होती. दोन उचलली तर आतेबाय कोकलायला लागली, "अरे! जरा थंड तरी होवदे. आणि जेवचा नाय तुका? दुपारी खा." पण आतेबायची दमबाजी खूप नरमलेली होती. मी बाहेर पळत सुटलो. बाबा कडे बसून कापं खाऊ लागलो. "कशी झालीत रे? आवडली?" बाबाने विचारले, "छान आहेत. तू बघ खाऊन" म्हणत एक काप मी त्याला दिले. म्हाद्या कडून आत्ताच शिकलो होतो आपल्यातले द्यायला. बाबाने एक चावा घेवून बाकीचे मला परत दिले."खा तूच. मला जेवण जाणार नाय तोंड गोडूस झालं तर." खोटं खोटं कारण देत होता.

जेवताना बाबा म्हणाला,"तिकडे जातोस काय रे पोहायला?"

"नदी दीड दोन मैलांवर आहे. येताना उनाने डोकं तापतं आणि दुपारी शाळा असते. नदीची मजा गावीच येते."

बाबाने सुस्कारा सोडलेला कानात पडला. मी विचारले “का रे विचारलंस?” मग त्याने जे सांगीतलं ते ऐकून समजलो. तो वरून दाखवत नसला तरी त्याच्या पोटात भरपूर माया, प्रेम दडलंय.

सकाळपासून आज प्रेमाचा, मायेचा प्रवाह चालू झाला होता. त्यातही भोवरा तयार झाला होता. पण तो मला खेचत नव्हता. घुसळून चिरडत नव्हता. उलट डोक्यावरून पाठीवरून गोंजारत फिरत होता. बाबाच्या पोटातल्या मायेचा, आतेबायच्च्या मायेने नरमलेल्या दमदाटीचा, विरहाच्या कल्पनेने सवंगड्यांनी दाखवलेल्या प्रेमाचा असा काहीसा भोवरा तयार होऊन मला गोंजारत होता. मी सुखावत होतो. आयुष्यभर आठवणीत राहाणारा सर्वांच्या प्रेमाचा भोवरा.

दुसऱ्या दिवशी सकाळी तयार झालो तर मोहन ठाकर उभा. बाबा त्याला सांगत होता. "बस चालू झाली हा. नाटळ सांगव्याच्या तिठ्या पर्यंत येतली. बसवून दे तिच्यात. नाटळेची नदी पार करताना साकव हा. भोवरो फोडूक बगणारे शूर साकवाक भितत. बखोट पकडून साकव पार कर."

"काय चिंता नको करू. बशीत बरोबर बसवून येतय." बाबाने तीन रुपये हातात ठेवले. बसचे तिकीट व खोलीवर गेल्यावर आठवडाभर पुरतील एवढे दिले होते.

निघालो सगळं घर गोळा झालं होतं. कायम दमबाजी करणारी आतेबाय तोंडावर पदर घेऊन मुसमुसत होती. बाबा विड्या मागून विड्या पेटवत होता, हुरहुर दडवत होता. ठसकत होता. संभा जवळ येऊन डोक्यावर हात फिरवत होता.

कोकणी प्रेमाचे हे गाठोडे मनावर घेवून मी घरातून निघालो. शहरात, शाळेत. आता गावाचं दर्शन मे महिन्यात परीक्षेत नंतर रजा पडली की. मन

गावच्या प्रेमाने भरून आलं. आणि पावलं झपझप उचलत मी बस पकडायला चालू लागलो. त्या प्रेमाच्या भोवऱ्या पासून दूर दूर.....

खोलीवर पोचलो. मोठ्या दोन्ही बहिणी वरच्या वर्गात होत्या अभ्यास खूप व इतर शिकवण्या यामुळे गावी आल्या नव्हत्या. सगळे सामान मोठ्या बहिणीकडे दिले. खिशातील अडीच रुपये दिले., "बाबाने तीन रुपये दिले होते. आठ आणे बस भाडं दिलं. राहिलेले हे अडीच रुपये" बहीण माझ्याकडे आश्चर्याने पहात राहीली., "काय रे आज सगळे पैसे दिलेस नेहमी प्रमाणे दोन आण्याचा खाऊ नाही घेतलास? सुधरलास!" मी गप्पच राहिलो.

आता माझा दिनक्रम बदलत चालला होता. सकाळी लवकर उठून सर्व आटोपून मी सुर्य नमस्कार घाली. श्वसाचे प्रकार करी. दहा उठाबशाही काढू लागलो होतो. मग आंघोळ न्याहारी करून शाळेत पळत असे. चंगच बांधला होता. भोवऱ्यापेक्षा ताकदवान व्हायचं या वर्षात. बहिणींना हा बदल समजत नव्हता. पुर्वी कामाला टाळाटाळ करणारा मी आता काम सांगताच लगेच करू लागलो होतो.

आठवड्याने बाबा आला. तो दोन दिवस राहिला होता. बहिणींना माझे प्रताप त्याने सांगीतले, तेव्हा त्यांना सर्व समजलं. पण त्या जास्त बोलल्या नाहीत. बाबाने बहुदा त्यांना तसं सांगीतलं असेल. व्यायाम सुरू केल्यापासून एक गोष्ट लक्षात आली. पूर्ण दिवस छान वाटू लागला होता. अभ्यासातही मन रमू लागलं होतं.

बाबा दुसऱ्या दिवशी रात्री सगळ्यांशी गप्पा मारत होता. बहिणीना म्हणाला, "मोठे काका आलेत. रिटायर झालेत. गावी रहाणार म्हणतायत. पाहू किती आणि कसे रहातात ते. बाकी काही नाही पण सारखी कटकट करतात. घरी आपण दोघंच पण जेवण सात आठ जणांचं शिजतं. आवर घाला म्हणतात. याना काय माहीत गावच्या रिती." आम्ही तिघही लहान पण बाबा आपलं मन मोकळं करत होता.

"हा भोवरे फोडायचा नाद घेवून बसलाय. बाबा रे! त्या काकां समोर हे बोलू नकोस हं. खूप ओरडतील तुला आणि मलाही. शहरात राहून भित्रे झालेत. आता माझ्या समोर हा भोवरा फोडायचे आव्हान आहे खरे. संसारात असे भोवरे येतच राहातात ते आयुष्य भर फोडत फोडत पुढे मार्ग काढताना दमछाक होते. समजलास? नदीतले भोवरे फोडणं खूप सोपं. पण संसारात येणारे भोवरे फोडणं फार कठीण. किती कसे व कुठून येतील ते समजत नाहीत. सगळ्यानाच असे भोवरे फोडावे लागतात." एवढं बोलून बाबा गप्प झाला कसल्या तरी विचारात गेला.

"बाबा तू सरळ सगळ्यांना बोलव व वाटण्या करून टाक. कशाला ताप करून घेतोस?" मोठी बहीण बोलली.

"ते ही केलं असतं पण तुझ्या आज्याने वचन घेतलं माझ्याकडून सगळं कुटुंब एकत्र ठेवायचं. आणि वाटे केले तरी मुंबयकराना शेती कुठे येते. हे काका तर एकटेच. आगापिछा नसलेले. हे काय शेती करणार!"

बाबा चांगलाच कौटुंबिक भानगडीत गुंतत होता वाटलं. काय मार्ग काढतो त्याची उत्सुकता लागली. पुढे संसारात येणारे हेच भोवरे हे समजायला वेळ लागला नाही.

मे महिन्यात बहिणींसह गावी गेलो. काका होतेच. बहिणींचे ते लाड करीत. मला जास्त काही बोलत नसत. मी देखील त्यांच्या वाटेला जात नसे.

आंबे फणस पिकून घरात येवू लागले. बहिणींची कामे वाढली. आंब्याची साटे, फणसाची साटे ताटात बनवून उन्हात ठेवायचे काम सुरू झाले. आंब्याचे लोणचे करायसाठी टोपलीभर आंबे आले. दोन मोठ्या बरण्या भरून लोणचे घालताना त्या या सगळ्या व्यापात चांगल्याच गुरफटून गेल्या. अगदी भोवरा गरगर फिरवतो तशा या कामातून त्या कामात गरगरू लागल्या. दमून भागून रात्री गप्प झोपून जात.

बाबा म्हणतो ते संसारातले भोवरे हेच कां? असं मनात वाटून गेलं.

"दोन बरण्याभर लोणचं? काय गावाला वाटायचं काय?" मुंबयकर काकांनी विचारलं. त्यांचा आब ठेवत बाबा म्हणाला, "पावसात इथे शहरासारख्या भाज्या नाही मिळत. डाळभाता बरोबर लोणचं तरी घालावं लागतं नोकराना."

बाबा खरंतर वैतागला असावा. पण व्यवस्थित सांभाळत होता. मोठ्यांचा मान ठेवायचे संस्कार ठळक पणे मनावर बिंबत होते. पण बाबा

या भोवऱ्यात दररोज गरगर फिरवला जात होता. कसा फोडणार होता तो हा भोवरा.

काका नाही बघून मी हळूच बाबाला म्हणालो,"फार प्रश्न विचारतात काका. तुला त्रास नाही होत?"

"गप्प रहा मोठ्यांविषयी आपण बोलू नये. आणि मला कसला त्रास? मी आपलं काम करत रहातो. त्यांचं काही मनावर घेत नाही. विचारलंच तर समर्पक उत्तर मान राखून देतो. त्यांचं बरोबर आहे. मुंबईत काटकसरीत वाढलेला जीव, इथलं सगळं समजायला वेळ लागेल. तो दिला की झालं. थोडं सहन करता आलं पाहिजे."

म्हणजे बाबाने हा भोवरा केव्हाच फोडलाय तर. आज संयमाने भोवरा कसा फोडायचा हे समजत होतं. आपलं काम कसं होईल, त्याची वेळ येण्याची वाट बघत धीर धरून बसायचं.

मेच्या अखेरीला पाऊस भरून आला. धो धो ओतू लागला. शेतीची कामं चालू झाली. नोकर आणि बाबाना उसंत मिळत नव्हती. पेरणी करायची घाई गडबड उडाली होती. चार आठ दिवसात पेरणी संपली. दोन दिवस ओतत असलेला पाऊस गायब झाला. पाच सहा दिवस पावसाने दडी मारली तसे गावकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. सगळी मेहनत परत करावी लागेल ही भिती. आठव्या दिवशी रात्री रिमझीम सुरू झाली. सगळं

गाव आनंदलं. मलूल पडलेला तरवा तरारून उभा झाला. पाऊस मग पडतच होता. कधी रिमझीम तर कधी सर. अगदी शेतीला पोषक.

मला प्रश्न पडला. पाऊस पडला नसता तर? बाला विचारलं. म्हणाला, "निसर्गावर आपण अवलंबून असतो. काय करणार सगळं शेत जळून गेलं असतं. थंड झालेल्या जमिनीत मग पेरलं तरी एवढं उगत नाही. हे असंच चालतं शेतीत कधी सुकाळ तर कधी दुकाळ. निसर्गाच्या या चक्रातून सुटायचा मार्ग म्हणजे शेताला पाणी देणं. पण कोकणात मे मधे पाण्याची टंचाई. अशा या चक्रात शेतकरी भरडला जातो.

एक नवीन भोवरा मला दिसू लागला. त्यात फिरणारा, भरडला जाणारा शेतकरी डोळ्या समोर गरगर फिरू लागला.

पाऊस तसा मोठा नव्हता. नदी नाले भरायला वेळ होता. पण न जाणो एकदम पाऊस वाढला तर म्हणून आम्ही शहरात जायची तयारी केली. बस आमच्या गावात येत होती ती बंद झाली तर पंचाईत झाली असती. भरपूर सामान होते. सहा महिन्यांसाठी तांदूळ, पोहे, फणसाची आंब्यांची साटं असं खूपकाही न्यायचं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळची बस पकडून आम्ही तिन्ही भावंड निघालो.

परत व्यायाम, शाळा, अभ्यासाचा दिनक्रम सुरू झाला. मधेच गावाची आठवण येई. वाटे कायम गावातच राहायला मिळेल तर किती बरं होईल.

पण बाबा सांगे, "शीकून मोठे व्हा. जग बदलतंय. शिकलेत तर तगून जाल. आता शेतीत काही राहिलं नाही. हे चक्र असंच चालतं."

"चक्र कसलं चक्र?" कुठलेही असले शब्द माझ्या डोळ्या समोर भोवरा आणीत.

"काय असतं, माणसाचे तीन व्यवसाय शेती, व्यापार व नोकरी. कांही दिवस उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी असं चित्र दिसतं मग ते हळू बदलून उत्तम व्यापार, मध्यम शेती कनिष्ठ नोकरी असं होतं. येणाऱ्या दिवसात उत्तम नोकरी होण्याची चिन्ह दिसत आहेत. चांगल्या नोकरी साठी चांगलं शिकावं लागेल. नोकरशाही जन्म घेतेय. शेती कनिष्ठ होणार आहे. हे चक्र असंच फिरत राहाणार."

बाबा असं काही बोलला की माझ्या मनांत विचारांचे कित्येक भोवरे उठत. बाबाला अगोदरच कसं समजतं? हळू हळू बाबा विचार करायला लावत होता. भविष्यात पहायला शिकवत होता हे समजत नव्हतं. पण तो मला घडवत होता विचार करून तारतम्याने निर्णय घ्यायची सवय लावत होता, हे त्यावेळी ध्यानातच आले नाही. हे विचारांचे भोवरे मनात उमटवून तो गायब व्हायचा. हे भोवरे फोडायचे आव्हान समोर ठेवून जायचा.

लावणीचे दिवस संपले आणि एक दिवशी काका गावाहून आले. चालत आले. चालत आले होते. दमले होते. दुपारी जेवून झोपले. आमची शाळा होती. संध्याकाळी घरी आलो तर बहिणीला सांगू लागले, "मुंबईला

जायचं आहे. थोडं काम आहे. दोन तीन महिन्यानी येईन." म्हणजे हे दिवाळी नंतर येणार मी सुखावलो. सप्टेंबर मधे भोवरा फोडायच्या वेळी ते नसणार.

दिवस भरभर गेले. सप्टेंबरला मी गावी जायचं ठरवलं. मोठ्या बहिणीने हळूच कानपिचकी भरली. "ते भोवरा फोडायचं वेड सोड. नसते उद्योग करून ठेवशील." मी गप्प. बाबा. म्हणायचा, "मौनं सर्वार्थ साधकम्"

गावी परत बैल गाडीतूनच जावं लागलं. अजून पाऊस तग धरून होता. जायचं नाव घेत नव्हता. नदीवर जाणं शक्य नव्हतं. चार दिवसानी उघडीप आली. मग दोन दिवस जाऊ दिले. नदीवर जायची फार ओढ लागायची पण धोका माहीत होता. शेवटी एक दिवशी बाबाला म्हणालो, "बाबा आता नदीवर जाऊ का?"

" जा! पण विचार करूनच भोवऱ्यात शीर घाई करू नको. संभा किंवा मोहन नाहीत आता तुझ्या बरोबर. गावातली इतर मुलं असतील तर पाण्यात जा. एकटा नको."

कपडे घेवून नदीवर निघालो. खूपजण आधीच आले होते. पाण्यात शिरलो. थंड पाण्याने व आनंदाने एक शिरशीरी आली. तेवढ्यात म्हाद्या आलाच. भोवरा फोडायचे ठरवून दोघेही प्रवाहाकडे निघालो. मागून आणखीही मुलं आली. एक एक लहान भोवरे फोडायला सुरवात केली.

जरासी खेच असलेल्या भोवऱ्यात शिरता शिरता थोडा मोठा थोडा मोठा करत चार पाच भोवरे फोडले. दमछाक झाली. म्हाद्या म्हणाला, "दमलव आता ते मोठे भोवरे उद्या घेवया. आज नको."

मी होकार भरला. घरी परतलो. बाबा काही बोलला नाही की विचारलंही नाही.

दुसऱ्या दिवशी परवानगी घ्यायची नव्हतीच. बाबाला सांगून निघालो. नदीत शिरताच म्हाद्याने आणि मी ठरवलं पहिला मोठा भोवरा फोडायचा. म्हाद्या पुढे पहिला जाणार त्याच्या मागून मी जाणार असं ठरवून भोवऱ्याच्या वर गेलो. म्हाद्या पोहत निघाला मागून मी. म्हाद्या भोवऱ्यात नाहीसा झाला. मी भरपूर श्वास भरून घेतला दुसऱ्या क्षणाला भोवऱ्यात खेचला गेलो. गरगर फिरवत भोवरा खाली खेचत होता. मी जरा ही विरोध करत नव्हतो पाच सहा फूट खाली गेल्यावर खेच कमी झाली होती. भोवऱ्यातून सूर मारून बाहेर पडलो पाण्या खाली डोळे उघडून पाहिलं प्रवाहाबरोबर चाललो होतो. उजव्या बाजूला नदीचा तळ वर जाताना दिसत होता. प्रवाह कापून जोरात हात पाय मारत मी उजव्या बाजूला पोहत जाऊ लागलो थोड्याच वेळात तळ जवळ जवळ येवू लागला. आता श्वास घ्यायची जरूरी वाटू लागली दोन हात मारत पाण्यावर डोके काढले. भरपूर श्वास घेतला. म्हाद्या थोड्या अंतरा वर दिसला. दोघेही बाहेर पडलो. अंग एवढे घुसळले होते की परत भोवऱ्यात जाणं शक्य नव्हतं.

पण हे काय एवढा भोवरा फोडण्याचा पराक्रम केला तरी आनंदाने ओरडलो कसा नाही? कुठलाही उन्माद कसा नाही? एवढा बदललो? पुर्वीचा उथळपणा, अल्लडपणा कसा नाहीसा झाला? भोवऱ्याच्या वेडाने माझं लहानपण संपवून टाकलं होतं.

घरी पोचलो शांतपणे आतेबायला म्हणालो, "भूक लागलीय जेवायला वाढ." मग बाहेर येवून बाबाच्या पारीवर आडवा झालो. बाबा बहुतेक शेतावर गेला होता. मी जेवून परत आडवा झालो. नाही म्हटलं तरी त्या मोठ्या भोवऱ्याने अंग थोड पिळवटलं होतं त्याची जाणीव आता होत होती.

बाबा केव्हा आला ते माहीत नाही पण जाग आली तेव्हा तो माझ्या डोक्यावरून हात फिरवत होता.

"आतेबाय आज चिरंजीवांनी भोवरो फोडलंलो दिसता. माझ्या साठी जेवकय थांबूक नाय."

बाबा वागणुकीवरून बरोबर कयास बांधत होता. हे नवीन शिकायला मिळालं.

मी डोळे मिटून पडून होतो. त्याचा डोक्यावरून फिरणारा हात मला बरंच काही सांगत होता. एवढ्यात परत म्हणाला, "आता ल्हान नाय रवलो, बापयो झालो. आता काळजी नाय"

मी या वाक्याचा अर्थ लावायच्या भल्या मोठ्या भोवऱ्यात खेचला गेलो.

भोवऱ्याची गोष्ट तर कालच लिहून संपली. तो नदीतला भोवरा फोडला तिथेच संपली का? मग उत्तर मिळालं... नाही...

आता पंचाहत्तरी ओलांडली. संथ स्वस्थ जीवनक्रम आला होता. मुलं, नातवंड व मित्रात आयुष्य सुखकर झालं होतं.

मग एक भोवरा अचानक आला सगळ्या कुटुंबाचं आयुष्य ढवळून निघालं. भोवऱ्याने फक्त वेळच मागीतला. भोवरा फोडला गेला. आणि विचार आला "असं का?" बाबाने सांगीतलं होतं. असे भोवरे आयुष्यात येतच राहाणार. त्यांना वेळ द्यायचा. जोर कमी झाला की जोमाने चिकाटीने परत कामाला लागायचं. वेळ देण्या एवढा संयम ठेवायचा, वाढवायचा. इथे श्वासा ऐवजी संयमाची धीराची गरज होती.

आज ६०-६२ वर्षापुर्वी चा भोवरा का आठवला त्याचं कारण हा भोवरा. मग पूर्ण आयुष्याचा तपशील समोर येवू लागला. सगळे भोवरे नजरे समोरून झरझर जाऊ लागले.

कोकणातलं लहानपण नंतरचा शिक्षणाचा काळ, नोकरी, मग धंदा हे सर्व आयुष्य मागे वळून पहाताना एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे गत जीवनात आलेले अनेक भोवरे. सुख दुःखाचे भोगलेले क्षण. दरवेळी बाबा आठवला.

कोकण सोडल्या पासून फार धडपडत होतो. शेवटी धंदा सुरू करायला एवढ्या लांब आलो बाबा गावीच राहीला. माझ्याकडे यायला तयार होईना. भाषा वेगळी, राहणी वेगळी. गावचे सवय पडलेले जीवन सोडायला तयार होईना. एकदा आलाही पण तीन महिन्यात गावी परत गेला. त्याचा गावचा दरबार त्याला कधीच सोडवला नाही.

माझ्या आयुष्यातले भोवरे मला अजूनही गरगर फिरवीत होते. दोनदा तर पूर्ण रसातळाला गेलो होतो. सर्वांना वाटले हा संपला. पण पुढच्या वर्षातच हे भोवरे निवळले. मी अजून सशक्त होऊन बाहेर आलो. बाबाची आठवण झाली. तो म्हणायचा, " भोवरे येतच राहाणार, भोवऱ्याने खेचल्यावर आपण खाली जाऊन जोर कमी होई पर्यंत जसा वेळ देतो तसाच आयुष्यातील भोवऱ्यानाही देता आला पाहिजे."

किती खरा होता तो. मीही त्या दोन प्रचंड भोवऱ्यातून वेळ देऊनच बाहेर पडलो होतो. अगदी नकळत. बाबाचा उपदेश असा रक्तात उतरला होता.

एक साक्षात्कार झाला. हे भोवरे सर्वांच्याच आयुष्यात येतात. दुबळ्या मनःस्थितीची माणसं बळी पडतात. सशक्त मनस्थितीची माणसं सहज भोवरा फोडतात.

आता इतरांकडे लक्ष जात होतं. त्यांचे भोवरे माहीत पडले की वाटायचं हे तर माझ्याही वाट्याला येवून गेलं. मनात एक सहज भाव

यायचा. उत्तर मिळायचं. मनुष्य जन्म आहे बरे वाईट भोग भोगावे लागतात. ते सर्वांच्याच आयुषात येतात.

ज्यांची मनं शक्तिशाली बनलीत ती त्यांच्या वरील संस्कारांनी. मला हे संस्कार बाबाने भोवऱ्याचा उपयोग करून दिले असावेत.

म्हणूनच आज तो प्रकर्षाने जाणवतोय.

एका भोवऱ्याचा धडा देताना बाबाने काय काय शिकवलं ते आता समजत होतं. नियमीत व्यायाम, संयम, परिस्थिती बघून तारतम्याने निर्णय घ्यायची कला, चाणाक्षपणा, चिकाटी. सगळे काही मनात अजाणतेपणी भरत गेला. एक सक्षम मन आणि उत्साही शरीर तयार केलं. एक उपदेश मात्र मनावर कोरला गेला.

असेच एकदा काका काही तरी बोलल्यावर त्याने विडी पेटवली. विचारात गेला. काका बाहेर गेल्यावर बोलू लागला, "याना काय माहीत. या घराची रीत? आज्या पणज्या पासून पडलीय ती. गावचे राजे आम्ही. आमची कुळं आमची प्रजा. राजाचं काम प्रजेला सुखात ठेवणं. त्यांना कोण आहे अडी अडचणीला हात द्यायला?"

मी पटकरून विचारले, "म्हणजे?"

"अरे प्रत्येक कर्ता पुरुष राजा असतो. कोणी कुटुंबाचा राजा, कोणी गावचा राजा, कोणी खरंच मोठ्या राज्याचा राजा. पण प्रत्येकाचं कर्तव्य आपल्या प्रजेचं सुख पहाणं. घरचा राजा कुटुंबाचं सुख पहातो. गावचा राजा म्हणजे आमच्या सारखा खोत, गावच्या कुळांचं सुख पहातो. राज्याच्या

राजाला तर सगळ्या प्रजेला सुखात ठेवावं लागतं. जो हे करत नाही तो राजा कसला?

म्हणून सांगतो उद्या तू मोठा झालास हाताखाली पाच पंचवीस लोक आले तर त्यांचं मन मोडू नकोस. प्रेमाने वागव मग बघ तुझी प्रगती किती भरभर होईल ते."

हा संस्कार फार विचार करायला लावत होता. हळू हळू मनावर कोरला जात होता.

आता समजत होतं. केवढी मोठी जबाबदारी त्याने संयमाने निभावली होती. आई आणि बाप दोघांचेही संस्कार तीन मुलाना द्यायचं आव्हान त्याने सहज पार पाडलं होतं. आयुष्य भर या भोवऱ्याशी तो झगडत होता. गावच्या कुळांच्या अडचणी सोडवत होता. त्याही भोवऱ्यात गरगर फिरत होता. सगळ्या भोवऱ्याना एकदम फोडत होता. म्हणून आज त्याची सय वारंवार येत होती.

आज या आठवणींचा भला मोठा भोवरा तयार झालाय. पण तो फोडावा वाटत नाही. त्यातच फिरत रहावं वाटतंय. माये बरोबरच कर्तव्य शिकवणारा भोवरा. पुनःप्रत्ययाच्या आनंदात विहरतोय.

***भोवरे***

भोवरे हा अनुभव आहे. पुर्वीच्या लोकांची मुलांवर संस्कार करण्याची जी रीत होती तीचा अनुभव सर्वां बरोबर वाटावा म्हणून ही गोष्ट लिहीली. त्या काळात मुलांना चांगलाच मार देत असत. आई वडलांचा मार खऊनही मुलं त्यांच्यावर प्रेम करत.

आज मार हे बंद झालेत. कुणी मुलाना मार दिला तर त्यांचा कायम राग रहातो. मार द्यावा या मताचा मी नाही. पण हा फरक का हे कोडं मला अजून उलगडलेलं नाही.

*हिरणं*

सह्याद्रीचे काही कडे पश्चिमेला कोकणात उतरतात. असेच दोन डोंगर सह्याद्रीच्या माथ्यावरून खाली उतरले होते. शिखरावर एकच असलेले हे खाली उतरताना लांब होत गेलेले. म्हणून मधे एक घळ तयार होऊन त्यातून पावसाळी नदीचा उगम झाला होता. जोरदार उतारा मुळे पावसात ही नदी एवढ्या जोरात वहात खाली येत असे की सोबत दगडांना गडगडवत खाली आणत असे. या गडगडण्याने सगळे दगड कसे छान गुळगुळीत झालेले असत. डोंगर संपून जरा सपाटी सुरू झाली की ही नदी थोडी शांत होई.

कोकणातल्या संततधार पावसावेळी ही नदी लाल मातकट पाण्याने दुथडी भरून वाहे. पण पाऊस नीवला की तासाभरात पाण्याचा गढूळ रंग निवळून जाई. प्रवाहाचा जोर कमी होई. डोंगर माथ्यापासून हिरवेगार रान सुरू होई ते थेट सपाटीपर्यंत. डोंगरातून उतरताना एक धबधबा तयार झालेला त्या डोंगरांचं सौंदर्य वाढवित असे. खाली उतरून सपाटीला लागे

तिथेच डोंगर उतारापासून खाली सपाटीपर्यंत एक गाव वसलं होतं. नदीच्या दोन्ही बाजूने सपाटीपासून घरे चालू होत. व वर वर चढत जात.

डोंगर माथ्यावरून एक मोठा घाट रस्ता खाली उतरून पुढे कुठेतरी मुंबई - गोवा रस्त्याला मिळे. पण या गावच्या किती तरी वरून एका मोठ्या वळणाने पुढे निघून जाई. गावापासून तीन एक मैलांवरून नदीच्या काटकोनात निघून जाई. तिथूनच एक अरूंद पाऊलवाट खाली उतरून गावात येई. गावाचा इतर जगाशी एवढाच संपर्क.

रस्ता गावात शिरताना पहिली घरे लागत ती वेसकरांची. मग चांभारांची. अशा एक एक बलुतेदारांच्या वाड्या लागत जात. मधेच डोंगरावर काही लोकांनी जमीन सपाट करून भातशेतीचे मळे बनवलेले. प्रचंड जिन्या सारखे खाली खाली उतरत येत. हिरव्यागार भातशेतीचे ते मळे गावाचं सौंदर्य अजून वाढवित.

हिरणं गाव असं निसर्ग सौंदर्यानं नटलेलं. निसर्गाने या गावाला भरभरून सर्व काही दिलं होतं. पण बरोबर कमालीची गरीबीही दिली होती. पोटाला पुरेसं होतं पण इतर कोणत्याही वस्तुची गरज भागवताना यांची त्रेद्धा उडे.

मोठ्यांच्या कमरेवर कासटा मारून नेसलेला राजापुरी पंचा आणि मुलांच्या अंगावर दहा वर्षाचा होईपर्यंत फक्त करदोटा नाव असलेला एक भक्कम दोरा. नंतर कसून बांधलेला लंगोट. बायकांच्या बाबतीत तर आणखीच तुटवडा. कधीकाळी कुणीतरी मुंबयच्या नातेवाईकाने दिलेली

पाचवार साडी तीनवार होईपर्यंत निऱ्या न काढता नेसलेल्या बायका. मुली आठ नऊ वर्षाच्या होईपर्यंत फक्त परकरात. तो देखील मुंबयच्या दूरच्या नातेवाईकांनी पाठवलेला त्यांच्या मुलीचा. वापरलेला. नंतर चोळी नावाचं फाटलेल्या साडीतून बनवलेलं पोलकं.

खरोखर यांना मिळालेले कपडे सगळे जुने असत. त्यांचा वापर ते अगदी पुरेपूर करत. फाटक्या साडीतून मुलींचे पोलके, पोलके चार वेळ ठिगळे लावून वापरून निकामी झाले की गरम भांडी चुलीवरून उतरावायच्या भानशेऱ्यापर्यंत त्या पाचवार साडीचा प्रवास चाले.

तरी देखील गाव एकोप्याने समाधानाने पूर्ण भरलं होतं.

भांडण तंटा जराही नाही. कारण? वरून गावात शिरताना लागणारं पिंपळाचं मोठ्ठं झाड आणि त्याला चिकटलेल्या गजाली.

या गावात ग्रामसेवक म्हणून नेमणूक झाली. गाव पाहून पहिल्यांदाच आनंदलेला मी. गावाची एकंदर रया पाहून हादरलो होतो. मी सेवक होतो. पूर्ण आयुष्य खर्ची घातलं तरी या लोकांना या गरिबीतून बाहेर काढता येईल का? यांच्या कष्टांचे फळ पुरेपूर मिळवून देता येईल का? हा एक विचार आला. तर दुसऱ्या बाजूने इतरांसारखंच सरकारी पगार घेऊन गावात आराम करून घ्यावा, हा दुसरा विचार आला. खरंच अशक्यप्राय काम माझ्या वाट्याला आलं होतं.

मी गावचा पहिलाच ग्रामसेवक होतो. मी काम केलं तर पायंडा पडणार होता. मी आराम केला असता तर दुसरा कोणीतरी कामसू येईपर्यंत गावची स्थिती सुधारली नसती. ठरलं, मला काम करावंच लागेल.

"सायबानु आसास काय वो" बाहेरून आवाज आला. कोण आलं म्हणून उठलो.

ग्रामपंचायत नावाच्या वास्तूत माझी रहाण्याची सोय केली होती. एका चौथऱ्यावर चार कोनात चार खांब उभे करून ग्रामपंचायत उभी होती. भिंती जांभ्या दगडाच्या. बांधल्यापासून तिचा वापर करणारा मीच पहिला माणूस होतो वाटलं. कारण आल्यापासून सगळं साफ करण्यात अर्धा दिवस गेला. मग काय काय करावं लागेल याचा आढावा घेताना पावसाची एक जोरदार सर आली. त्या चंद्रमौळी छताची जाणीव करून दिली. दहा ठिकाणी गळणारं छत असलेली पंचायत माझ्या राशीला आली होती. कुठे कुठे गळतंय ते पाहून रात्री झोपायची जागा नक्की केली आणि आडवा झालो. तेवढ्यात बाहेरून तो आवाज आला.

उठून दारातून पाहीलं तर बाहेर एक म्हातारबुवा हातात एक पुरचुंडी घेवून उभे होते.

"येव आत? नवीन ईलास. काय होया नुको ता बगुक इलंय."

म्हणजे हिरणं माझी काळजी करणारं गाव होतं तर. बरं वाटलं. म्हटलं, "या ना पण बसायला काय देऊ?"

"बसाक! ता कित्या! ह्यो पायऱ्यो हत ना. पुरे झाला. पण तुमका काय तफलीक नाय मां? आसात त सांगा. काय करूक येयत ताच बगुक ईलंय."

डोंगराएवढ्या गोष्टी समोर आ वासून उभ्या होत्या. काय काय सांगायच्या यांना.

"अहो छत गळतंय. एकच खोली. असं गळलं तर झोपणार कुठे?"

"आजची रात काढशाल? उद्या सगळाच करून देतय."

"आपण कोण?"

"मी येस्कर, म्हार वो. म्हणून भायर पायरेर बसलंय. तुमका शिवाशीव नुको. गावात सरकारी कोण ईले तर तेंका होया नुको बगुचा काम माजा. गावचो नेम(नियम) हा तो. किती दीस रवतलास?"

"मी इथेच रहाणार. ग्रामसेवक म्हणून नेमलाय मला सरकारनं."

"बापरे! हय रवशात? या घरात? दारय नाय वो घराक. साप किरडुवा ईली तर काय होयत तुमचा?...... काळजी नुको करू. ह्यो अंगारो लावा. गावात येताना हद्दीवर पिपळ बगीतलास ना! तेच्या वरच्या मुंज्याचो हा. गावचो राकणदार ना तो. काय होवचा नाय तुमका. उद्या येतंय नी सगळा घर बरोबर करतय. सुतार कुंभार सगळ्याकनी खळवटून घेवन येतंय. जाव मी?"

"नाव काय म्हणालात तुमचं?"

"इचारलास खंय? म्हणून नाय सांगाक. मी भिवा म्हार."

एवढं बोलून तो निघाला. आणि त्याचं बोलणं आठवून, बसल्या जागी माझ्या डोळयासमोरून डझनभर साप घरातून फिरतात असं वाटू लागलं.

भिवा गेला पण जाता जाता मनात भीती घालून गेला. खरंच रात्री मी झोपणार कसा? गच्च झाडा झुडपांनी भरलेलं ते गाव अनेक चावऱ्या, डंख मारणाऱ्या प्राण्यांनी भरलेलं होतं.

विचार करता करता लक्षात आलं की आपण छोटीशी शेकोटी खोलीच्या कोपऱ्यात केली तर प्राणी येणार नाहीत. पण शेकोटी करायला लाकडं कुठे होती. बाहेर खूप लाकडं पडली होती. पावसा अगोदर सुकी असलेली ती आता चिंब भिजून गेली होती.

एवढ्यात लांबून दोन मुलं येताना दिसली. दोघांच्या डोक्यावर खुर्च्या होत्या. एकाच्या खांद्यावर एक कपड्या सारखं काहीतरी होतं.

"पावण्यानु भायरच उबे? थंडी नाय? थंडगार झाला. सोसात तुमका?" डोक्यावरच्या खुर्च्या पडवीत ठेवता ठेवता त्यातला एक जण मला विचारत होता. मला हसू फुटलं. दोघेही बारा चौदा वर्षांचे असतील. करदोट्यावर आत्ताच लंगोट आला होता. त्या पुढचा भाग पसरून लज्जा रक्षणाचा

केवीलवाणा प्रयत्न ते करत होते. मागे लंगोटाचा मागचा भाग कुल्ल्यामधे घुसून नाहीसा झाला होता. बाकी सगळे दिगंबर. ते पूर्ण कपडे केलेल्या मला विचारत होते "थंडी नाय?"

गरिबीतून झालेला कडेलोट पचवून हे माझी काळजी करत होते.

"काय रे हे सर्व काय घेवून आलात? कोणी पाठवलं?"

"गावड्यानी दिला हा. येतहत ते. हय कायच नाय बसाक. सरकारी सायब रवक ईलेत. दोन खुर्च्यो, ही हातरणी झोपाक, ह्यो फाणस (कंदील) रातच्याक उजवाड होयो ना! म्हणून. फाणसात घासलेट भरला हा. जातव आमी. खाटलो घेवन येतव. मगे गावडे येतीत तुमच्याशी बोलाक."

गावावर मी पहिल्याच दिवशी फिदा झालो. मला फक्त भिवा म्हार भेटून विचारपूस करून गेला होता. गावडे कोण ते मला भेटले नव्हते. तरी त्यांनी एवढं सगळं माझी काळजी करत पाठवलं होतं.

गाव सुधारण्यासाठी सरकारने मला पाठवलं होतं. पण पहिल्या दिवसापासून माझाच मानसिक सुधार चालू झाला होता.

थोड्याच वेळात तीच दोन मुलं खाटलं घेऊन आले. आत भिंती जवळ व्यवस्थित लावून जाता जाता म्हणाले, "सायबानु सावचीतपणान बसा हां. वांयच डळमळता हा. पडलास तर लागुचा नाय पण किरडू बिरडू आला नी दुकावला तर चावात न्हय वो."

परत किरडू साप ऐकून मी धसकलो. रात्र वैऱ्याची होणार वाटू लागलं.

"ह्यो पिपळा वरच्या राकणदाराचो आंगारो पाठवलानी हा गावड्यानी. राती लावन झोपाक सांगल्यानी. काय होवचा नाय."

माझ्या पोटातला गोळा प्रत्येक जण वाढवत होता. लांबून कोणीतरी येताना दिसले. राजापुरी पंचाचा पुढचा सोगा पकडून ऐटीत डुलत येत होते. गावडे असणार हा अंदाज खरा ठरला.

"सायबानु! बरे आसास ना? भिवान सांगल्यान तुमी ईलास ते. पावण्याची सोय बगाक नुको? गावचो नेमच हा तो. गावची व्हयवट आमच्या हातात. सगळा पाठवलंय. आजून काय होया?"

"दोन चार सुकी लाकडं मिळतील काय हो?"

"काय रांधतलास काय? सुकाट(सुका मासा) बिकाट खातास ना? दोन भाकरी नी भाजक्या सुकाट तेल फकी लावन पाठवतय. रांदूक हा काय तुमच्याकडे! बायलेक नाय हाडलास?"

"लग्न नाय झालंय माझं अजून"

"अरे देवा! वो किती वर्साचे तुमी! आजून लगीन नाय? किती थांबशाल? अशान घोड नवरी गावात तुमका. काय उपेग! अशेच मेलास तर गावात दुसरो मुंजो बसात आमच्या पिपळार."

हे तोंड फाटकं खास कोकणी रसायन होतं तर? काय बोलावं समजत नव्हतं.

तेवढ्यात ते दोघे स्वयंसेवक लाकडाचा एक भारा घेवून आले. एकाने विचारलं,"लाकडा पेटवून धुनी करू? पावसान थंडावला हा."

माझ्या उत्तराची वाट न बघताच दोघांनी पाच मिनिटात खोलीच्या कोपऱ्यात शेकोटी पेटवली. दोघेही पुढ्यात बसून मस्त हात शेकत बसले. मला शंका आली, त्यांनी शेकोटी स्वत:ची थंडी पळवायसाठी केली की माझ्यासाठी?

दहा मिनिटं झाली असतील. गावडे गप्पा मारता मारता ओरडले,"मायxxxx नु शेकत काय बसलास! काम धंदो नाय तुमका? सायब काय होया आजून?"

मी मानेनेच नाय म्हणालो. थोडं अवघड वाटत होतं. हे माझी एवढी सरबराई करतायत आणि मी त्यांना साधा चहा पण पाजू शकत नाही. आता ते दोघे गेले होते. गावडे आणि मी दोघेच होतो. गावडे गावच्या गजाली सांगू लागले. आता सूर्य मावळतीला लागला होता. पायाकडे एक कानेटी सरसरत येताना दिसली. रात्रीची नांदी सुरू झाल्याचं ते लक्षण पाहून माझ्या पोटातला गोळा वाढू लागला.

आता समजत होतं. या गावात कोणीच सरकारी नोकर का टिकत नव्हता.

गावडेंच्या गजालीत माझं लक्ष नव्हतं. ते त्यांच्या जसं लक्षात आलं तसं म्हणाले, "काय बगतास? कानेटी? काय नाय करूची ती. कानात

कायतरी घालून झोपा. ती काय करत नाय. कानात गेली तर मातर वायट. घर करता म्हणतत. पोराय घालता कानात."

यांच्या प्रत्येक वाक्याबरोबर माझ्या मनातली भीती वाढत होती.

तेवढ्यात गावडे म्हणाले, "सायबानु! लय थंडी हा वांयच लावया काय वो?" मूठ वळून आंगठा तोंडाकडे नेला होता. "मी पीत नाही. तुम्ही प्या."

"असा म्हणतास! पितय बापडो एकलो. आठ आणे हत? पैशे घेवन नाय ईलंय मिया." मी रुपयाची नोट काढून दिली. हे बरं झालं. चहा पाजू शकत नव्हतो. हा तरी पाहुणचार होतोय असं वाटलं.

रुपया खिशात घालत गावडे स्वत:शीच बोलू लागले. "आजून कसो नाय ईलो xxचो. आळशी मेलो. आजून भट्टी तापली नाय काय?" ते काय बडबडतायत ते मला समजेना. एवढ्यात एक माणूस आला.

"गावड्यानु! पंचायतीत बोलावलास ता? आज हय खंय?"

"दिसत नाय नवे सायब ईलेत. तेंची उठ बस कोण करीत! तुजो आजो?" कोकणी अर्क गावडे उधळत होते.

"बसून काय रवलं? काय हाडलंस ता दी आणि जायत रव. ह्यो घे रुपायो."

त्या माणसाने खिशातून बाटली काढली त्यांच्या हातात देता देता म्हणाला, "पयल्या धारेची हा. तुमका लागता तशी."

तो निघून गेला.

"तुमी नायच म्हणतास मग घेव मिया?" मी होय नाय म्हणायच्या आधीच खिशातून प्लास्टीकचे कळकट ग्लास काढून त्यांनी भरले व पहिला घोट मारला देखील. एक मिटकी मारत तोंड वाकडे तिकडे करत ग्लास खाली ठेवता ठेवता बडबडले "आज छान भट्टी जमलंली दिसता. अगदी पयल्या धारेची दिल्यान हा."

हे पयल्या धारेचं प्रकरण मला समजत नव्हतं. विचारलं, "गावडे पयल्या धारेची म्हणजे?"

"काय वो माजी गरीबाची थट्टा करतास! शिकलंले तुमी. दारू कशी करतत म्हायत नाय?"

मग त्यांनी साग्रसंगीत दारूच्या जन्माचं शास्त्र मला समजावलं. शेवटी बाष्पातून पहिल्यांदा येते ती "पयल्या धारेची" हे अगाध ज्ञान मला दिलं. तोपर्यंत ग्लास आणि बाटली दोन्ही रिकामी होत आले होते.

"वायच घेतला असतास तर छान घोरला आसतास राती."

मला हसू आलं. हा गावडेंचा स्वभावरंग बरंच काही शिकवत होता. जाता जाता म्हणाले, "पाटवतय हा भाकरी नी सुकाट. जेवन छान नीज काडा. पण तो अंगारो लावक इसरू नकोत हा. तो मुंजो दिवसाचो पिपळार रवता. आणि रातीचो गावात येवन सगळ्याभर नजर फिरवत जाता. काय तेका पसंत नाय पडला तर धुमशान (आरडा ओरड करत गोंधळ)

घालता."जाता जाता त्यांनी माझ्या उरल्यासुरल्या हिम्मतीवर घाला घातला.

ते गेले आणि एकटा पडवीत बसलो. थोड्या वेळात आभाळ भरून आलं आणि काळोख भरभर वाढू लागला. आत येऊन मी खाटीवर बसायला बघितलं. जरा हललं की ती डगमगे आणि विचित्र आवाज काढे. दिवस भराच्या सर्व गोष्टींनी मनावर एवढं दडपण आणलं होतं की कुठलाही आवाज आता मला मुंज्याचाच वाटत होता. दमलो थकलो होतो तरी झोप येणार नाही याची पक्की खात्री झाली होती.

गाव सुधारणेवर, सरकारी मदती मिळवण्यावर विचार करू लागलो. पोटातली भीती घालवण्याचा तो प्रयत्न होता.

आता रात्र पडत होती. उठून कंदील लावला. वात मोठी ठेवली. जास्त प्रकाशात भीती कमी वाटेल हा अंदाज. एवढ्यात एक खांद्यावर कांबळे घेतलेला तगडा माणूस घरात शिरला. जमिनीवर ठेवलेल्या कंदीलाचा खालून वर जाणाऱ्या प्रकाशाने त्या माणसाचं रूप भयानक केलं होतं. हाच तो मुंजा. मी थरथरू लागलो. बाहेर पाऊस आणि विजांचा कडकडाट आधीच सुरू झाला होता. हा भयानक मुंजा माझ्या समोर पाण्याने निथळत उभा होता. भीतीने मी थरथरत होतो. माझ्या हलण्याने खाटलं एका लयीत कुरकुर करीत होतं.

"गावड्यानी जेवाण धाडला हा. ह्या घ्या." माझ्या खाटल्यावर त्याने कागदात गुंडाळलेली भाकरी ठेवली. धुनी केलात? बरा हा. भिजलय वो पावसात. वायच शेक घेतय. "असं म्हणत तो शेकोटी पुढे बसला.

हा मुंजा नव्हे, गावडेनी पाठवलेला माणूस आहे हे माहीत पडून थरथर आणि खाटल्याची कुरकुर दोन्ही थांबली होती. तो शेकत बसला त्याची सोबत होती. तगडा गडी होता. डोक्यात प्रकाश पडला,

“नाव काय रे तुझं?"

"धाकु! सगळयात धाकलो (लहान) म्हणून धाकू म्हणतत."

"रात्री रहातोस माझ्या बरोबर?"

"नाय वो! आज बायलेन कोंबडी रांधली हा. घरात इल्लंली कोणाची तरी. दोन दिसापासून झाकून ठेवललान. आज खुर्दो करतली. पावस हा. थंड हा. मकमकीत जेवन झोपाची मजा सोडून हय खय रवतलंय!"

माझा बेत सपशेल फसला.

"येतय मिया. भाकरी खावन घेवा. थंड झाली तर खाशात कशी?" मला उपदेश करत तो बाहेर पडला आणि मी परत एकटा झालो..

खरंच मुंजा असेल का? का हा या अशिक्षितांचा भ्रम आहे? आपण शिकलेलो आहोत या भाकडकथांवर विश्वास ठेवून सुधारणा कशी करणार. सकाळपासून जे जे भेटले त्या सर्वानी मलाच बदललंय. दहा तासात माझा पार भित्रा भागुबाई केलाय.

आणि पुढ्यात काळोखी, पावसाळी, विजांचा कल्लोळ करत रात्र कमरेवर हात घेऊन उभी आहे. हसते आहे. कशी रात्र काढतोस तेच बघते असं खिजवते आहे. कंदीलाच्या वाती कडे मी एकटक पहात, त्या मंद प्रकाशाच्या आधाराने भीतीला पळवायचा केविलवाणा प्रयत्न करतो आहे.

आत्ता कुठे आठ वाजत आहेत. दहा अकरा तासानी उजाडेल. एक एक पळ तासाचं वाटतंय. कशी जाईल आजची रात्र?

पेपर उघडून पुडी पाहीली तीन सणसणीत भल्या मोठ्या भाकऱ्या गावडेनी पाठवल्या होत्या. अगदी आतल्या भाकरीत एक मोठा सुका बांगडा भाजून तेल तिखटाने माखून पाठवला होता.

हळू हळू जेवणात मन गुंतवलं. भाकरी थंड होत आली होती पण अजूनही उब पकडून होती. छान लागत होती पण तीन भाकऱ्या संपवणं मला शक्य नव्हतं. पोटभर खाऊन देखील एक भाकरी आणि एक चतकोर राहिला. पेपरात गुंडाळून ठेवला. आणि धुनीतली लाकडं चाळवून पेटती केली. आता झोपूया उगीच जागं रहाण्यात अर्थ नाही असं ठरवून आडवा झालो डोळे मिटतो न मिटतो तोच विजेचा कडकडाट अगदी जवळून झाला. चादर डोक्यावरून ओढून पाय पोटाकडे घेत गुटली करून झोपायचा प्रयत्न करू लागलो.

घरापासून, आपल्या लोकांपासून लांब रहाणं, तेही अशा डोंगरातल्या कोकणी गावात किती असुरक्षीत असतं ते अनुभवत होतो. उद्याची सकाळ लवकर कर असा धावा करत झोपायचा प्रयत्न करत होतो.

जे व्हायचं ते होतच असतं. डोक्यावरून पांघरूण घेऊन होणारं काय टळणार नव्हतं. पण मग जरा सुरक्षित का वाटत होतं?

त्या उघड्या बोडक्या घरात दोन्ही दारं टळटळीत उघडी. दारंच नव्हती. भिंती मातीच्या. खिडक्यांना फक्त गज होते. एके काळी दरवाजे लावल्याच्या खुणा होत्या. पण दारं गायब होती. बाहेर पाऊस हौदोस घालत होता. एकदम् लख्ख प्रकाशाने खोली उजळून निघाली. काही सेकंदात कडकडत वीज पडल्याचा आवाज आला.

पांघरूण केव्हाच बाजूला झालं होतं. परत प्रकाश पडला. खोलीत काना कोपऱ्यात नजर फिरवली. सगळं काही व्यवस्थित होतं. कुठलाच प्राणी अजून तरी आला नव्हता. अशा पावसात मुंजा गावात फेरी मारायला निघेल का? हा विचार आला. कोणीच बाहेर पडणार नाही तर तो तरी का बाहेर पडेल? असं वाटून शांत होतोय तोच दुसरा विचार आला. मुंजांना, भुतांना पाऊस वीज यांची भीती वाटेल? शक्य नाही. ते या जगातले नाहीत. त्यांना मोक्ष मिळेपर्यंत कसलीच भीती नाही. पण भुतं, मुंजा, हडळी असतात तरी का, की एक समज आहे नुसता?

किती वाजले? घड्याळात पाहीलं. ९.३०च झाले होते. वेळ मुंगीच्या चालीने पुढे सरकत होता. पावसाचा जोर आणि आवाज आता कमी होत आला होता. बाहेर डरांव डरांवचा घोष बेडकांनी लावला होता. त्यांची सोबत पण धीर देत होती. ते तर पूर्ण उघड्यावर होते. स्वच्छंद भटकत होते. मुंजाच्या पायात आले तर तो त्यांना मारत असेल?

माझे विचार स्वैर धांवत होते. आणि मी स्वतःला पांघरुणाने घट्ट गुंडाळून घेत होतो.

पाऊस थांबला होता. दुरून आवाज येऊ लागले. कोल्हेकुई चालू झाली होती. हळू हळू आवाज जवळ जवळ येत होता. हे माझ्या घरात तर घुसणार नाहीत? असा विचार येतो न येतो तोच त्यांचा आवाज घराच्या अगदी मागच्या बाजूला आला. माझी घाबरगुंडी उडाली. हे मागच्या उघड्या दारातून सहज आत येणार वाटू लागलं. मी पांघरूण घट्ट गुंडाळून घेतलं. पुढच्या पांच दहा सेकंदात आवाज दूर जातोय असं वाटू लागलं. आणि खरंच कोल्हे थोड्याच वेळात लांब गेलेल्याचा आवाज येऊ लागला. मी पांघरुणातून बाहेर आलो. कोल्हा तर पक्षी, कोंबडी खातो. माणसाला घाबरून पळून जातो. मग मी घाबरलो का? मग हसू आलं. आता आले तरी घाबरायचं नाही ठरवलं.

पाऊस थांबला होता. कोल्हेकुई थांबली होती. डरांव डरांव च्या तालावर मला गुंगी चढू लागली आणि केव्हा झोपलो कळलंच नाही.

जाग आली ती मांजराच्या गुरगुरण्याने आणि कोणाच्यातरी चीं चीं अशा आवाजाने. पांघरूण उडवून मी पाहिलं तर काटेरी पिसेवालं साळुंद्र आणि मांजर भांडत होते. मजेत बघत बसलो. ही झुंज जन्मात पाहीली

नव्हती. थोड्याच वेळात मांजर जिंकलं आणि साळुंद्र तुरू तुरू चालत मागच्या दारातून अंधारात नाहीसं झालं.

घड्याळात पाहीलं अडीच वाजले होते. सहा वाजायला बराच वेळ होता. कंदीलाच्या प्रकाशात दिसलं मांजराने भाकरी आणि आत उरलेला मासा फस्त केला होता. मी त्याला बाहेर काढलं नाही. असू दे तेवढीच सोबत.

बाकी सर्व ठीक होतं. परत झोपायला गेलो मन बरंच स्थिरावलं होतं. पावसाचा, बेडकांचा, कोल्ह्यांचा सर्व आवाज बंद झाले होते.

बारा वाजून गेल्याला दोन तासावर झाले होते. मुंजा फेरी मारूनही गेला असेल. आता शांत झोपू म्हणून आडवा झालो. केव्हा झोप लागली कळलंच नाही.

बाहेर लांब कुठल्या तरी वाडीत गोंधळ होऊन आरडा ओरडा चालू झाला त्याच्या आवाजाने जाग आली. तो आवाज जवळ येत गेला. उठलो. उघड्या दारातून रस्ता नजरेत येत होता. एक बाई अंगात आल्या सारखी घुमत होती. चार बायका तिला आवरायचा प्रयत्न करत होत्या. मागून एक दोन पुरूष त्यांना सोबत करत होते. सगळेच गावाच्या बाहेर चालले होते.

एवढंच समजलं की तिच्या अंगात आलंय आणि ते उतरवायला सगळे पिंपळाकडे चालले होते.

चार वाजले होते. सकाळ व्हायला अजून दोन अडीच तास होते. सगळ्या घटनांनी झोप उडवली होती. मग बसून काही स्तोत्र म्हणून झाली.

काही भजनही गाऊन झाली. मग थोडं एकाग्र चित्त बसलो. लांब कुठेतरी कोंबडा आरवला. रात्र संपत आली होती. मी एकसंध ठणठणीत उभा होतो. ती रात्र संपल्याचा आनंद झाला. हिरण्यातला पहिला दिवस संपला होता. आज नवा दिवस काय शिकवतो पाहू. पण एक समजलं मुंज्या ही एक वदंता आहे. बस्स.

बॅग उघडून चहा पत्ती व साखरेचा डबा काढला. दूध नव्हतंच. काळा तर काळा पण चहाची गरज वाटत होती. शेकोटी कडे आलो. तीन लाकडं शेकोटीच्या बाजूला लावून चूल बनवली पाण्याचं पातेलं ठेवून जाळ मोठा करायसाठी लाकडं हलवली. तर खोलीच्या कोनात काहीतरी हलल्याचा भास झाला. पाहीलं तर तिथे एक वेटोळं पडलं होतं. बापरे साप आहे की काय? दचकून मी मागे झालो. सापाची तशी भीती वाटत नव्हती. जवळ जायला भीती वाटे एवढंच. काठीच्या आपटण्याने ते पळून जातात आणि पाय पडून किंवा इतर कशाने त्यांना दुखावलं नाही तर ते काही करत नाहीत, या गोष्टी कित्येकांनी सांगितल्या होत्या.

एक लाकूड घेऊन आपटू लागलो. काहीच हालचाल दिसली नाही. माझ्या मनाचे खेळ होते ते. एका दोराची गोल वाळलेली गुंडाळी पडली होती. एका दिवसात मला हिरणं गावानं भित्रट नेभळट करण्याची किमया केली होती.

आता आरामात चहा करून प्यालो. बाहेर काळोख होताच, पण चारी बाजूनी कोंबड्यांच्या बांगा सुरू झाल्या होत्या. केव्हाही उजाडणार होतं.

बाहेर पडवीत आलो तर अगदी पुर्वेच्या ढगांचे शेंडे रंगू लागले होते. अनिमिष नेत्रांनी मी ते दृष्य पहात बसलो. हळू हळू रंग बदलत होते. पूर्वेला विरळ ढगांच्या गर्दीतून किरणांचे झोत वेगवेगळया दिशेने फाकू लागले. जणू काही कित्येक रंगांचे टॉर्च ढगांवरून कोणी तरी पृथ्वीवर मारत आहे असंच वाटत होतं. सूर्य मात्र ढगांच्या वरच दडून बसला होता. "मित्रा ये रे" अचानक मनात आलं. त्याच्या दर्शनाला आज मी किती आतुरलो होतो? असं कधीच घडलं नव्हतं

सूर्याचा एक रात्रीचा विरह कसा असह्य होतो ते अनुभवलं होतं.

"काय सायबानु उठलास? नीज लागली ना?" धाकू पाण्याची घागर घेवून येत होता.

"सकाळी सकाळी गाळी खाल्लंय पोटभर. पाणी आणूचा इसारलंय न्हय वो राती. गावडेनी खंडीभर गाळी दिल्यो नी म्हणाले, भाकरी घशात खेपून पावणो मेलो तर तेचो मुंजो तुकाच पकडात बग. धांवत इलंय. तुमका भायर उबे बगून बरा वाटला. सुटलंय."

परत मुंजा तोही माझा? दिवसाच्या सुरवातीलाच धाकू मुंजा माझ्या मागे लावून देत होता.

दररोज दिवसाची सुरवात जर मुंजाने होणार असेल तर लवकरच माझा मुंजा झाल्या शिवाय राहाणार नाही, वाटू लागलं. धाकू गेला. गरम गरम चहाचा आस्वाद घेत मी हिरण्याचा निसर्ग न्याहाळत बसलो होतो. महिन्यापूर्वी पेरलेली शेती लावणीला आली होती. आता जोरदार पाऊस आला की सगळे लावणीत गुंतणार होते.

सूर्य नेहमीसारखाच ढगांशी लपंडाव खेळत उगवत होता. मधेच किरणे हिरण्याला उजळीत होती. रस्त्याच्या समोरच्या बाजूने जास्वंदीची झाडे मधूनच उगवलेली दिसत होती. छान तजेलदार फुलांनी डंवरली होती. मधून मधून असलेल्या काजूच्या झाडांना जांभळट गुलबट पालवी फुटत होती. निसर्गाने हिरण्याला भरभरून दिलं होतं. ते पहात किती वेळ गेला समजलं नाही.

लांबून आवाज येऊ लागला म्हणून पाहीलं. पाच सहा लोक येताना दिसले. एक दोन बायकाही होत्या. तिघा चौघांच्या डोक्यावर लाकडी सामान दिसत होतं. दारं खिडक्यांचं सामान होतं ते. तयार दरवाजे. खिडक्यांची तावदानं? मापं न घेता एका रात्रीत बनली? मग समजलं. पंचायतीची ही खोली वापरली जात नव्हती. वाळवी लागू नये म्हणून सुतार दारे खिडक्या काढून घेऊन गेला होता. आता मी रहाणार म्हणून घेऊन आला होता. पुढच्या दोन तीन तासात सगळी दारं खिडक्या बसवून झाली. दारांची घडण एकदम जुनी होती. आतून दार बंद करायचं असेल तर एक लाकडाचा भक्कम धोटा गोल फिरवून दुसऱ्या दारा मागे लावलेल्या

ढाच्यात भरला की दार आतून बंद. बाहेरून बंद करताना एका दाराच्या चौकटीवर तीन कड्यांची एक साखळी. तर वर चौकटीवर एक गोल रिंगची मागची दांडी आरपार घुसवून वाळलेली. दारावरची ती साखळी या रींग मधे अडकवली व कुलूप लावलं की बाहेरून कडेकोट बंद. सगळं काम भक्कम. राजवाडी. मनात आलं रहा बेटा या सरकारी महालात. आता दारं खिडक्या लागली. कोणाचीच भीती नाही. मुंजाची पण. परत मुंजा? हाट! जरा पण मुंजाचा विचार करायचा नाही. मुंजा नाहीच तर का घाबरायचं!

काम चालू होतं म्हणून पडवीत बसलो होतो. आवाज कसला झाला म्हणून मागे पाहिलं तर एका बाईने माझं सगळं सामान बाहेर काढायला सुरवात केली होती. ती आतली खोली रिकामी करत होती. थोड्याच वेळात खुरप्याने जमिनीच्या पोपड्या उखडायला त्यांनी चालू केलं. आणखी दोन मुली पण आल्या. चौघींनी तासाभरात पोपड्यांचा हा ढीग केला. तो बाहेर टाकेपर्यंत मुली कुठून तरी शेण घेऊन आल्या. त्यांनी जमीन सारवून खोली एकदम नवी केल्यासारखी सजवली.

मला समजत नव्हतं मी न सांगता हे काम कसं काय करतात. याचा खर्च कोण देणार? मला सरकारने खर्चाचं बजेट दिलेलं नाही. हा खर्च माझ्या डोक्यावर तर नाही ना पडणार?

मी सुताराला तसं विचारताच त्याच्या उत्तराने चक्रावलो.

"कसलो खर्च घेवन बसलास. पंचायत आमचीच. पंचायतीचं काम म्हणजे आमचाच वो! आमीच करतलंव. नाय तर काय देव येतलो की मुंजो येतलो?"

वा! असा एकोप्याचा विचार असला तर माझं काम सोपं होणार होतं. मी मनात सुखावलो.

मला काम नव्हतं म्हणून मी पेटी उघडून भांडी बाहेर काढली. स्वच्छ घासून पुसून तयार ठेवायची, आतापर्यंत गावड्यांनी जेवणाची सोय केली होती. आता आपलं आपण करावं ठरवलं.

"गे बाय! भांडी घासतलात? तुमी रांधतलात? बायलेक नाय हाडलात? देवा ती भांडी माज्याकडे हिरीर जावन झळझळीत करून हाडतय." एक बाई हुकुमशहा सारखी मला विचारतही होती व मोठ्या आवाजात दरडावतही होती. पण त्यातून काळजी पण ओसंडत होती. बायकोशिवाय हा माणूस घरची सगळी कामं कशी करणार ही काळजी. ती भांडी घेऊन गेली. आणि सुतार मला सल्ला देऊ लागला.

"बायलेक हाडाचा वो. कसा रामासारक्या शीतेक बरोबरच ठेवचा. रामान नाय शीतेक रानात्सून फिरवल्यान? एक दोन नाय चौदा वर्सा. घेवन येवा तिका लवकर."

"काय घेवन येतले! लगीन खंय झाला तेंचा?" गावडे केव्हा आले ते माहीत पडले नाही.

आजच्या दिवसात दारं लावून झाली. सारवण झालं. भांडी 'झळझळीत' घासून आणून एका पोत्यावर त्या बाईने छान मांडून ठेवली.

"चूल नाय. लिपाक होई. नायतर रांधतले कशे?" ती मगाचीच बाई काळजीने विचारत होती.

"उद्या कुंबार येतलेत घरावरचे नळे परतूक. तेंका सांगाक होया एक चूल लिपून देवा हेंका. तवसर भाकरी पाठवू आमी." गावडेनी आपला मानस सांगीतला. मग लग्न आणि जेवण दोन्ही विषय बंद झाले. संध्याकाळ होत आली होती.

"येवा रे आता तुमी. काय रवला आसात तर उद्या करा ता काम. जावा आता." गावडेनी हुकूम सोडला. सगळे भुरूभुरू निघून गेले. मी आणि गावडे गप्पा मारत होतो. मधेच मागून आवाज आला, "मालकानुं तुमचा कंत्राट हाडलंय. घेवा." तो कालचाच माणूस आला होता.

"कालच्या सारकीच हा ना? पयल्या धारेची? नायतर पैशे देवचय नाय हा."

"माका काय म्हायत नाय? तुमका कशी लागता ती. खुष होशाल बगा."

तो थोडा वेळ रेंगाळला मग म्हणाला, "पैशे देतास?"

"अरे एक ही चपटी बाटली आठ आण्याक देतं ना रे? काल रुपयो दिललंय ना? मग रांडेच्या आता कसले पैशे मागतं?"

"हां नाय! इसारलंय. मालकानुं आज काय तशी इक्री नाय होवक. घराक जाताना पोरांका कायमाय खावक नेवक होया. आज देवा. मग पाटसून बगुया काय ता."

गावडेनी माझ्याकडे पाहीलं. मी समजलो. खिशात हात घातला.

"आठ आणे देवा तेका. नायतर गेले समजा." माझ्या खिशात रुपयाचा शिक्का होता. तो रुपया घेऊन गेला.

गावडेनी मग खास गजाली चालू केल्या. बाटली कमी कमी होत होती आणि गजाली रंगतदार होत होत्या. मधेच म्हणाले,"काय वो जात काय तुमची? हय कोण गावली तर लग्नाचो बार उडवुया काय वो?"

मी गडबडलो. सरकारी कोट्यातून नोकरी मिळालेली. जात सांगीतली असती तर उद्यापासून कोणी आले नसते भेटायला. पाणी मिळाले नसते यांच्या कडून. जात पात आणि बलुतेदारी जिवाभावाने कवटाळली होती त्यांनी.

"आम्हाला जात सांगायची बंदी आहे. जात सांगीतली की जातवाले येतात कामं करवून घ्यायला. वशिला तो. नोकरी जाईल माझी." काय येईल ते बरळत होतो.

"रवांदे रवांदे (राहू दे) आता जातीच बदलतं हत. वकील डाकतर, सरकारी बाबू, आणि काय काय नवीन जाती आयकतंव. पण आमी आजून जुन्यातच वावरतव. नवीन आमका काय पटणा नाय वो. मुंजो भडाकलो तर?"

बाटली संपली होती. रात्र पडत होती. गावडे घरी निघाले आणि माझी सुटका झाली.

रात्री कामाची यादी तयार करत बसलो. दारं खिडक्या लागल्याने जीव शांत झाला होता. धाकू भाकर घेऊन यायचीच खोटी. ती खाऊन मस्त झोप काढणार होतो.

रात्री धाकू भाकरी घेऊन येईपर्यंत खाटीवर आडवा पडून विचार करताना गावडे बरोबरची जुगलबंदी आठवली. मी विचारलं, "गावडे तुम्ही नायतर गावातल्या कोणी मुंजाला पाहीलंय का?"

"कोणाक दिसणा नाय तो. बिथारलो तर सरळ मानगुटेर बसता. हैराण करता. माणसाक केवा केवा मारुनय टाकता."

"किती वर्ष झाली. कोण मेला त्याचा मुंजा झाला?"

"वो काय तुमका इश्वास वाटत नाय? माज्या आज्याक तेंच्या आजान सांगीतलल्यान. कोणाचो मुंजो तो. भटाचो पोर होतो. चार दिसार लगीन होता नी पिपळाबुडी साप चावन मेलो. तेचो मुंजो झालो. वोगीच संशाय घेव नुको. तुमका हिसको दाकवीत."

"म्हणजे तो नक्की कोणाचा मुलगा, किती वर्षापुर्वी गेला हे कोणालाच माहीत नाही?"

"वो! नको वो असा बोलू. आज रातीक येयत तुमका नी माका दोगांकाय हैराण करीत. तो आसा. सगळा गाव मानता ता काय खोटा?"

मला हसू आलं. गावडे आता उत्तर सापडत नाही म्हणून लोकांचा निर्वाळा देत होते. चार सहा पिढ्यांपासून चालत आलेला हा मुंजा एक शेंड्या बुडख्या शिवायचा समज गावात पसरवला होता. का? कशासाठी? या प्रश्नांची उत्तरं शोधली पाहिजेत तरच यांचा विश्वास उडवणे शक्य होईल.

रात्र छान गेली. आदल्या रात्रीचं जागरण आणि बंद दारं खिडक्यांनी खूप धीर आला होता. मुंजा हा एक समज आहे याची खात्री झाली होती. झोपण्या अगोदर कामांची यादी तयार केली. त्यामुळे कामाला सुरुवात केल्याचं समाधान होतं.

बिडीओ खुर्च्या टेबल वगैरे ऑफिसच्या कामाला लागणारं सर्व सामान पाठवणार होता. सरकारी कारभाराप्रमाणे ते आठवडाभर तरी येणार नाही याची खात्री होती.

शांत झोप लागली. सकाळी चांगला उजेड पडल्यावर जाग आली होती. धाकूला सांगून ठेवलं होतं, सकाळी येताना कपभर दूध आण. चहा करायला ठेवला व त्याची वाट पाहू लागलो. आज त्याला का उशीर होत होता?

थोड्याच वेळात आला. म्हणाला, "धनी रातभर झोपाक नाय. मुंजाचो घोर लावन बसलेले रातभर. राती येवन मारीत म्हणा होते. तुमका नाय नाय त्यो गाळी घाला होते."

बापरे म्हणजे आजपासून गावडे मनात राग ठेवून यायचे बंद होणार? गावडे रागावले तर सगळं गाव रागावणार माझ्यावर. गावात रहाणं शक्य तरी होईल का? झालं दोन दिवसात मी मोठा घोटाळा करून ठेवला होता. आता काय?

दोन दिवस हिरण्याचं पाणी प्यालो होतो. एक जबरदस्त कल्पना आली. "घाकू काल मुंजाने मला घाबरवून सोडला रे. रात्री दार घडघड वाजवत होता. गुरगुरत होता. जाताना म्हणाला, तुमच्या भाषेत, नवीन आहेस गावात म्हणून सोडतो. परत मला मानत नाहीस असं जरापण दाखवलंस तर जीव घेईन तुझा. त्याचा राग किती दिवस चालतो रे?" मी मस्त लोणकढी ठोकून दिली.

"वो काय सांगतास काय! सोडल्यान तेणी तुमका? चिडलो तर आयकत नाय. तुमका सांगतय आजच कोंबो मारूया पिपळाखाली. उशीर नुको. शांत करूया तेका. गाराणा घालूया. जातय मिया. मालकांका सांगतय ह्या सगळा." घाकू एवढं बोलून लगबगीने निघून गेला.

मी शांतपणे गरम गरम चहा प्यायला घेतला. भटजींच्या मुंज्याला कोंबड्याचा प्रसाद? वा! रे वा! हिरणेकरांनो. मला हसू फुटलं. गोळी बरोबर लागणार याची खात्री झाली.

हिरण्याच्या पाण्याने कोकण्यांची बुद्धी मला दोन दिवसात बहाल केली होती.

दिवस वर येत होता. आठ वाजले असतील. आठदहा पोरं आणि एक बैलगाडी येताना दिसली.

गाडीतून छपरावर घालण्यासाठी नळे घेऊन कुंभार आला

होता. बरोबर आठ दहा तरुण पोरं पण होती. दोन बाया पण होत्या.

येताच कुंभार म्हणाला, "नळे परतलंव (कौले व्यवस्थित लावणार). फुटलंले बदलतलव. तुमची बायल नाय समाजला. धा बारा जणांचा जेवाण करूक म्हणून बायकांकाय घेवन इलंव. तेंका तांदूळ नी काय ता द्या. सगळ्यांचा जेवाण करतीत. तुमी आरामात बसा."

बापरे शेराचा भात जेवणारे हे लोक. एवढ्या लोकांसाठी तांदूळ कुठे होते माझ्याकडे. सांगितलं तर म्हणाले, "पाष्टेकडे पाठवतय एका झीलग्याक(मुलाला). पाष्ट्याच्या दुकानात सगळा गावातला. तो हिशोब पाठवीत उद्या परवा. तेवा पैशे द्या. तुमका "नाय" नाय म्हणूचो. सरकारी माणूस तुमी. पगाराक पैशे भागवल्यास तरी चलात"

मग एक बाई पुढे आली, "पाष्ट्याकडे पाटवतास मगे सांगतय ता घेवन येवा. तांदूळ दोन पायली, चण्याची डाळ शेरभर आमटेक, कणयो शेरभर नी दुध दोन शेर खीरीक, साकर शेरभर. बाकी मीठ मिरची मिया हाडलंय. काय रवला तर पाठवुया परत कोणाक तरी. पाष्टे काय एका ढेंगावर हा."

हे ऐकताना माझी ढेंगं कापायला लागली. माझा पगार तो किती? घरी पैसे पाठवायचे ते वेगळे. आणि इथे हे लोक माझ्या पोराच्या लग्नाची मेजवानी करायला चाललेत. ते ही मला न विचारताच, माझ्या लग्ना आधीच.

तेवढ्यात भिवा म्हार येताना दिसला. त्याच्याशी गप्पा मारताना आलेला ताण घालवायला बरं. "भिवा आलास! ये. अरे यांनी जेवण इथेच करायचं ठरवलंय. माझ्याकडे एवढी मोठी भांडी कुठे आहेत?"

"खेका चिंता करतास! सगळे मिळून करतले. भांडी नसली तर देवळात्सून हाडतीत. तुमी निवांत बसा. वो ह्यो रिवाज आसा. तुमी यजमान तुमचा घर परतहत ना? नवे नळे घालतले ना? मगे तेंका जेवाण घालूक नुको? आणि आमकाय मानकरी म्हणान?"

"मानकरी? किती मानकरी येणार?"

“जास्त नाय वो मिया वेस्कर म्हणान, सुतार काल भेटलात तो, लोहाराचो पांडो, कुंबार इलोहा तो काय, चांबाराचो शितलो नाय येवचो. या वर्साकच बापूस खपलो न्हय तेचो. वरीसभर खंय जायचा नाय. गावडे येतले भेटलास तेंका. गांवकरांचे गणपत येतले. भटजी नाय जायत अशे खंयव. सोवळा न्हय वो तेंचा. बगा असे चार पाच येतले." मी मनात मोजले ते सहा झाले होते.

या कोकण्यांची एक मजा वाटली. कोणत्याही गोष्टीचे यांचे उत्तर पाल्हाळ लावून साग्रसंगीत आळवीत. शंकेला स्थान नसे. नाव गाव जात पात सगळ्यासकट सांगत.

दुसरी गोष्ट, सुतारानी सांगीतलेलं पंचायत आमचीच, आज कुंभार व मानकरी जेवणावळ घालून माझ्याकडून सर्व वसूल करत होते. काल गावाची असलेली पंचायत आज मी रहातो म्हणून माझी झाली होती? कुठलाच तर्क लागत नव्हता.

आता पोरं छपरावर चढून नळे उचलून इकडचे तिकडे लावू लागले. फुटके नळे खाली टाकत होते. काम मात्र वेगात करत होते. जेवणा अगोदर काम संपवायचा इरादा दिसला. आणि त्यांनी संपवलं देखील.

जेवायला सगळे मानकरी, बलुतेदार आले. गावातील भटजी सोडून सगळ्या घरची पोरं आली होती. रानातल्या केळीच्या पानांचे गठ्ठे पोरांनी आणले होते. सगळे जेवून मस्त आराम करत पहुडले. कोणी जमिनीवर टॉवेल, पंचा अंथरून तर कोणी दगडाची उशी करून ओल्या जमिनीवर. मानकरी लोक जेवून घरी निघून गेले होते.

मी सर्व प्रसंगाचा विचार करत खाटल्यावर आडवा झालो. जेवण चांगलंच रुचकर होतं. खीर त्या लोकांनी आग्रहाने वाढली होती ती आता आपले रंग दाखवत होती. डोळे केव्हा मिटले आणि गाढ झोपलो समजलं नाही.

सकाळी उठलो तर दारात गावडे हजर. "काय वो! मुंजान आज काय केला नाय मा? काल इल्ललो म्हटलास म्हणून आज रातीक तुमका जीतो ठेवता की मारता तेचो घोर लागललो. राती झोप पण लागाक नाय. सकाळी सकाळी ईलंय बगुक."

"मी बरा आहे. काल कोणच नाय आलं. मी पहिल्यांदा घाबरलो होतो पण मग झोप लागली. आत्ता उठलो."

"चला! बरे आसास समाजला, जीव थाऱ्यार ईलो. आज नाय त उद्या कोंबडो कापून शांत करूया मुंज्याक."

"अहो गावडे, तो आता शांत झालाय. मी जाणतो असल्या गोष्टी. मी भुतांनाच काय देवचारांना पण शांत करतो. म्हणून तर एकटा रहायची हिम्मत केली. नायतर भुतांनी भरलेल्या कोकणात एकटा कोण राहील का?" मी जबरी लोणकढी ठोकून दिली.

"काय म्हणतास काय? मुंजो काय करूचो नाय तुमका?"

"नाही. बघा तुम्ही. चार आठ दिवसात समजेल तुम्हाला."

गावडे माझ्याकडे विचित्र नजरेने पहात होते. त्यांना विश्वास बसत नव्हता.

"बरं गावडे आजपासून मी काम सुरू करतोय. सगळया वाड्या एक एक करून मला पहायच्या आहेत. लोकांची ओळख करून घ्यायची आहे.

त्यांची घरं पहायची आहेत. गावात काय सुधारणा करायची ते बघायचंय. कोणाला बरोबर देता का? मला रस्ते पण माहीत नाहीत."

"आमच्या धाकूक घेवन जा. केवा पाठवू?"

"द्या पाठवून तासाभरात. "मी आणि धाकू निघालो दोन वाड्यांमधे खूप अंतर होतं मधे वेळ मिळाला की होईल तेवढी गावडेंची माहिती काढायचा प्रयत्न करत होतो.

पहिल्या वाडीत लोकांची ओळख झाल्यावर व इतर माहिती विचारून झाल्यावर, मी मुंज्याचा विषय मुद्दाम काढायचो. बोलायचं आणि सोडून द्यायचं धोरण ठेवलं होतं.

माझ्या मनात असलेला मार्ग मी पडताळणार होतो.

पहिली वाडी घेतली ती गावडेंची होती. गावडेवाडी. सावध होतो. पाच सहा घरी गेलो. मुंजाने मला घाबरवलं पण मी त्याला बधलो नाही. मी भुतांना घाबरत नाही. त्यांना मी बांधू शकतो. सांगीतलं की ते माझ्याकडे घाबरट नजरेने बघत. मग मी निघे.

"वो सायब तुमका "शिद्दी"(सिद्धी) हा? देवचार, हडळ, मुंजो कोणाकय सरळ करतास? माका शिकवशात काय तो मंतर?" धाकू विचारत होता.

"शिकवेन पण कोणाला सांगायचं नाही. तुझ्या मालकांकडे पण बोलू नको. मला ही विद्या येते हे पण सांगू नको."

"नाय बोलूचंय."

"आणि अमावास्येला काळोख्या रात्री पिंपळाखाली यायची हिम्मत दाखवशील?"

"तुमी असल्यावर पिपळा खालीच काय, मसणातय येयन."

मला माझं काम लवकर होणार असं वाटू लागलं.

"एक काम कर. उद्या दिवसा स्मशानात जाऊन बचकाभर राख आणशील?"

"दिवसाच ना? हाडतंय बगा उद्याच."

घरी परत निघालो होतो. वर आभाळ भरून येत होतं. ढग एवढे गडद होते की तिन्हिसांजा झाल्या सारखं वाटत होतं. कोणत्याही क्षणी पाऊस सुरू होईल म्हणून झपझप पावले उचलू लागलो. घरी पोचतच होतो एवढ्यात सुसाट वारा आणि पाऊस सुरू झाला. पाऊस, वाऱ्यामुळे एकदम तिरका होऊन आम्हाला झोडत होता. थंडगार टपोरे थेंब चेहऱ्यावर आपटत होते. पुढच्या पाच मिनिटात आमच्या चारी बाजूनी पाण्याचे लोट वाहू लागले. सगळी कडे पाण्याचे लोट उताराच्या दिशेने सुसाट धावत होते. जांभ्यादगडाने बनवलेल्या पाऊल वाटेचा आता एक छोटा ओढा झाला होता. रस्त्याला चढण असल्याने समोरून वहात येणारं पाणी पायांवर आपटून चांगलंच वर उडत होतं. गारठा वाढला होता. दहा पंधरा मिनिटांतलं हे नाट्य पाऊस एकदम थांबल्याने. हळू हळू निवळू लागलं.

भिजून चिंब झालेले आम्ही दोघे घरी पोचत होतो तोच धाकू म्हणाला, "सायबानुं जाव मिया? उद्या लावणी सुरू कराची लागात. रातभर पावस जायत असा वाटत नाय." मी मान हलवताच धाकूने रस्त्याच्या बाजूने एका अगदी निसरड्या पाऊल वाटेने खालचा रस्ता गाठायला धाव घेतली.

कोकण म्हणजे डोंगर टेकड्यांचा प्रदेश. सगळे रस्ते घाटा सारखे वळणे घेत खाली खाली उतरत. गावचे तरूण रस्त्याची ही वळणं चुकवत मधून घसरत धावत खालचा रस्ता गाठीत. वेळ वाचवायची ही तऱ्हा पाहून मला मजा वाटली. पुढे चालत जाऊन परत मागे येण्या पेक्षा हा मार्ग ते चोखाळत. दोनतीन वळणं धाकूने असंच घसरून टाळली. आता तो सरळ रस्त्यावर चालत होता. मी वरून ही त्याची कसरत पहात होतो. पाच मिनिटात तो झाडांच्या आड गायब झाला. मी खोलीवर परतलो.

पडवीत एक दोन कुत्री आराम करत होती. पावसात त्यांनी पडवीचा सहारा घेतला होता. खोलीत जाऊन पहिली तीन दगडाची चूल पेटवून चहा चढवला. कुंभाराने लिंपलेली चूल अजून सुकली नव्हती. मी हात शेकत बसलो. पातेल्यात चहापावडर, दूध, साखर, पाणी एकदमच टाकलं उकळल्या बरोबर गरम गरम चहा प्यायचा मानस होता. कोकणातला झोडपणाऱ्या पावसाचा मार खाऊन थंडावल्यावर कप दोन कप चहा पीत बसणं म्हणजे काय हे खरंच आनुभवावं लागतं. स्वर्गसुख आहे ते.

कपडे बदलले होते. घरचे कपडे चढवून चहा घेतला आणि खाटीवर आडवा झालो.

पाऊस बाहेर कधी मोठा व्हायचा तर कधी हळवा. पण थांबत नव्हता. असाच पडत राहिला तर उद्या सगळे शेतात लावणी करणार.

जेवणाला लागलो. आजपासून आपलं जेवण आपल्याला करावं लागणार हे समजलं होतं.

दाराची कडी वाजली म्हणून उठलो तर समोर धाकू उभा.

"जेवला नायत ना? मग ह्या हाडलंय मी. भाकरी नी कोंबडी. बायलेन केल्लल्यान म्हटला सायबांका देवन येतंय."

माझ्या चुलीचं आजही जेवणाचं उद्घाटन होणार नव्हतं तर.

"जाव मी. जातय. पण ता मंतर शिकवूचा ध्यानात ठेवा हां."

तो मला भाकरी कोंबडीचा प्रसाद चढवून निघून गेला.

मला माझीच लाज वाटली. या निरक्षर, निरागस माणसाची मी फसवणूक करतोय? काय करू? याना सुधारायचं आहे. असले मार्ग नाईलाजाने वापरावे लागणार होते.

झोपताना आज पहिल्यांदा या विचारांनी मी तळमळत होतो. काय करतोय ते बरोबर होतं का. मी फसवतोय या लोकांना खोटं बोलतोय. का?

शाळेत असतानाची आठवण झाली. आमचे संस्कृतचे गुरुजी. गीतेतले काही श्लोक घेऊन अर्थ विस्ताराने सांगायचे. वाल्मिकी रामायणातल्या पण गोष्टी सांगायचे. मुलांना चांगलं वळण लावण्याचा उद्देश असायचा. त्यातलीच गोष्ट आठवली. धर्मराजाने "नरो वा कुंजरो वा"

म्हटल्याचे. त्याचं विवरण करताना म्हणाले होते,"प्रत्येकाच्या आयुष्यात असे प्रसंग येतात की थोडं खोटं बोलण्याने. पुढच्या गोष्टी सहज शक्य होतात. याला व्यवहारी खोटं बोलणं म्हणतात. ज्यातून कोणाचं नुकसान होत नाही. कृष्ण उपदेशात ही व्यावहारिकता दिसते तर रामायणात कुटुंब वत्सलता, माया, कर्तव्य यांचा उपदेश आहे."

मग मी खोटं बोलतोय ते कसं आहे? कुणाचं नुकसान तर करणार नाही? गाव सुधारण्यासाठी यांचे अंधविश्वास घालवावे लागतील. त्याचा मला सुचलेला हा मार्ग बरोबर आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरं मला मिळत गेली. मी कुणाचंही नुकसान करत नव्हतो की वाईट चिंतित नव्हतो. आतून होकार मिळाला आणि मी शांत झालो. गाढ झोपेत गेलो.

सकाळी उठलो तर पाऊस कोसळत होता. सर्व आटोपून गावातील लावणीची लगबग पहायला जायचं ठरवलं.

एवढ्या पावसात पँट भिजणार म्हणून हाफपँट चढवली व छत्री न घेताच निघालो. पावसाचा पुरा अनुभव घ्यायचा होता. रस्ता आधी उतरणीचा होता. मग डोंगराच्या बाजूने पसरलेल्या शेतीपर्यंत चढण होती.

उतरताना वळणं वाचवायसाठी मी धाकूसारखाच मधल्या पायवाटेने जायचा प्रयोग करायला गेलो, तर तोल सावरता येईना. धावतच उतरावं लागत होतं. त्यात माझ्या शहरी चप्पलचा जीव गेला. त्याचं खालचा

तळभाग इतर भागापासून सुटा झाला. मी आता पडून गडगडत जाणार ही भीती मनात आली आणि कसेतरी खाली बसता बसता जवळच्या झुडपाला पकडून सावरलो. खाली रस्ता दिसत होता पण उभं राहून तिथं पोचायचा प्रयोग आता शक्य नव्हता. चप्पल पुढे रस्त्यावर फेकली. बसून घसरत खाली निघालो. छान घसरगुंडीची मजा येत होती. चिखल आणि पाण्याबरोबर घसरत होतो. अगदी शेवटच्या क्षणी समोर एक छोटा दगड जमिनीतून डोकावताना दिसला. त्याला पाय लावून खाली घसरण्याचा वेग कमी करायला गेलो तर तो जांभ्या दगड जमिनीतून निखळून माझ्या बरोबरच खालच्या रस्त्यावर आदळला. माझे कुल्ले एवढ्या जोरात आपटले होते की दोन मिनिटं रस्त्यात बसून राहीलो.

सगळं गाव लावणीत दंग होतं. माझी फजिती पहाणारं कोणीच नव्हतं म्हणून बरं वाटलं. उठलो तर चालताना दुखावा जाणवत होता. तरीही तसाच चालू लागलो. चिखलाने माखलेला अवतार झाला होता.

पाऊस उभा आडवा कोसळत होता. रस्ता सुरू झाला तरी उतरण एवढी होती की चालण्याऐवजी धावावं लागत होतं. शेवटी उतरण संपली चढ सुरू झाला आणि गुढग्यात येणारे वेग हळू हळू थांबले. थोडा वर पोचताच शेतं दिसू लागली. सगळीकडे भातशेती दिसत होती.

खूप बायका शेतात तरवा काढताना दिसत होत्या. ओणवं राहून भरभर हात चालवत होत्या. हातात मूठभर तरवा झाला की त्याचीच काही पाती वाळून पेंडी बनवून मागे फेकत होत्या. पाठीवरचं इरलं सावरत त्यांचं एका

लयीत काम चालू होतं. पहायला मजा येत होती. पुढे असलेल्या मळ्यात एक गडी जोत चालवून चिखल करत होता. दोन बाया उपटलेल्या तरव्याच्या पेंड्या चिखल केलेल्या आधीच्या मळ्यात टाकत होत्या. काही बाया पेंड्या सोडून, तरवा रोवून लावणी करत होत्या.

एक सैनिकी शिस्तीत सर्व चाललं होतं. मी रस्ता सोडून शेतात आलो. मळ्याच्या बांधावरून कसरत करत त्यांच्यापर्यंत पोचलो.

"गे बाय! सरकारी सायब इलेत. हय काय काम काडलानी?"

"जोत धरतले काय?" त्या बाया माझ्यावर शेरे मारत हसत होत्या.

पाहूया का जोत धरून विचार आला आणि चिखलातून चालत मी जोत धरलेल्या गड्याकडे पोचलो.

"मी धरू?"

"धरा बापडे! पण बैलांका आवरूक येयत? बघा! बघा! धरा."

मी सोगा पकडला आणि आवाज केला "है चक् चक्. एका बैलाने मागे वळून बघितलं. मानेला एक हिसडा दिला आणि चाकोरी सोडून दुसरीकडेच भरभर चालू लागला. दुसरा बैल त्याला साथ देत होता. त्यांना चाकोरीत कसं आणायचं ते माहीत नव्हतं. जोतवाला बाप्या धावत आला. बैलांची नांवं घेऊन काहीतरी आवाज केला आणि बैल परत चाकोरीत आले.

माझी मजा बघण्यात सगळ्यांचे हात थांबले होते. सगळेच जोरजोरात हसत होते. मी पण त्यांच्यात सामील झालो.

"वो सायबानुं ह्या काम तुमचा नाय. तुमका जोत धरूक येवचा नाय नी आमका लिवाक येवचा नाय. खरा की नाय गो गंगू!"

एक बाई मोठ्या आवाजात हसत दुसरीला विचारत होती. एक समजलं या कोकणातील बायका कोणाची भीड ठेवत नाहीत. मनात येतं ते बोलून मोकळ्या होतात. चिखलाने बरबटलेल्या पायांनी मी शेतातून निघायचा प्रयत्न करत होतो. चिखल पाय पकडून ठेवत होता. कष्टाने पाय बाहेर खेचावे लागत होते. चिखल थोडा पातळ असे तिथे पटकन पाय आत जाई. जाड असे तिथे चांगला आधार मिळे पण यामुळे तोल सावरत चालणं कठीण होत होतं. पडलो असतो तर बाया तयार होत्याच माझी उडवायला.

सावधपणे बांधावर आलो. गुडघ्यापर्यंत पाय चिखलाने माखले होते. पण त्या मातीचा तो स्पर्श सुखवीत होता. लहानपणी मातीत खेळलो होतो पण ते सुक्या धुरळ्यात. चिखलात खेळायला मिळालं नव्हतं, पावसात भिजायला मिळालं नव्हतं. दुपार पडली. कामं थांबवून सगळे जेवायला बसणार म्हणून मी निघालो. जोत धरणाऱ्या गड्याने हाकारलं, "वो सायब! खंय चललास? आमच्या वांगडा (बरोबर) भाकरी खावक बसा."

"मी घरी जाऊन खाईन. तुम्ही मेहनत करतायत. पोटभर जेवा."

"गाव आसा, पावणे आसास तुमी, बसा जेवक. पावण्यांका जेवाण नाय घातलंव तर नरकात जाव तेचा काय?"

बापरे अगदी टोकाची विचार सरणी. या लोकांचं प्रेम करण्याची तऱ्हा देखील जबरी होती. गपचूप बसलो. अर्धी भाकरी खाऊन उठू लागलो तर परत तो बोलू लागला.

"अर्धीच भाकरी? काय लाजतास काय वो? कमी पडल्यो तर बायल थापटात दोन भाकऱ्यो. खाल्ला नाय तर घोपान(ताकद) कसा येयत! दी गो तेंका भाकरी." मला बोलून नंतर बायकोला त्याने भाकरी देण्याचा इशारा केला. मग मात्र मी उठलो म्हणालो, "खरंच माझं पोट भरलंय. तुमच्या भाकऱ्या केवढ्या मोठ्या आहेत. आणि तुमचा पाहुणचार तर....."

वळलो आणि निघालो देखील.

मागून हलकाच हसण्याचा कोरस ऐकू आला. कोणीतरी बाई म्हणाली, "गप रवा गो रांडग्यानु. पावण्याक दुखवाचो नसता म्हायत नाय. खिदाळतास कसली?."

पण खरं सांगू दुखवण्याचं सोडा, त्या हिरण्याच्या लोकांची प्रतिमा काळजात ठासून भरली होती. स्वतःची पोटं खपाटीला गेलेली तरी स्वतःच घास सहज दुसऱ्याच्या पानात ते घालत होते.

विचारात परत आलो. जातानाचा अवखळपणा केव्हाच गायब झाला होता.

घरीच बनवलेल्या, जराही पॉलीश न केलेल्या तांदळाची ती भाकरी आता पोटात रंग दाखवत होती. या तांदळाला ते करड म्हणतात. त्या

करडीच्या भाकरी पचवायला तशीच मेहनत करावी लागते. भाकरी आता पोटात जड झाली होती.

बाहेर पडवीत येरझाऱ्या घालू लागलो. पाऊस थोडा थांबला होता. हवेत गारठा होता. आणि मी येरझाऱ्या घालता घालता पुढच्या कामांवर विचार करत होतो.

पहिलं काम रस्ता मोठा करायचं सरकारला सांगणं. दुसरं गावातील तरूणांना एकत्र करून शिकण्यासाठी प्रेरीत करणं. ग्रामसेवकाची इतर कामं करता करता हे समाज कार्य करणं जरूरी होतं.

रस्ता झाला असता तर तालुक्याला जिल्ह्याला जाणं सोपं झालं असतं. गावात बसही चालू करता आली असती. बाहेरच्या जगाशी संपर्क आला असता तर हे लोक सुधारले असते.

फार मोठा अडथळा होता तो पिंपळाचा, हो मुंजाच्या पिंपळाचा. तो रस्त्याला अडथळा करत होता. घाटातून आलेल्या कच्च्या रस्त्याला त्याच्या दोन्ही बाजूनी रस्ता बनवायला पुरेशी जागा मिळत नव्हती. पिंपळाला बांधलेला पार एवढा मोठा होता की त्याच्या एका बाजूने फिरून सर्व जण ये जा करीत. तो पार जर त्या बाजूने पाच सहा फूट कापला असता तर सहज रस्ता बनवता आला असता. पण तो मुंजाच्या पिंपळाचा पार होता. त्याला हात लावणं शक्य नव्हतं. एकाही बाजूने जमीन मिळत नव्हती. दोन्ही बाजूनी खोल खड्डे होते. मनात एक निश्चय केला.

विचारात केव्हा वेळ गेला समजलं नाही. संध्याकाळ होत आली होती. पाऊस चालू होता. हवेतला थंडावा कुडकुडी आणत होता.

एवढ्यात बाहेर कुणी तरी आलं. मला वाटलं गावडे असतील. मोजके आठ आणे शोधून खिशात ठेवले आणि बाहेर आलो. धाकू आला होता.

"धाकू तू! मला वाटलं गावडे आलेत."

"नाय वो! मियां ईलंय. लवकर लावणी सोपली. आज वरच्या जमनीतली होती. जमीन थोडी. लवकर संपला. वाटेत मसणवट (स्मशान) येता. मगे मसणात जावन ही राख घेवन ईलंय. कोणाची हा ता म्हायत नाय. बुवाची की बायची."

"अरे ती आड्याला बांधून ठेव घरात नको. थांब रुमाल देतो." मलाच माझं हसू आलं. याचा विश्वास मिळवायसाठी मी काय काय नाटकं करत होतो.

"आता केवा जावया?"

"अरे! अमावास्येला जायचं ना? आणि पाऊस असेल तर पुढच्या अमावास्येला. पण माझं एक काम करशील?

गावातली चार पाच तरूण मुलं संध्याकाळी इथे येतील तर बघ. मला त्यांच्याशी बोलायचंय. गाव सुधारायचा असेल तर तेच कामाला येणार ना?"

"एवडाच! उद्या हाडतय खळवटून."

"अरे असं नाय. मला प्रत्येक वाडीतून एक दोन एक दोन पाहिजेत. म्हणजे पुरं गाव सुधारायला बरं. जास्त आले तरी हरकत नाही."

"गावभर भटकाचा लागात. म्हंजे लावणी आटापल्यारच होयत. काम टाकून गाव उंडराक कसो जाव. मालक शाप वाट लावतीत."

"बरं, तुला जमेल तसं कर....धाकू पाऊस आहे ना! थोडी कांदा भजी बनवतोय आणि चहा. घेशील ना माझ्या बरोबर थोडं? अरे एकट्याला असं खायला बरं नाही वाटत."

"खायन! खायन! पण मी काय सांगतंय, अशे कित्या रवतास? लगीन करून टाका. बायल ईली काय सगळा रांदून घालीत तुमका."

मी गप्प बसलो. हिरण्यात सगळे माझ्या लग्नाचं बोलायचे. काय सांगणार त्यांना. या गावात येऊन रहायला कोणी शिकलेली येणं शक्यच नव्हतं. मी एम्.कॉम्. झालो तरी नोकरी नव्हती मिळत. खूप प्रयत्न केला होता. कोट्या मधे चांगल्या नोकऱ्या होत्या पण वशिला नव्हता की नोकरी खरीदायला पैसेही नव्हते. दोन वर्षांनी ही नोकरी कोट्यातून मिळाली. ग्रामसेवक. म्हटलं जगायसाठी इथून सुरवात तर करू. आणि हिरण्याला

आलो. इथली गरीबी बघून वाटलं बरंच काही करू शकतो. ग्रामसेवकांच्या सरकारी हद्दी बाहेरचं. एक आव्हान आहे. घेऊया.

याच विचारात भजी आणि चहा झाला आणि आम्ही खायला सुरू केलं.

"वो! चांगला रांदूक येता तुमका. भजी कुरकुरीत झाली हत."

"आवडली तुला?"

"मगे! माज्या बायलेकय येयत नाय वो अशी कुरकुरीत करूक. ती करूक गेली काय जाळान ठेवता."

अशा हळव्या गप्पा करता करता मी धाकूला म्हटलं, "धाकू, तू मला आठ दहा मुलं मिळवून दिलीस तर आपलं मुंजाचं काम लवकर होईल."

"वो! काय तेंका पोरांका सांगू नको हां. मालक माका कामारसून काडून टाकतीत."

"अरे बाबा नाही रे त्यांना सांगणार पण जर कोणाला चुकून माहीत पडलं आणि कोण भांडायला आले तर आपल्या बाजूचे लोक तयार नकोत?"

"असा म्हणतास मग काय हरकत नाय. करतय गोळा."

तो गेला आणि माझ्या मनातली योजना मी परत परत मनात घोळवू लागलो.

चार पाच दिवसानी एका संध्याकाळी दहा बारा वर्षाच्या वयाची सहा मुलं आली. त्यांची चांगली विचारपूस केली. चहा बिस्कीटं दिली आणि गप्पा मारू लागलो. ते बोलायला बुजत होते. पण मी खूप गोष्टी सांगत गेलो. माणूस कसा पुढे जातो. शहरात लोक कसे राहातात वगैरे. त्यांचं मन हळू हळू तयार करत होतं. ते पण त्यांच्या नकळत करायचं होतं. हे काम अवघड होतं पण मला खात्री होती.

थोड्याच दिवसात जवळ जवळ वीस एक मुलं माझ्याकडे येऊ लागली. त्यांना गोष्टी सांगताना शिकण्याचे फायदे हळू हळू मनात ठसवत होतो. शहरां बद्दल माहिती देत होतो. मधेच श्रावणबाळ, राम, महाभारत सांगत असे. थोड्याच दिवसात ही बातमी गावात पसरू लागली. मोठे लोक आणि म्हाताऱ्या बायकाही येऊ लागल्या.

मी पुराण्यातल्या गोष्टी सोडून दुसऱ्या गोष्टी सांगू लागलो, की कुठली तरी म्हातारी बोले, "वो ता रामाचा किर्तान सांगा ना. तेवडाच देवाचा नाव कानार पडता."

मग माझी सर्कस सुरू झाली. दररोज एक पुराणातली कथा वाचून मी तयारी करू लागलो.

मुलांना मी लवकर बोलवी. त्यांनाही, न पाहीलेल्या विश्वाचं आकर्षण वाटू लागलं होतं.

आता अमावास्या दोन दिवसावर होती. धाकूला संध्याकाळी थांबवला. "धाकू! परवा अमावास्या. आपण जायचंय"

"काय म्हणतास काय? मग जायचा ना?"

"हो तर! कामं लवकर आटपायला पाहिजेत. तू मोकळा आहेस ना?"

"कायव असां दे. सगळा बाजूक ठेवन येतय मिया"

"बायकोला काय सांगीतले नाहीस ना?"

"येडो नाय मी वो. माजी बायल वाजती घाट हा. फाटक्या तोंडाची. जरापण बोलूक नाय."

"मग रात्री आपल्याला फार वेळ लागेल पिंपळा खाली. काय सांगशील घरी?"

"होय वो होय! ह्या ध्यानात नाय ईला. काय सांगू?"

"सांग माझ्याकडे काम आहे. रात्री खूप वेळ लागेल. कदाचित माझ्याकडे झोपावं लागेल. मग सकाळीच येशील असं सांग."

मी त्याला चांगला पढवला. तो घरी गेला आणि मी जेवणाला लागलो.

आज मुलं आल्या बरोबर मी त्यांना सांगायला सुरवात केली.

"मी कितीतरी गोष्टी तुम्हाला सांगीतल्या. देवांच्या इच्छे प्रमाणे हे जग चालतं. जो ज्ञान मिळवून शहाणा होतो, त्याला खूप काही मिळवता येतं. मुंजा, भुतं मी कधी पाहीली नाहीत की अनुभवली नाहीत. असली तरी ते

आपलं काहीच करू शकत नाहीत. कारण जे काही आपल्याला मिळतं ते, आपण जे करतो त्याचं फळ असतं. वाईट केलंत तर दुःख येतं, चांगलं केलंत तर आनंद मिळतो. म्हणून देवाला घाबरायचं आणि चांगलं वागायचं. भुतांना घाबरायची जरूरी नाही."

फार कठीण पडत होतं मला हे सर्व बोलताना. लहानपणापासूनचा या गोष्टींचा त्यांच्या मनावरचा तो संस्कार मला पुसून टाकायचा होता.

"सायब! म्हंजे मुंज्याक पण भियाचा नाय?."

"कशाला घाबरायचं? कोणी पाहिलात काय रे त्याला?"

"नाय बा! पण सगळे मोठे सांगतत ता काय खोटा?"

"असं करा! घरी विचारा कोणी त्याला पाहीलाय का? पाहीलाच नसेल कोणीही. कारण तो असेल असं मला वाटत नाही."

"इचारलंव तर कुटात बापूस आमका. नी काय झाला तर पिपळाखाली कोंबो मारून तेका थंड करूचो लागता."

"अरे मी आल्यापासून एकटा रहातो. गावडेनी सांगीतलं तरी मी विश्वास नाही ठेवला. मला काय केलं मुंजाने?"

"तुमका शिद्दी हा म्हणतत सगळे. गावड्यानीच सांगीतला."

"अरे या भाकड कथांवर विश्वास ठेवायचा नाही हीच सिद्धी. तो आहे हेच मनातून काढून टाका. आणि बघा तो काय करतो का? मी एवढं

बोलतोय. तो माझ्यावर रागवला पाहिजे. मला त्रास दिला पाहिजे. बरोबर ना? पण मला तो काहीच करत नाही."

"तुमी जरा पण भियत नाय?"

"मी फक्त देवाला भीतो. भुतं, देवचार, हडळ, मुंजा यांच्यावर माझा विश्वास नाही. मी काय केलं तर तुमचा विश्वास बसेल? उद्या अमावास्या आहे. सगळे माझ्या घरी झोपायला या. मी रात्रभर पिंपळाखाली बसून येतो मग तर झालं? पण ही गोष्ट कुणालाच सांगायची नाही. मी पिंपळा खालीच होतो हे सांगणारा माणूस पण असेल साक्षीदार म्हणून. चालेल?"

"मरशात वो! काय तरी करू नुको. मुंजो हा तो."

"आणि मला काय झालं नाही तर? मानाल सगळे? ठेवाल माझ्यावर विश्वास? ज्यांना यायला मिळेल त्यांनी उद्या जरूर माझ्या घरी या. उद्या अमावास्या आहे मी पिंपळा खाली घालवणार आहे. बघू तुम्ही खरे की मी."

त्या मुलांना आता सुरसुरी आली. काहीतरी नक्की घडणार आहे याची खात्री झाली. माझ्या संध्याकाळच्या "किर्तनाने" गावच्या लोकांचा विश्वास बसला होता. मुलांना त्यांनी माझ्याकडे सहज पाठवले असते. दुसऱ्या दिवशी सकाळी धाकूला गाठून सांगीतले. गावाच्या बाहेरच भेट. घरी येऊ नको. घरी मुलं येतील त्यांना पाठवून मी येतोच.

दिवस मस्त मजेत गेला. संध्याकाळी नेहमी प्रमाणे सगळे आले. त्यांच्याशी खूप गप्पा करताना मधेच म्हणालो, "भीती हा माणसाचा शत्रू आहे. या गावात सगळ्यांना एका गोष्टीची भीती वाटते.'मुंजाची' पण त्याला कोणी पाहीलाच नाही. मी पाहील्या शिवाय, अनुभवल्या शिवाय विश्वास ठेवत नाही. आपलं बरं वाईट करणं फक्त त्या परमेश्वराच्या हाती आहे आणि आपल्या वर्तणुकीवर आहे. चांगलं वागणाऱ्याचं नेहमी चांगलं होतं. वाईट वागणाऱ्याला भोगावं लागतं. गावात सुधारणा झाली मुलांना शिकवलंत तर तुम्हालाही समजेल."

"खंय शिकवतलास वो? साळा नाय काय नाय. जवळची साळा हरकुळात आठ मैलार. पोरा जातली कशी?"

"रस्ता करायला सांगतो मी सरकारला. तुमची साथ पाहिजे. एकदा बस सुरू झाली की मुलं जातील शिकायला. बस भाडंही माफ करायला लावतो सरकारला. तुम्ही साथ द्या."

माझं काम ग्रामसेवक म्हणून हे नव्हतंच. पण हे केल्या शिवाय मला ग्रामसेवकाचं कामही करणं शक्य नव्हतं. लोकांची साथ मिळाली असती तर ते शक्य करता आलं असतं. माझ्या या उद्योगामुळे गावडे मात्र येत नव्हते. सगळं गाव त्यांचं ऐकायचे. आता लोक माझ्याकडे येतात म्हणून रागावले की काय अशी शंका आली. ठरवलं त्यांना यात सहभागी करायचं मोठेपणा द्यायचा. पुढच्या गोष्टींना मग जरा विरोध झाला तरी त्याची धार बोथट झाली असती.

मन शांत झालं सर्व गेले होते. दोन घास खाऊन घेतले. थोडा आराम केला. दहा वाजत आले आणि दोर, एक पिशवी व टॉर्च घेऊन निघालो. गावाच्या बाहेर पिंपळाच्या अगोदर धाकू उभा होता. कांबळं घेऊन आला होता. न बोलता आम्ही पिंपळाकडे पोचलो.

"धाकू! पिंपळा भोवती फिरून बघ कोणी दिसतंय का. हा घे टॉर्च." तो लावायचा कसा, बंद कसा करायचा शिकवलं पण तो एकटा जायला घाबरू लागला.

"अरे मी आहे ना इथे. तुला फक्त पिंपळाला एक फेरी मारून पहायचं आहे. जा मार. घाबरू नको."

"जाव काय होवचा नाय मां? तो नाय येवचो ना?"

तो मुंजा म्हणायला पण घाबरत होता. मी दम मारत बोललो.

"अरे कोण येणार नाही म्हटलं ना! घाबरलास तर कसं होईल. तुला त्याला बांधायचं कसं शिकायचंय ना? मग घाबरू नको. पहिल्यांदा मी येतो. पण दुसरी फेरी तुला एकट्याला मारावी लागेल. सिद्धी मिळवायला ही प्रदक्षिणा जरूरी आहे."

आम्ही पहिली फेरी दोघांनी मारली. दुसरी त्याने एकट्याने मारताना जवळ जवळ धावतच मारली.

"काय झालं का? नाही ना? मग आता दुसरी न धावता मार. धावलास तर परत परत मारायला लावीन."

मला त्याची भीती पुरी काढून टाकायची होती. जवळ जवळ पुढच्या अर्ध्या तासात त्याला पंधरा एक प्रदक्षिणा करायला लावल्या. मग म्हटलं समोर बस. मी आता सांगतो ते म्हणायला सुरवात करायची. पुरा श्वास घ्यायचा आणि संपेपर्यंत म्हणायचं. श्वास संपला की परत घ्यायचा परत म्हणायला सुरवात करायची. मी म्हणून दाखवतो बघ. मग मी ओंकार म्हणायला सुरवात केली.

"आमच्या गावचे भट म्हणतत वो ह्या."

"एवढाच नाही पुढे पण आहे. लक्ष देऊन ऐक आणि माझ्या मागून म्हण. पुरी रात्र जाईल असे बोलत बसलो तर."

गोळी बरोबर लागू पडली. पन्नास एक वेळ ओंकार झाल्यावर त्याला जमायला लागला. पुढचा भाग शिकवला.

"नमः शीव शंकराय." म्हण पूर्ण "ओं नमः शीवशंकराय."

रात्र बरीच झाली असावी. मधेच वारा सुटला पिंपळाच्या पानांची सळसळ व्हायला लागली. धाकू चुळबुळू लागला.

"थांबवू नको म्हणत रहा. आता बहुतेक मुंजा घाबरलाय. कापतोय. म्हणत रहा. आता तो तुझ्या वाटेला जाणार नाही. म्हण म्हण."

खरं तर मला हसू येत होते पण ते दाबून मी त्याला सक्ती करत होतो. "उठ हा दोर घे. त्याच्या एका बाजूला मी दगड बांधलाय. दुसरं टोक पकड आणि दोरा पिंपळाच्या फांदीवर फेक. वर जाऊन अडकला पाहिजे."

"एवडाच ना. ह्या तर आमका येता." तो दोर वरच्या फांदीत अडकून गुंडाळला गेला. दुसरं टोक जमीनीत उगवलेल्या झुडपाला बांधलं. माझं नाटक इथे संपवलं.

लांब गावात कोंबड्याची बांग ऐकेपर्यंत हे चाललं होतं.

"तो बघ कोंबडा आरवला. अमावास्या संपली. चल, आता काही बोलायचं नाही कुणाला. दररोज हा मंत्र पाठ कर. चार दिवस रात्री माझ्याकडे येऊन म्हणून दाखव म्हणजे चूक करणार नाहीस."

धाकू जबरदस्त आनंदला होता.

"मुंजो खराच भियालो मी मंतर म्हटल्यावर? पिपळ पण थरथरलो? इश्वासच नाय लागत माका."

"अरे नुसता घाबरला नाही तर तू त्याला बांधला तो काय. त्या दोराने तो बांधलायस तू. आता तो तुझ्या वाटेला कधीच जाणार नाही."

माझ्या योजनेतला एक अध्याय पुरा होत होता. घरी पोचेपर्यंत पुर्वेला चांगलंच तांबडं फुटलं होतं. रात्री पावसात भिजत धाकूला दिलेली दिक्षा आठवून माझं मलाच हसू येत होतं. गावात आलो तसा धाकू म्हणाला, "मी जाव घराक. भाकरी तुकडो खावन शेतात जावचा हा."

"जा पण लक्षात ठेव कोणाला काही सांगायचं नाही. वेळ मिळेल तेंव्हा मंत्र पुटपुटायचा. कोणी ऐकणारं नसेल तर मोठ्याने म्हणायचा. संध्याकाळी ये."

"येतय. येतय." एवढं बोलून तो निघून गेला. मी आता माझ्या खोलीकडे जाणारा चढ चढू लागलो. गावं अजून किती मागासलेली आहेत, अशिक्षितांचा भरणा आहे. स्वातंत्र्य मिळून चौदा वर्ष होत आली तरी ही परिस्थिती का?.

एवढ्यात जाणीव झाली. हिरण्याला आल्यापासून आपला अभ्यास चालू केला नाही. असं चालणार नाही. दररोज आपला अभ्यास चालू ठेवायचा.

हो मी यु पी एस् सी ची परीक्षा देण्याचा मानस ठेवला होता. त्याचा अभ्यास करत होतो. हिरण्याची परिस्थिती पाहून तो अजून बळावला. अशी कितीतरी गावं असतील डोंगराच्या पोटात. आपण जर पास झालो तर नक्की अशा गावांसाठी काहीतरी करता येईल.

घरी पोचलो तर मुलं नुकती उठली होती. राखुंडीने दात घासत पडवीत बसली होती. मला पहाताच सगळे गप्प होऊन माझ्याकडे पहात होते. "रातभर पिपळा खाली रवलास? मुंजो दिसलो? की पळवून लावलास तुमच्या शिद्दीन?" एका मागोमाग प्रश्न माझ्यावर आदळू लागले.

"सांगतो सगळं सांगतो. आधी ती राखोंडीची तोंडं साफ करून या." सर्व पळाले. मी चूल पेटवून चहा ठेवला. तो होईपर्यंत शेक घेत बसलो. चहा सर्वांना देताना परत कोणी तरी उतावळा होऊन विचारू लागला, "खराच रातभर पिपळाखाली रवलास? भीती नाय वाटूक? मुंजो नाय येवक?"

ही बघा पिंपळाची पानं आणलीत मी. ही सुकी पानं पावसाने ओली झालेली आणि ही ताजी पानं रात्री तोडलेली. पिंपळाच्या झाडाला एक दोर पण बांधून आलोय रात्री. आता जाताना खात्री करून घ्या. आता पिंपळाकडे जा. दोर पहा. संध्याकाळी आलात की पूर्ण गोष्ट सांगेन रात्रीची."

त्यांची उत्कंठा मी मुद्दाम वाढवित होतो. त्यांच्या प्रश्नांची उत्तरं उत्कंठा शिगेला पोचल्यावर दिली असती की मनावर कोरली जाणार होती. ते चहा पिऊन निघाले ते गावा बाहेर जाणाऱ्या रस्त्याला लागलेले पाहून मजा वाटली. ते पिंपळाकडे जाणार हे नक्की झालं. मी एक निश्वास सोडून आत आलो खाटीवर आडवा झालो. किती वेळ झोपलो ते समजले नाही.

"सायबानु आसास काय वो?" हा भिवा होता. गावचा मानकरी.

"काय भिवा एकदम कसा आलास?"

"वो काल राती पिपळा खाली दिवो लागा होतो. फिरा होतो पिपळा भोवती. आमची घरा येशीवर ना. सगळा दिसता पिपळा कडचा. म्हटलंय गावडेंका सांगुचा. मगे तुमकाय सांगूक ईलंय. म्हटला गावातलो कोणपण पिपळाबुडी जावचो नाय. गेलास तर तुमीच. तुमी गेल्ललास?"

आली का पंचाईत. जे एवढ्यात समजायला नको तेच यांना समजलं होतं. आता गावभर बोंब उठणार. मुंजा रात्री फेऱ्या मारतो. आता परत माझी परीक्षा होणार. डोक्यात प्रकाश पडला.

"भिवा तो मामलतदार कचेरीतून माणूस रात्री माझ्याकडे आला होता. कागदपत्र द्यायला. रात्री गाडी लेट झाली मग तो पिंपळाकडून चालतच येणार ना? त्याच्या बॅटरीचा प्रकाश बघीतला असशील तू."

"पावणे ईलेत? दिसत नाय ते" कोकण्यांची पुरी खात्री झाल्याशिवाय प्रश्न थांबत नाहीत.

"भिवा सरकारी माणूस ते. सकाळी उठून बस पकडायला निघून गेले. माझे पाव्हणे नव्हते ते."

"असा? बरा तर मी सांगतय गावड्यांका तसा. पिपळार नजर ठेवचा काम माजा. काय झाला तर ठपको माका. म्हणून म्हणतंय. बरा झाला सगळा म्हायत पडला ता. पण पावणो दोर कशाक बांदीत पिपळाक?"

उठता उठता भिवाने मला सणसणीत टोला हाणला. गावचे लोक गावंढळ म्हणून मानण्यात सगळे चूक कसे करतात ते चांगलंच समजलं.

भिवा गेला पण मी विचारात पडलो. आता? पाहू वेळ आली की ठरवू.

संध्याकाळी मुलं आली. मागोमाग गावडे आले. आता मात्र कठीण परिस्थिती झाली होती. पटकन तोंडातून निघून गेलं. अरे मुलांनो आज मला जागरण झालंय आणि गावडे पण आलेत. आज तुम्ही घरी जा. उद्या या. बिचारे हिरमुसले होऊन गेले.

"बोला? गावडे! काय म्हणताय?"

"काय म्हणतंय! गावाचा आता काय खरा नाय. काल कोणीतरी मुंजाक बांदुक बगीतल्यान. धोंडो बांदून दोर लटकताहा पिपळार. कोणाक अवदसा आटावली समजत नाय. तुमी एकलेच गावात आसास जे मुंजाक मानीत नाय. शिद्दी हा तुमका. तुमी तर नाय ह्या काम केलास?"

"गावडे मी मुंजाला मानत नाही तर कशाला पकडायचा प्रयत्न करेन? हे समज सोडा. देवावर विश्वास ठेवा. गावाचं बरं वाईट तोच ठरवतो. मुंजा नाही."

"वो! तुमी काल ईलात गावात. आमका म्हायत की तुमका? तुमचा शिक्षाण हय कामाचा नाय. बरा रवांदे ता. रुपयो देवा वायच आज जरा जास्तच घेवची लागतली."

एवढ्यात तो माणूसही पोचला. आज त्याने दोन चपट्या बाटल्या आणल्या होत्या. म्हणजे गावडे पुऱ्या तयारीनिशी आले होते. आज हे जास्त पिणार. मग बोलताना तोल जाणार नाही ना? असा विचार येऊन मी धास्तावलो.

पुढचा अर्धा तास गावडे पीत होते. पहिल्या बाटली नंतर ते बरळायला लागले. कोणाला तरी नाही नाही त्या शिव्या देत होते. "तुजा तळपट तो मुंजो करीत" चा घोष लावला होता. थोड्या वेळाने रडू लागले. म्हणाले, "गावाक सांबाळंय मिया तू गेलंस तर गावची घडी बिगडात रे. तू जाव नुको. जो तुका त्रास देता तोच जायत."

माझ्या लक्षात येत होतं हे सगळं ते मुंजाला म्हणतायत. आतापर्यंत मुंजाची भीती बाळगणारे आज त्याला शरण का जातायत हे समजत नव्हतं. पण त्यांची स्थिती पाहून मी बोलण्याची हिंमत करत नव्हतो. कोणताही वाद सुरू करायचा नव्हता.

थोड्या वेळाने धाकू आला त्याला हळूच म्हणालो, "यांना घरी पोचवून ये. आज फार प्यालेत ते."

धाकू त्यांना घेऊन गेला आणि माझी सुटका झाली. एक सुस्कारा टाकून मी खुर्चीत अक्षरशः कोसळलो.

दुसरा दिवस उजाडला तोच मुळी ढगाळून. थोड्याच वेळात संततधार पाऊस सुरू झाला. लावणी संपली होती. गाव सुस्तावलं होतं आज कुठेही जावं असं मला वाटत नव्हत. बॅगेतून पुस्तकं काढली ठरवलं आजपासून अभ्यास सुरू. गावच्या या गोष्टीत जास्त लक्ष घालायचं नाही.

पुस्तकात लक्ष लागत नव्हतं. एवढ्यात धाकू आला. म्हणाला, "सायबानु आज काम नाय. मालक गावचो सरकारी माल हाडूक तालुक्यात गेलेत.

“सरकारी माल? म्हणजे?”

“पयल्यांदा कागद समजून घेतले. मगे सगळो सरकारी माल हाडतले. गावाक वाटूक."

"म्हणजे मी नाय समजलो."

"तुमी सरकारी सायब ना! तुमका नाय म्हायत. सरकार गरीबांका तांदूळ, घहू नी डाळ देता. तीन म्हयन्यान एकदा आणूक जातत. तीन म्हयन्याचा एकदम घेतत. गावाक डाळ सोडून काय लागत नाय वो. जा लागता ता हयच पिकवतंव. सरकार देता ता थंयच दुकानदारांका ईकतत नी रुपाये घेवन येतत. मग कोणाक लागले तर देतत."

"म्हणजे हे असं होतं तर?"

मी ठरवलं चार दिवसानी तालुक्याला जायचं काय माहिती मिळते काय पहायचं. गावचं भलं पहायसाठी तर मला नेमलाय.

चार दिवसानी जी माहिती मिळाली ती खरोखर भयानक होती. गावची आलेली मदत तहसीलदार व आजूबाजूच्या पंचायतीचे सरपंच मिळून विकून टाकीत व प्रत्येक जण आपला भाग खिशात घाली.

या सर्व गोष्टी व्यवस्थित लिहून मी कलेक्टरला पत्र लिहायचं ठरवलं.

मग तहसिलदारला येण्याचं कारण सांगताना म्हणालो गावचा रस्ता बनवावा लागेल जास्त नाही पाच सहा किलोमिटर आहे.

"माणूस पाठवू तो प्रपोजल करेल मग ठरवू" असं उडत उत्तर मिळालं.

मग गावात रेशन येत नाही. ते कसं चालू करता येईल हे विचारल्यावर तो उखडला. त्याच्या वर्मावर बोट मी ठेवलं होतं. नंतरची जुगलबंदी सरकारी नव्हती.

"काय हो गावात नेमणूक कधी झाली? दोन महिने पण नाही. आणि काय शिकवताय आम्हाला?"

"अहो मी कुठे काय बोललो? सरकार रेशन गरीबांना देतं ते गावात सुरू करावं हेच बोललो मी. हिरण्यात रेशन येत नाही कारण ते न्यायला रस्ता नाही. म्हणून रस्त्याचं आधी विचारलं मग रेशनचं. ग्रामसेवकाचं कामच आहे ते. सरकारी योजना लोकांपर्यंत पोचतात की नाही हे पहायचं."

"अहो नाव काय म्हणालात तुमचं?"

"मी हिरणं गावात ग्रामसेवक आहे."

"नाव नाही सांगत? अरे शाम हिरण्याच्या ग्रामसेवकाचं नाव बघ रे जरा पगार पत्रकावर"

"पण या सगळ्याचा माझ्या नावाशी काय संबंध?"

"अहो तुम्ही कोणाशी बोलताय? तुमचं रेकॉर्ड मलाच बनवायचं आहे लक्षात ठेवा."

"सायब यांचं नाव सातू लक्ष्मण धनगर. जात धनगर चांभार."

"ऐकलत धनगर. चांभार तेही धनगरातले. आणि तुम्ही आम्हाला सांगणार काय करायचं ते. जाऊन विचारा तुमच्या सरपंचांना रेशन मिळतं की नाही ते."

हा प्रकार नवा होता. माझ्या जातीवरून पदोपदी झालेला अपमान मला जरा देखील टोचला नाही. तो तर नेहमीचाच होता. पण माझ्या गावच्या गरीबांचा हक्क लुटणाऱ्यांचा मला तिरस्कार वाटला. उठलो तडक निघालो. दोन महिन्यांचा पगार आजच आधी घेतला होता. जिल्ह्याला जायची बस पकडली. रत्नागिरी जवळ जवळ चार तासानी आली. साडेचार होत आले होते. कलेक्टर भेटणार की नाही असं वाटत होतं. ऑफीस मधे पोचलो कलेक्टरच्या चिटणीसांना सर्व हकीगत सांगीतली व म्हणालो आत्ता भेट होईल असं करा. आणि मला एक कागद व पेन द्या मी तक्रार लिहून देतो. कागदावर इंग्रजीत सर्व व्यवस्थित लिहून चिटणीसांकडे देताच ते थक्क झाले. ताबडतोप कलेक्टरची भेट झाली. कलेक्टर म्हणाले, "हे सांगीतलं ते बरं केलंत पण हा मार्ग अवलंबू नका. ही सिस्टम अशी आहे की तुमची नोकरी जाईल. मला आता काय करायचं ते माहीत आहे. हा अर्ज मी रेकॉर्डवर घेत नाही. पण आठ दहा दिवसात पहा काय होतं ते."

"बरंय साहेब येतो." म्हणत मी उठणार तोच म्हणाले, "पण काय हो तुम्ही एवढं छान इंग्रजी लिहिता काय शिकलाय?"

"एम् कॉम झालोय."

"काय? आणि ग्राम सेवकांची नोकरी? ध्येयवादी आहात की काय तुम्ही?"

"कुठलीच नोकरी मिळेना, ही मिळाली. जगायसाठी कमवणं जरुरी होतं. घेतली ही नोकरी."

"नाही करू शकणार ही नोकरी तुम्ही. कधी गरज लागली तर या माझ्याकडे. चांगल्या, हुशार माणसांची फार गरज आहे. पाहू."

दुसऱ्या दिवशी हिरण्यात पोचलो तेव्हा मुंजा हिरण्यात कसा वावरतोय आणि तो कोण हे स्पष्ट झालं होतं. आता कामाची दिशा पक्की ठरली होती. गावकऱ्यांना जवळ करून समाज कार्य करायचं. नाही तरी ग्रामसेवकाचं काम कालच निकालात निघालं होतं. आता मुलांना शाळेत जायला मनाने तयार करायचं. एकदा ते शिकून तयार झाले की तेच गाव सुधारतील याची खात्री होती. दोन दिवस मी हिरण्यातून गायब होतो. गावडे वर खाली झाले होते. संध्याकाळी हजर झाले. आज मुलांना मी जायला सांगीतलं नाही. त्यांच्या समोरच मुलांशी बोलू लागलो.

"आता कापणीपर्यंत काम कमी आहे. आपण सगळे मिळून गावात येणारा रस्ता बनवूया का?"

सगळे तयार झाले. आता त्यांचा माझ्यावर जास्त विश्वास बसू लागला होता.

मी गावडेंकडे जराही लक्ष देत नाही पाहून ते चुळबुळत होते. त्यांची बाटली केव्हाच आली होती. पण आज ते पैसे मागणार नाहीत एवढं मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. मुलं गेली.

“काय खंयचो रस्तो करतलास? पिपळ आडवो हा तेचा काय?"

"पाहू!"

"ह्या बघा गावची व्हयवट माझ्याकडे हा. माका बाजूक ठेवन काम कसा काडलात? आता काय तुमी गाव चलवतलास? नी दोन दीस खंय गायब होतास?"

"जिल्ह्याला, रत्नागिरीला गेलो होतो, कलेक्टरकडे. रस्ता पायजे म्हणून सांगायला. तो सगळ्या जिल्ह्याची वहिवट करतो ना? त्याला विचारून करायला घेतोय रस्ता."

कलेक्टरचं नाव येताच गावडे विचारात गेले. मग म्हणाले,"रस्तो गावान खंय मागल्यान? तुमच्या सारके भायरचे लोक ठरावतले? गावाक काय होया नुको ता?"

मी गप्प बसलो.

रस्ता करणं वाटलं तेवढं सोपं जाणार नव्हतं हे ध्यानात आलं. तरी देखील तरूणाई माझ्या बाजूने उभी केली होती. म्हणून आशा वाटत होती.

दुसऱ्या दिवशी जवळ जवळ बारा मुलं सगळ्या तयारीनिशी आलेली बघून मला आनंद झाला. एवढी येतील असं स्वप्नात देखील मला वाटलं

नव्हतं. काही तर अगदी आठ नऊ वर्षांची होती. पण त्यांच्या उत्साहावर पाणी नको म्हणून त्यांनाही बरोबर घेतलं.

घाटातल्या रस्त्यापासून सुरवात करून खाली यायचं ठरवलं.फावडी कुदळी मुलांनी चालू केल्या आणि मी पहातच बसलो. मुलं असूनही कामाची सवय आणि समज इतकी छान होती, की पुढच्या तासाभरात दहा बारा फूटांचा छान रेखीव पट्टा जमिनीवर दिसू लागला. मुलं हसत खेळत काम करत होते.

कोकणातली जमीन जांभ्या दगडाने बनलेली. वरची गवत माती दूर झाली आणि खाली टणक जांभ्या लागला. पण त्याला कुठे उंचवटा कुठे खड्डा होता. उंचवटे तासले असते तर. छान टिकाऊ रस्ता झाला असता. त्या दिवशी आम्ही पिंपळापर्यंत पोचलो. गवत माती काढून चौदा पंधरा फूट रुंदीचा लाल पट्टा छान दिसत होता.

तेवढं आटोपून सर्वांना घेऊन घरी आलो. मुलांना चहा आणि तालुक्याहून आणलेला चिवडा दिला. ती एकदम खूष झाली.

"उद्या येणार ना रे?"

"होय सायब! काम घेतला ता आता पुराच करायचा." चंदू सोरप पंधरा सोळा वर्षाचा होता. तो सांगत होता.

"लवकर रस्तो झालो काय मग शयरात जावक गावात. कदी बगुकव नाय आमी."

"अरे असे जाणार? उघडे एका लंगोटावर?"

सगळे चूप झाले. शहरात जाताना कपडे लागणार याची जाणीव झाली. मग हळू समजूत घालत म्हणालो, "एकदा मी नेईन हा तुम्हाला तालुक्याला."

काम जोरात सुरू होतं. चार दिवस गेले असतील आणि संध्याकाळी कुंभार आला.

"सायबानु रस्तो करूक घेतलास? बगुन ईलंय. बरो हा पण लय खडबडीत हा. माज्याकडे दगड तासूचा टीकम हा. मी वरचे शेंडे तासून खाचे खळगे काडून देतय चलात?"

"अरे चालेल काय धावेल. पण एवढा लांब रस्ता एकटा कसा करशील?"

"ता माज्यार सोडा. माजो पोरगो येता रस्तो बनवूक. मंगो. म्हायत हा तो तुमका."

"मंगेश तुमचा मुलगा का? वा! कामाला वाघ आहे."

चांगलं काम करायचं असलं की मदत वरचा तो करतोच याचा अनुभव येत होता.

पिंपळाकडे रस्ता अगदीच अरूंद होता. वरच्या रस्त्यापासून गावच्या पाष्टेच्या दुकानपर्यंत रस्ता झाला होता. कुंभाराने व त्याच्या मुलाने छान

तासून खड्डे काढून टाकले होते. आठ दिवसात श्रमदानाने या पोरांनी पाच किलोमीटरचा रस्ता केला होता. मला विश्वास वाटत नव्हता.

"सायबानु! पिपळा बुडचा(खालचं) काय करूया? पार कापूचो लागात पिपळाचो." कुंभार विचारू लागला.

"गावाला न दुखवता काम करायचं. पार कापला तर मुंजा त्रास देईल ही भीती आहे तुम्हाला. मग माझा विश्वास नसला तरी मी गावाशी वैर नाही करून घेणार."

"सायबानु दर नवमेक स्वयंभू मंदीरात कौल लावतत. तीन चार जणांच्या आंगात येता. आपण कौल लावया नी अंगात येयत तेकाय ईचारूया. कौल मिळालो तर कापायचो पार. नायतर नाय. कसा?"

"ठीक आहे! तुम्ही गावकरी जसं ठरवाल तसं करू."

कौल मिळाला. कुंभाराच्या बायकोच्या अंगात आलं होतं. तिनं जोरदार कौल दिला. गावडे देवळात हजर होते. या कौल मोहिमेबद्दल त्यांना कल्पना नव्हती. आमचं काम आता करायला हरकत नव्हती. देवाचा कौल मिळाला होता गावडे काहीच बोलू शकत नव्हते.

रस्ता करायला आम्हाला आठ दिवस लागले होते. आता पार तेवढा खणून रस्ता पूर्ण करायचा. पण एक माणूस सांगून गेला. उद्या तहसीलदार कचेरीत हजर रहा. काय झालं असेल? तहसीलदाराने काही माझ्या विरुद्ध केलं तर नसेल. अनेक विचार झरझर येत राहीले.

पण आता मी हिरण्याचा विचार करू लागलो. तरुण मुलांना आता शहराची आस लागली होती. लवकरच त्यांना एखादं शहर दाखवलं की त्यांचं मन नक्कीच बदलणार होतं. शाळा, वाचनालय सर्व दाखवायचं. असा विचार केला होता. तडकाफडकी बदली तर करणार नाहीत? काय असेल?

सकाळीच बस पकडली. वेळे आधीच कचेरीत पोचलो. साफसफाई करणारे आले होते. ते लगबगीने काम करत होते. दहा वाजता सगळे लोक यायला लागले. बारा वाजता येणारे तहसीलदार आज दहा वाजता हजर होते. समजलो बहुतेक कलेक्टर किंवा डेप्युटी कलेक्टर येणार असणार. साडे दहाला दोन जीप आल्या. सगळे स्वागताला उभे राहिले. जीप मधून कलेक्टर उतरत होते. मला का बोलावलंय ते समजलं. थोडी काळजी वाटली. कोणताही झगडा करणं मला पसंत नव्हतं. कलेक्टरना बोलून मी चूक केलीय वाटू लागलं.

तासभर झाला आणि मला बोलावणं आलं. समोर कलेक्टर, मामलेदार, तहसीलदार बसले होते. कलेक्टरांचे चिटणीसही होते. त्यांच्याशी नजर मिळताच त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू पाहून धीर आला.

"या धनगर या. आम्ही तुमच्या गावी आत्ता येणार आहोत. रस्ता कसा बनवायचा ते ठरवायचं आहे." कलेक्टर

"साहेब आपली गाडी गावापर्यंत पोचणार नाही. चालत कमीत कमी अडीच तीन मैल जावं लागेल. कसं करूया?"

"असं म्हणताय! पण आज नाही गेलो तर काम राहून जाईल. नको नको आजच जाऊया."

"बिडीओ, तहसीलदार व मामलेदारही येतील. आजच रस्त्याचं काम मार्गी लावूया."

"मी पुढे जाऊन बैलगाडीची तरी सोय करतो."

माझं न ऐकता मलाच एका जीप मधे बसवलं व आम्ही निघालो.

गावी पोचलो. पिंपळापर्यंत गाडी सहज गेली. पण तिथून चालत जाताना कलेक्टर बोलू लागले."अरे रस्ता तर बनवलाय वाटतं. नवीन दिसतोय. मामलतदार केव्हा बनला रस्ता?"

मामलतदार गडबडले. मी पुढे झालो."साहेब हा रस्ता गावच्या मुलांनी श्रमदानाने आत्ताच बनवलाय. पण पिंपळाचा पार तोडायची गावकऱ्यांची तयारी नाही. गावचा राखणदार त्याच्यावर आहे अशी वदंता आहे गावात."

"म्हणजे पिंपळ तोडता येणार नाही. मग रस्ता कसा बनणार?”

"थोडा वेळ द्या साहेब मागचा पुढचा रस्ता बनवलाय आता जोडायसाठी गावकऱ्यांना समजावायला पहायचं. एकदा रस्ता दोन्ही बाजूला झाला की. होतील तयार."

"तुम्ही गावातच राहाता म्हणजे तुमच्या वरच विश्वास ठेवला पाहिजे."

बोलता बोलता चालत आम्ही गावात पोचत आलो होतो. लंगोट घातलेली तरूण मुलं, नागडी करदोट्र्यावर असलेली लहान मुलं. अर्धवट लज्जा रक्षण करत जाणाऱ्या बायका कलेक्टरच्या नजरेला पडू लागल्या. हळू हळू त्यांचा पारा चढू लागला.

"मामलतदार ही काय परिस्थिती बघतोय मी. सरकार एवढी मदत पाठवते कुठे जाते ती? अहो हे गरीबी रेषेच्या खालीच नाहीत पण पुरे गरीबीच्या तळाला पोचलेत. यांना नक्कीच कोणत्याही योजनांचा लाभ पोचलेला नाही. आठ दिवसात, मला गेल्या दोन तीन वर्षात सरकारी योजनांखाली किती मदत या गावाला दिली त्याचा रिपोर्ट पाहिजे. यावर पुरी चौकशी होऊन दोषी लोकांना उघडं करेपर्यंत कोणाचीही बदली होणार नाही. कोणी बदलीची मागणी करणार नाही हे पहा. चला पुढे जाण्यात अर्थ नाही. काय परिस्थिती पहाणार या पेक्षा! मी तीन महिन्यांनी परत येईन तोपर्यंत सर्व योजना राबवा या गावात."

मुलांचा जमाव कुतुहलाने सर्वांकडे डोळे विस्फारून पहात होता. त्यांच्या मनात जागवलेल्या ठिणगीला मी आता फुलवणार होतो. माझं काम आता सोपं होणार होतं.

कलेक्टर वगैरे गेले. मुलांसह घरी आलो.

"हे कोण वो सायबानु? आणि तेंची मोटरगाडी उगडीच? वारो झोंबणा नाय?"

"हे कोण पण गावाक सगळा देणारे? सरकार म्हणजे वो?"

शाळेत कधीही न गेलेले. बाहेरच्या जगाचा संपर्क नसलेल्या या प्रजेला. कसं समजवायचं याचा मी विचार करत होतो. ही मोठी जबाबदारी होती. त्यांना समजेल अशा भाषेत कसं सांगायचं हे खरंच अभ्यास करण्या सारखं होतं.

"आधी सगळं पहा. सगळे प्रश्न तुमच्या मनात तयार होऊ देत. मग मी सांगेन ना तेंव्हा आयुष्यभर लक्षात राहील."

"आता पार तोडूक जावया सायब? रस्तो पुरो करूचो रवाक नुको." उत्साहात मंगेश कुंभारने विचारलं.

"नाही रे बाबा! कौल मिळाला तरी. गावच्या लोकांना बोलावून सर्वांचं मत पहावं लागेल."

"किती दिसानी करायचा मगे?"

"एकदा गावकऱ्यांना बोलावून घेऊ संध्याकाळी. विचारू. त्यांचा होकार मिळाला की करू."

मला बरं वाटत होतं. मुलांना गावाच्या सुधारणेत रस वाटू लागला होता.

भिवा, कुंभार, सुतार अशा सगळ्यांना बोलावून गावकऱ्यांना जमा करायला सांगीतलं. रस्ता बघून गाव खूष झालंच होतं, पण कोणताही विरोध नंतर नको म्हणून गावाचा कौल घेणं जरूरी होतं. चार दिवस माझा संध्याकाळचा वेळ मुलांना शिकवण्यात जात होता. दिवसभर अभ्यासात घालवत होतो. काही महत्वाकांक्षा जपल्या होत्या. आय. ए. एस्. व्हायचा

चंग बांधला होता. हिरण्या सारख्या गावात सुधारणा करायची खूप इच्छा होती. गरीबी आणि जात यामुळे होणारी अवहेलना, अपमान त्यांच्या वाट्याला येत असणार. माझ्यासारखाच. कधी कधी या विचारांनी मन उदास व्हायचं. पण हिरण्यातलं काम माझा आत्मविश्वास वाढवू लागलं होतं. माझ्या मनात एकच जात फिरत होती. गरीबी.

"सायबानु! आसास काय वो?"

हा भिवा होता. "काय भिवा! काय झालं?"

"उद्या सांच्याक सगळे गावचे लोक येतहत हय. तुमी सांगावो पाठवलल्यात ना? तो सांगलंय सगळ्यांका. येतव म्हणालेत. काय पण म्हणा सायबानु सगळे गावड्यां सारकेच तुमका मानतत वो."

"हो? माझं मानतील? गावड्यानाही सांगीतलंस ना?"

"होय तर! गावडेंपासून सुरवात केलंय ती आमच्या येस्करांच्या आवठापर्यात. गावडे काय बोलले नायत. पुटपुटत होते काय तरी. मुंजो चिडान जातलो. गावचो सत्यानाश होतलो. असा बडबडा होते. सायबानु, तेंका ईचारून नाय केलास या काम?"

"सगळं त्यांना सांगीतलं होतं मी. पण सरकारी काम म्हणजे केलंच पाहिजे. नोकरी जाईल माझी. काढू, त्यांचा रागही काढू."

भिवा गेला पण वादळाचा संकेत देऊन गेला.

संध्याकाळी मी मुलांना सांगीतलं.

"उद्या सगळे गावकरी येणार. पार तोडायचा की नाही ते ठरवणार आहेत. तुमच्या घरचे काय म्हणतात ते पहा. त्यांना रस्ता पुरा व्हायला पाहिजे की नको हे समजून घ्या. उद्या जास्त लोक 'रस्ता नको, मुंजा त्रास देईल' म्हणाले तर रस्ता होणार नाही. तेंव्हा तुम्ही समजवायचं आहे घरी."

सर्वांनी माना डोलावल्या मी थोडा निर्धास्त झालो. दुसऱ्या दिवशी पंचायत भरली. मग रस्ता का पुरा करायचा ते बोललो. कुंभाराने देवाचा कौल मिळाल्याचं सांगीतलं. रस्ता पुरा करायला सर्व तयार झाले होते. गावडे काहीच बोलत नव्हते. सुतारानी विचारलं, " गावड्यानु तुमका काय वाटता?"

"मिया काय सांगतलंय. माका ईचारून खंय काय झाला हा? करा काय ता. मुंजो दुकावलो, चिडलो तर काय? हेचो ईचार करा."

त्यांचा विरोधी सूर पाहून थोडी चुळबुळ सुरू झाली. पण मुलं बोलू लागली, "आमी पिपळा पर्यात रस्तो केलंव, मुंजाक सगळा अगोदर म्हायत पडता ना? मग तेका रस्तो बनवतव, तेचो पार मधी येता, तो तोडतलंव ह्या ध्यानात ईला नसात? पिपळाक हात नाय लावतलव. पार तोडतलंव तसो कौल लावलंव. गाराणा घातलंव. तेणा होय म्हणान कौल दिलान. आता काय रवला? काय म्हणून चिडात?"

कुंभाराचा मंग्या बोलत होता आणि इतर सर्व मुलं त्याला साथ देत होते. मुलांची ही उमेद बघून मी पण चकीत झालो.

गावाने मग ठरवलं परत एकदा स्वयंभूच्या देवळात कौल लावायचा. त्या आधी पिंपळाकडे कोंबड्याचा बळी द्यायचा. तो शांत झाला की पार तोडायचा.

विश्वास नसला तरी हे गावकऱ्यांसाठी मान्य करावं लागलं.

दोन दिवसानी मुहुर्त काढून कौल घ्यायचं ठरलं. स्वयंभूच्या देवळात सगळं गाव लोटलं. देवाला कौलासाठी डाव्या आणि उजव्या बाजूला फुलांच्या पाकळया पुजाऱ्याने चिकटवल्या. व म्हणाला, "बा महाराजा! देवा! गावाक एक प्रश्न पडलो हा. गावाचो रस्तो बनवूचो हा. पिपळाचो पार मधी येता हा. कौल लावलंव. बनवूचो असात तर उजवो कौल दी. नायतर डावो. बा महाराजा गावार मगे खयचा संकट येवचा नाय ह्या बगान कौल दी."

एवढ्यात सुतारीण घुमत पुढे आली. तिच्या अंगात आलं होतं. "कसलो कौल लावता? हूं.. हूं तो राखणदार बसलो हा थंय.. "

तिचं बोलणं पुरं व्हायच्या आत कुंभारीण घुमायला लागली." एकदा झाला ईचारून पार तोडूचो ठरलो. तोच कौल गावतलो बग. हूं.. हूं"

केवढा मागासलेपणा होता. हे थोतांड बघून हसावं की रडावं समजत नव्हतं. पण चालत आलेल्या या रूढीला आळा घालायला मी असमर्थ

होतो. एवढ्यात तेल्याची बायको घुमू लागली. थोड्याच वेळात चार पाच बायांनी घुमत देवा समोर गोल गोल फिरायला सुरवात केली.

शेवटी कौल लागला पुजाऱ्याने कौल लागला सांगीतलं. पार तोडायचा कौल मिळाला होता.

आता सगळ्या बाया एका सुरात ते उचलून धरत होत्या. नाही म्हणत फक्त सुतारीण घुमत होती. शेवटी सगळं थांबलं. कौल ऐकून गावडे देवळातून बाहेर पडले.

सगळी मुलं खूष झाली होती. नाचत होती पण मला गावाची काळजी वाटू लागली. दोन भागात वाटली जातील हे लोक. याची भीती वाटू लागली.

असेच थोडे दिवस गेले. मी अभ्यासात गर्क होतो. मुलांना थोडं थोपवलं होतं. वातावरण थंड व्हायला वेळ द्यावा हा मानस होता. संध्याकाळी मुलं येत. त्यांना आता रस्ता लवकर हवा होता.

दोन दिवसानी मी तालुक्याला गेलो. पगार घेतला. तेव्हा समजलं कलेक्टरना सगळा रिपोर्ट पाठवला. समजेल. मला रिपोर्ट मधे स्वारस्य नव्हतं.

बाजारात गेलो. चांगले लांब रूंद पंधरा राजापुरी पंचे विकत आणले. मुलांना घेऊन तालुक्याला जायचा विचार होता. त्यांच्या मनात चाळवलेली जिज्ञासा आता मला थंड होऊ द्यायची नव्हती.

संध्याकाळी मुलं आली. मी त्यांना पंचे द्यायला आत आलो. मुलांनी आपसात बोलायला सुरवात केली. सुताराच्या मुलावर पांडूवर सगळे तुटून पडले होते.

"गावात रस्तो होता हा. तो हेंका नुको. शरात जावन शिकाक गावात ता नुको. कौल नाय देयत. पांड्या घराक जावन सांगाक नाय काय रे? सायबानी सांगलल्यानी ना?"

माझ्या कानावर हे पडले आणि मी बेचैन झालो. मला नको असलेला एक प्रवाह यांच्यात चालू होत होता. यांना शहरात नेऊ की नको? मग त्यांच्या मनात उत्सुकता तयार केली त्याचं काय? सगळे विचार एका मागोमाग मनात गर्दी करू लागले.

बाहेर आलो. "मुलांनो हे बोलणं थांबवा. पांडूच्या आईच्या अंगात आलं होतं. तिनं ठरवून थोडंच सांगीतलं? हे अंगात येणं म्हणजे काय याची मला फारशी माहिती नाही. माझा विश्वास नाही हे ही खरं आहे. पण माहिती नसलेल्या गोष्टींवर ठामपणे उत्तर देणं हे चुकीचं आहे. पांडूच्या आईला दोष देणं बरोबर नाही. तुम्ही लहान आहात. मोठ्यांवर असे आरोप करणं बरोबर नाही.

चला पंचे कोणा कोणाला नेसता येतात? छान कासटा मारून नेसता आला पाहिजे. "त्यांना पंचे दिले. दहा वर्षापेक्षा छोट्यांना म्हणालो,"तुम्ही लहान आहात. मोठे झालात की तुम्हाला नेईन." ती मुलं हिरमुसली पण माझा इलाज नव्हता.

"आपण परवा शहरात जायचं आहे. घरात मोठ्यांना सांगा व त्यांचा होकार असेल तरच नेईन हे लक्षात ठेवा."

जवळ जवळ सर्वांनाच होकार मिळाला. सकाळी सहा वाजता सगळे हजर झाले. एक सारख्या कासटा मारलेल्या पंचातली ती हिरण्याची मुलं मिलट्री सारखी वाटत होती. एकूण बारा मुलं घेऊन आम्ही चालत घाट रस्त्यावर आलो. दोन गाड्या आम्हाला न घेताच गेल्या. तालुक्याला आज आठवडी बाजार होता. पुढच्या बस मधे नंबर लागला. कसं तरी सर्वांना आत चढवलं. मग मी चढलो. सगळे उभे होतो. बस चालू झाली. घाट रस्त्याची वळणं घेऊ लागली आणि मुलांना मजा येऊ लागली. ते हसू खिदळू लागले. आता पुढचं वळण दिसताच "ओ" चा एक नाद सगळे करू लागले. हा त्यांचा 'ओकार" वळणावर जोरात व्हायचा आणि वळण संपलं जोरात खिदळणं चालू व्हायचं.

बस मधले प्रवासी यांचा अवतार व आवाज ऐकून हसत होते. गावचे स्वछंद स्वातंत्र्य अनुभवलेल्या त्या जीवांना समाजाची कुठलीच बंधनं नव्हती. आपल्या नैसर्गिक भावनांना ते पूर्ण पणे उपभोगत होते. ते पाहून मी तृप्त होत होतो. तालुक्याचं शहर आलं. बाजारात ही गर्दी दिसत होती. सर्वांना एकमेकांचे हात धरून चालायला सांगीतले. गर्दी बघून ते भांबावून

गेले होते. पेपरमिंटच्या गोळया घेऊन सर्वांना वाटल्या. सगळे एकदम आनंदले. बाजारातले सगळे लोक आमच्याकडे आश्चर्याने पहात होते.

पण या मुलांना सगळया गोष्टींचं नवल वाटत होतं. ते सर्व काही पाहात मनात साठवत होते.

मग शाळा दाखवली. हजारो प्रश्न त्यांनी विचारले. उत्तरं देता देता मला पुरे झालं. मग वाचनालय दाखवलं. पुस्तकं हातात घेऊन आतील चित्रं पहाताना त्यांचे लुकलुकणारे चमकणारे डोळे पहायला मजा येत होती. माझ्या कामाचा हा दुसरा अध्याय आता रंग घेऊ लागला होता. शाळेची पुस्तकांची ओढ त्यांच्या मनात येऊ लागली होती. दररोज संध्याकाळी मी बाहेरच्या जगाच्या गोष्टी सांगून त्यांच्या मनात जिज्ञासा वाढवित होतो.

......

आता ठरवलं रस्ता करायचा. पार तोडायचा पण परत तोडलेला भाग सुंदर बांधून लिंपून घ्यायचा. कुंभाराला बोलावून चिकण माती तयार करायला सांगीतलं. कारण सांगीतलं तर म्हणाला, "चांगला करतास. रसतोय होयत नी पारय बांदललो बगून गाव खूष होयत. चार दीस तरी लागतीत. माती शेण कालवून सडवून चिकणमाती बनवूक."

चार पाच दिवसानी पार तोडायचा व बांधायचा नक्की झाला. मुलांना म्हणालो, "एवढ्यात कोणाला सांगू नका. घरच्यांनाही. एका दिवसात तोडून, नवा बांधून आणि लिंपून छान बनवूया. गावकरी खूष झाले पाहिजेत.

संध्याकाळी गावडे आले. मला आश्चर्य वाटलं.

"काय गावडे बरेच दिवसानी आलात?"

"काय करू! गावच्या मुंजान आपलो खेळ बदाललो दिसता. तो आता गावाक बाकिच्यांसारो(इतरांसारखं) करून वाट लावतलो. खालचे गाव सुधारले. खराच सुधारले काय वो? मग बांदरारसून(बांधावरून) भांडतत कित्या? रातीक दुसऱ्याची पिका कापून हाडतत कित्या? आपल्या शेतातली म्हेनत टाकून ह्या काय? तुमी शिकलंले. गावा फिरलंले. आमच्या गावात असला काय दिसला काय वो? आज काल मुंजो फिरणा नाय म्हणतत. तुमका शरण गेलो म्हणतत सगळे. काय करशात ता करा. पण ह्या असला भांडणाचा नी चोरीचा ईक(विष) गावात येवचा नाय बगा. माज्या आज्याच्या आज्यान सांगलंल्यान, मुंजो गाव सोडून गेलो, नायतर आपला रुप बदललान तर समजा गावातला सगळा सोपला. गाव भांडतला. शेवटाक तुमका सांगुचा वाटला म्हणून ईलंय. गावाचा भला करा पण कली येवचो नाय बगा."

मुंजा! परत मुंजा! कसे सुधारणार हे. जुने लोक सुधरणार नाहीत पण नवी तरूणाई हातात आली आहे. ती सुधारणार गावाला. मी माझी समजूत काढत होतो.

"येतय मिया." गावडे निघून गेले. आज चपटी बाटली आणणारा आला नव्हता. मला कुठेतरी बेचैन वाटलं. गावडे खोल कुठेतरी दुखावले होते. त्यांचं गावावर फार प्रेम होतं. मी त्यांच्या कारभारात लुडबुड करून गावाचा चेहरा बदलत होतो ते त्यांना जराही रुचलं नव्हतं.

दोन रात्री अशाच विचारात तळमळत गेल्या. कुणालाही न दुखवता मला काम करायचं होतं. इथं तर मी गावच्या सरपंचांना बाजूला करून गावावर ताबा केला होता. हे बरोबर होतं काय? वेळ निघून गेली होती. आता काहीच करू शकत नव्हतो. तरुण आता उभे झाले होते. आता मी नसलो तरी ते नक्कीच गावाला सुधारणार होते. तो वणवा बरोबर पेट घेत होता.

आज पौर्णिमा. पार कापायचा मुहूर्त मुलांनी काढून आणला होता. पार चांगला पाच फूट कापला तेव्हा रस्त्याला पुरेशी रुंदी मिळाली. रस्त्याला रुंदी मिळाली. तुटलेल्या पाराची तटबंदी तासलेल्या जांभ्या दगडांनी केली. पाराचे सर्व दगड काढून छान तासून परत लावले. चिकण मातीचं ते लिंपण आणि तासलेल्या जांभ्या दगडाचा रुबाब पाराचं सौंदर्य वाढवित होता. काय करा हे मला सांगावं लागत नव्हतं. आपल्या मनात येईल तसं सर्व जण काम करत होते. कुंभार मधून मधून सूचना करत होता एवढंच. कामाचा झपाटा एवढा होता की संध्याकाळपर्यंत पाराचं काम पूर्ण झालं होतं.

"सायबानु काम झाला. ह्यो पारा समोरचो रस्तो तासूचो रवलो हा. अंदार पडलो. ह्या काम उद्या पुरा करीन मी. कोण नाय ईले तरी चलात."

ही तर पावती मिळाली होती. आता सगळं गाव सुधारणेचा विचार करेल याची खात्री झाली.

रात्र भर छान झोप काढून झाली होती. सकाळी पडवीत येऊन जोरदार आळोखा देताना सुंदर वास आला. भात कापणीला आलं होतं. त्याच्या सुगंधाने हिरण्याला प्रेमळ विळखा घातला होता. त्याचा पोटभर आनंद घेत उभा होतो. मागून आवाज आला. "सायबानु!" कोण म्हणून मागे वळलो तर दुकानदार पाष्टे मला साद घालीत होता.

"पाष्टे! तुम्ही? एवढ्या सकाळी?"

"नाय वो! ह्या देवक ईलंय. म्हस ईयाली काल. खरवस हाडलंय. बायल छान बनवता. गुळ येलचीचो हा. तुमी इतक्या माज्या साटी केलास तर तुमका नको देवक? पयलो तुमका. घ्या."

"अहो पण मी काय केलं एवढं तुमच्यासाठी?"

"रस्तो बनवलास तो काय. गावात माकाच जास्त गरज होती तेची. आता सामानाचो टेंपो नायतर बैलगाडी दारात येतली वो."

माझ्या डोक्यात आत्ता प्रकाश पडला.

"जीव वर येय सामान दुकानात भरताना. बायलेची कमर धरा चार दीस. सगळा सोपला आता. आता बगा सगळा सामान भरतय की नाय तो." पाष्टे खुषीत येवून बोलत होता.

"बरं झालं तुमचे श्रम वाचले. पण रस्ता करताना कोणीच आलं नाही तुमच्या कडून."

पाष्टेने आजूबाजूला नजर फिरवली मग खालच्या आवाजात म्हणाला,"दुकान घेवन बसलंय. गावड्यांका वायट वाटला तर दुकवान कसा चलात. म्हणून नाय मधी पडूक. झील म्हणा होतो जातय रस्तो करूक पण मियाच नुको म्हटलंय. होयो तर खर्चाचे पैशे देतय."

मी गप्पच राहीलो. थोडा वेळ बसून तो निघून गेला. पण कोकणी प्रेमाचा हळुवार अनुभव देऊन गेला. कृतज्ञता व प्रेम ते कसं व्यक्त करतात ते समजलं.

अचानक मला आठवलं. रस्त्याचं नाटक चालू झाल्यापासून धाकू आपल्याकडे यायचा बंद झालाय. त्याला गावडेनी तंबी दिली असावी.

गावाची भात कापणीची लगबग चालू झाली आणि मी सर्व वेळ अभ्यासाला देऊ लागलो. आठ दहा दिवस माझ्याकडे कोणीच फिरकलं नाही. दररोज येणाऱ्या मुलांची एवढी सवय झाली होती की चारच दिवसात एकटं वाटायला लागलं होतं. आज आठवडा झाला होता.

गावात एक फेर फटका करून कंटाळा घालवावा म्हणून बाहेर पडलो. तेवढ्यात गावाच्या दिशेने एक जीप येताना दिसली. समजलो कलेक्टर

बोलल्या प्रमाणे आले असणार. पण अजून तर दोन महिने पण नाही झालेत. संभ्रमात होतो तोच जीप माझ्या घरच्या रस्त्याकडे येताना दिसली. तसाच परत घरी निघालो. जीपचा ड्रायव्हर म्हणाला, "कलेक्टर सायबानी बोलावलंय. असाल तसे घेऊन या म्हणालेत."

हुकमाचा ताबेदार तसाच निघालो. ऑफिसात पोचलो तर सर्वच हजर होते.

"या धनगर या. रिपोर्ट आलाय. सर्व योजना प्रमाणे मदत गावात पोचल्याच्या नोंदी आहेत. मदत गेली कुठे?"

"साहेब! गेल्या चार साडेचार महिन्यात मी एकदाही मदत आलेली पाहीली नाही. नोंदींवर माझी पोहोच आहे?”

कलेक्टर हसले."धनगर ही सिस्टम तुम्हाला साफ करते आहे हे मला माहीत आहे. पण सरकार कागदावर चालतं. फार पक्कं काम केलंय तुमच्या विरोधात. ज्यानी कुणी केलंय ते सुटणार नाहीत. पण यामधून तुम्हाला मी सोडवू शकेन असं वाटत नाही. बिडीओ, पुरवठा अधीकारी सर्वांनी तुम्हाला दरमहा रेशन दिल्याचं नमूद केलंय."

"असं करा दोन दिवसात राजीनामा द्या आणि रत्नागिरीला चला. मी तुम्हाला या पेक्षा चांगली नोकरी देतो."

"पण मी जर काही केलं नाही, तर दोष दिला, आरोप ठेवला म्हणून पळून गेला म्हणतील सर्व, त्याचं काय?"

"कोणताही ठपका तुम्हाला लागणार नाही याची खात्री बाळगा तेवढं तर जरूर माझ्या हातात आहे. मामलतदार पाहीलंत काय झालंय ते? हे तुम्हाला नकोत ना? मग ते जातील. पण त्यांच्यावरचे सर्व आरोप आत्ता मागे घ्या. मी असतानाच हे काम पुरं करा. तुमच्या स्वार्थासाठी एका चांगल्या माणसाचा बळी देऊ नका. नाहीतर ही केस मी त्यांना सस्पेंड करून चौकशीसाठी पोलीसात देऊ का? तुम्ही ठरवा."

एवढा स्पष्ट बोलणारा कलेक्टर असू शकतो? विश्वास बसत नव्हता. तहसीलदार मामलेदार सर्वांची घाई गर्दी झाली होती. ते धावा धाव करत होते. मी राजीनामा लिहीत होतो. काही गुन्हा केलेला नसतानाची शिक्षा मरणप्राय यातना देते. ती मी आत्ता अनुभवत होतो.

रूम मधे मी आणि कलेक्टर होतो. पटकन शब्द निघून गेले, "अजूनही आमचा वाली कोणी नाही. अन्याय आम्हीच सहन करायचा. का?"

"काढून टाका मनातून हे. तुम्हाला मी राजीनामा मुद्दाम द्यायला सांगीतलाय. अहो या वेड्यानी रिपोर्ट मधे दरमहा रेशन व इतर सामान टेंपोने पंचायतीत पाठवल्याचं लिहीलं आहे. बरं झालं मला ठाऊक होतं ते की गावात जायला रस्ताच नाही तर टेंपो जाईल कसा? त्यांनाही माहीत असायला हवं होतं. ते गावात आले होते. तरीही एवढी मोठी चूक करून बसलेत. पण मी त्यांना हे बोललो नाही, कारण तुम्हाला मला या चिखलातून बाहेर काढायचं आहे. तुम्ही शिकला आहात. सर्व्हीसेसची परीक्षा देणार म्हणता मग रत्नागिरीला चांगला अभ्यास करा. नोकरी देतो

ती करा. गाईड देतो अभ्यासासाठी, आरामात रहा. यांचं पितळ मी याच केस मधे उघडं करणार आहे. सगळे पुरावे आहेत माझ्याकडे. तुमचं नाव ते काढू देत. मग पहा महिन्या भरात कसे कापत रत्नागिरीला येतात ते."

मी अवाक होऊन सगळं ऐकत होतो. मग म्हणालो, "हिरण्यात व लोकांची कामं करण्यात जीव गुंतला होता. मुलांना शिकवताना त्यांची माया वाटू लागली होती."

"अहो धनगर! चार पाच महिन्यात असे गावावर जीव लावू लागलात तर सरकारी नोकरी कशी कराल? दर तीन वर्षांनी नवा डाव मांडावा लागतो सरकारी सर्वीस मधे."

एवढ्यात सगळे कागदपत्र घेऊन मामलेदार आले नवीन कागद कलेक्टर नी झरझर वाचले."टेंपोच्या रीसीट आल्या? पंचायतीत पोचवल्याची नोंद आली? यांचं नाव कुठेही नाही?" असे प्रश्न कलेक्टर विचारीत होते आणि सगळ्यांना ते होकार भरत होते. जुने व नवे दोन्ही कागद आणि रिपोर्ट मला द्या. रत्नागिरीला जाऊन परत सर्व तपासून पाहीन असं म्हणत, उठता उठता माझा राजीनामा त्यांनी मामलेदारना दिला. मला जीप मधे घेतलं. जीप निघाली.

सरळ गावात शिरलो. पंचायतीपर्यंत जीप नेता आलेली बघून कलेक्टर म्हणाले, "अहो रस्ता पुरा केलात? कधी केलात?"

"आत्ताच दोन दिवस झाले असतील."

"एक कराल आजच गाव पंचायत बोलवा आणि तुम्ही श्रमदानाने रस्ता पूर्ण केल्याचा ठराव करून मला पाठवा. तुमची केस नाही तर हराल."

मला उतरून ते निघून गेले.

सरकारी कामं कशी फक्त कागदावर चालतात याचा छान धडा मिळाला.

पंचायत बोलावणं हे गावडेंच्या अखत्यारीत येत होतं. कसं करणार? पण मुलांच्या मदतीनं ते काम करायचं ठरवलं. पाष्टे ना बोलावून सर्व समजावलं.

"कलेक्टर आले होते. त्यांनी ठराव करायला सांगीतला. रस्ता आपण आत्ताच बनवला. गावच्या मुलांनी श्रमदानाने बनवला, असं सर्व खरं ते लिहून ठराव कलेक्टरना पाठवायचा आहे. नाही तर तालुक्याचे लोक त्यांनी बनवला दाखवून आपल्या गावचे पैसे लाटतील. मी सरकारी नोकर. मी पंचायत बोलवू शकत नाही. गावडे माझ्यावर नाराज आहेत. तेव्हा तुम्ही माझं एवढं काम करा."

"ईला ध्यानात. चार दीस द्या. ठराव करून बरोबर लिवन तुमका देतय. माका लिवक येता. सातवी पास हय."

त्याने काय केलं ते सांगीतलं नाही. पण तिसऱ्या दिवशी सकाळी एक कागद घेऊन आला. ठरावावर जवळ जवळ पंधरा एक आंगठे लावले होते व पुढे नावं लिहीली होती. गावडेंचं नाव पहिलंच होतं. मात्र मजकुराचा तपशील जुन्या काळच्या मराठीत लिहीला होता.

"रा.रा. कलेक्टर सायबान्ला हिरणेकरांचो सा. न.

आमी हिरणे गावकरी आज सोमवारी सयंभुच्या देवळात जमून, आमच्या पोरग्यानी घाटापासून गावापरयांत रस्तो केल्यानी तेची नोंद घेतलंव. ह्यो रस्तो शरमदानान बनवलव. रस्त्यान आता घाटार जावन तालुक्याक जावची सोय झाली हा. ह्यो रस्तो करूक आठ धा दीस लागले हत. पुरो होवन दोन दीस झाले. भादरपदाची काळी दवादस(द्वादशी)होती. साल एकोणवीसशे एकसठ. पैसो एकय लागूक नाय. कारण गावच्या पोरांनी रस्तो खणान सारको केलो. पार तोडून सारको केलो. कुंभारान चिरे तासून पार लिपल्यान. सगळा काम गावातल्यांनीच केला. मगे पैसो कशाक लागात? तरी ह्यो ठराव पंचायत तुमका पाठवता. सदर ठराव करणार." मग खाली नावे व आंगठे लावले होते. मला वाचताना हसू आवरत नव्हते. मालवणी भाषा राज्य भाषा नव्हती. ह्या पत्राचा उपयोग होईल? मग एक छान कल्पना सुचली.

मी पत्र लिहून जोडलं. "हिरणं गावात कोणीही शिक्षित नाही एकटे दुकानदार पाष्टे सातवी शिकलेले आहेत. मराठी यथातथाच आहे. ठराव

जसा झाला तसा त्यांनी लिहिला. मालवणी बोली भाषेत आहे. अत्यंत सत्य व खरा दस्ताऐवज म्हणून तसाच पाठवत आहे."

पाष्टे व कुंभार आले होते. "हसतात कित्या? काय चुकला हा?"

"नाही हो. बरोबर आहे सगळं पण तुमच्या बोलीभाषेत आहे. आपली राज्य भाषा मराठी आहे."

"मग काय चलात की नाय?"

"चालेल. मी सोबत मराठीत माझा रिपोर्ट जोडला आहे. काळजी करू नका आणि हो तुम्हाला सांगायचं राहून गेलं. मी परवा चाललो रत्नागिरीला. मी ही नोकरी सोडली आहे."

"काय म्हणता काय भाऊसायब! एकदम सरकारी नोकरी सोडलात? गावाक मानवललात तुमी. दुसरो कोण कसो येयत काय म्हायत."

मी काहीच बोललो नाही. ते गेले मी सामानाची आवरा आवर करायला घेतली. तास दीड तास गेला असेल. कालावाला ऐकू आला. बाहेर आलो तर खूप मुलं आणि काही मोठे लोक येताना दिसले.

"सायब तुमी चललास? बदली झाली? मग हय कोण?"

"येईल कोणीतरी. सरकार पाठवणार मला कसं माहीत पडेल?"

संध्याकाळी गावडे, गावकर असे आठ जण गावचे मानकरी आले. बहुतेक बलुतेदार पण आले. गप्पा सुरू झाल्या. संध्याकाळ होता होता गावडेंचा माणूस चांगल्या तीन मोठ्या बाटल्या घेऊन हजर झाला. सहा

रुपये काढून मी देऊ लागलो तर गावडे म्हणाले, "पाचच देवा. तीन बाटलींचे पाच होतत ना रे?" त्याने मान हलवली. मी समजलो ही माझ्या निरोपाची सभा भरलीय.

"मी काय म्हणतंय, सायब पगारदार! पैसो खुळखुळता हेंच्या खिशात. आमच्याकडे काय? घर झाडलंव तर दोन चार आणे गावले तर गावले. सायबांका काय देवचा निरोपाचा?" गावडे प्रस्ताव मांडताना पाहून मला आश्चर्य वाटलं पण गावाकडून मला काहीच नको होतं. मी म्हणालो, "मला काही द्यायचा विचारही करू नका. आहे ते सामान कसं न्यायचं हाच प्रश्न आहे. आणि तुम्ही मला दिलेलं प्रेम आहे माझ्या सोबत. हे गाव कायम माझ्या लक्षात राहील. पाहू कधीकाळी या बाजूला आलो तर नक्की येईन."

"येवचा लागात तुमका. आमचो मुंजो नाय. तुमी हाडलंलो मुंजो कसा काम करता ता बगुक येवचा लागात ना?"

गावडे मुंजातून बाहेर पडायला तयार नव्हते.

संध्याकाळ संपली. सगळे घरी गेले आणि मी सामान आवरू लागलो.

दोन दिवसात मी रत्नागिरीची गाडी पकडायला हिरण्याच्या नव्या रस्त्या वरून निघालो तेव्हा चार मुलं निरोप द्यायला आली तीच. पिंपळ पारापर्यंत येऊन ते परतले.

........

आज माझा यु पी एस् सी चा रिझल्ट होता गेली तीन वर्ष अभ्यासात व कानिटकरांच्या मार्गदर्शनात केलेला अभ्यास किती फळ देणार ते ठरणार होतं. कलेक्टर केव्हाच बदली होऊन वरच्या पोस्टवर मुंबईला वर्षा पूर्वी गेले होते.

रिझल्ट आला. मेरीट मधे होतो. मी आय ए एस् अधिकारी सहज होणार होतो. कानिटकर सरनी छान पार्टी ठेवली. नोकरी करताना माझेही पैसे वाचले होते. मी काही वस्तु गिफ्ट द्यायसाठी घेतल्या.

ट्रेनिंग पुरं करून रीतसर नेमणूक झाली कलेक्टर म्हणून मला गढचिरोलीला पाठवला. आणि सरकारी बाबू झालो. असाच तीन तीन वर्षांनी बदली होत होती. कामाची पद्धत नुसती माहीत पडली नाही तर एक हुशार ऑफिसर म्हणून नाव होत होतं.

एक दिवशी बदलीची ऑर्डर आली. सिंधुदुर्ग जिल्ह्याला बदली झाली होती. रत्नागिरीचे दोन जिल्हे केले होते. दक्षिण भाग सिंधुदुर्ग केला होता. नवीन जिल्ह्याची घडी बसवावी म्हणून माझी नेमणूक झाली होती. मला आनंद झाला. कोकणाच्या रम्य वातावरणात काम करायची मजा येईल वाटलं होतं.

सर्वात आनंद होता तो हिरणं याच जिल्ह्यात येत होतं. कसं असेल हिरणं. सुधारलं असेल का?

आज सिंधुदुर्ग नगरीला पोचलो आणि पहातच बसलो. आखीव रेखीव नगरी वसवली होती. दोन तालुक्यांच्या मधेच होती. एकमेकांना काटकोनात जाणारे रस्ते, एक सारख्या दिसणाऱ्या सरकारी इमारती, सरकारी निवास स्थाने. हा जिल्हा चांगला सुधारला होता पुढचा कारभार माझ्या हाती होता.

चार्ज घेतला आणि भेटीला येणाऱ्यांची रांग लागली. राजकारण्यांचा पहिला मान लावला होता माझ्या चिटणीसानी. दोन्ही बाजूचे राजकारणी येऊन गेले आपण सांगू ते काम करा असा हुकूम वजा सल्ला देऊन गेले. मग मोठे समाजकारणी आले ते त्यांच्या कामाची माहिती देऊन गेले.

पुष्पगुच्छांचा ढीग दोन दिवस होत होता. पण माझं मन कामांच्या सूचना सर्वांना देऊन लवकर मोकळं व्हायला पहात होतं. निवांतपणा शोधत होतं. मला हिरण्याला जायची घाई लागली होती. केव्हा एकदा हिरण्याची झालेली सुधारणा पाहीन असं झालं होतं.

असेच पंधरा एक दिवस गेले. कामाची घडी बसू लागली. मला थोडा निवांतपणा मिळू लागला. चिटणीसाना म्हणालो, "आल्यापासून जराही उसंत नाही मिळाली. एक दोन दिवसाची रजा घ्यायचा विचार आहे. जवळपास कुठेतरी जाईन म्हणतो. कामं पाहून दोन दिवस सांगा कोणते ते."

ते हो म्हणाले. पुढच्या आठवड्यातला शुक्रवार त्यांनी सांगीतला शुक्र, शनी, रवी अशी तीन दिवसाची सलग रजा मिळत होती.

मी हिरण्याला जायचं ठरवलं. कोणालाही कल्पना दिली नाही. घरच्या लोकांनाही नाही. पण हिरण्याला मला कलेक्टर म्हणून रुबाबात जायचं नव्हतं. तसंही अजून मला कोणी फारसं ओळखत नव्हतं.

एकदम जुने कपडे पिशवीत घेतले. दोन दिवस दाढी केली नाही. शुक्रवारी सकाळीच बाहेर पडलो. स्टँडवर एका रिक्षात बसलो. मोठ्या रिक्षा आठ एक माणसांना भरून न्यायची सुरवात झाली होती. रिक्षावाल्याला हिरणं म्हणून सांगीतलं तर म्हणाला, "कणकवलेक सोडतंय थंयसून फुडची रिक्षा गावात. हयसून नाय कोण जायत हिरण्याक" कणकवलीत दुसरी रिक्षा पकडायला गेलो. इथे छोटी तीन पॅसेंजर वाली रिक्षा मिळाली. सौदा केला. हिरण्याला मला एकट्याला न्यायचं आणि परत आणायचं. थोडावेळ त्याने मला निरखलं मग म्हणाला, "चला.! नेतय समजून पैशे देवा.” रस्त्याला लागलो तसं तो विचारू लागला, "हिरण्याचे तुमी? बगीतला नाय कदी. चाकरमानी? केवा इलास मुंबयसून? मीय हिरण्याचो म्हणून इचारतय. कोणाकडे ईलास?"

"तूच सांग मला, तुझं नाव काय?"

"मी मंगो. मंगो कुंबार."

हा मंगेश कुंभार होता तर? "अरे मंगेश! मला ओळखलं नाहीस? मी सायब तुमचा वीस एक वर्षापूर्वी हिरण्याला होतो. आपण रस्ता बनवला, पार कापून रस्ता मोठा केला. आठवतं?."

करकचून ब्रेक लागला. मंग्या खाली उतरला मागे येऊन मला न्याहाळलन मग एकदम पाया पडू लागला. मी त्याला उठवलं. आता संवाद छान सुरू झाला. मंग्या सांगत होता गाव खुशाल झालंय.

"तेल्याचो झील नी गावकराचो झील एशटीत ड्रायवर हत. सगळी गावा फिरतत. पाष्ट्याचा चेडू (मुलगी) शिकला मास्तरणीची परीक्षा दिल्यान नी तालुक्यात शाळेत मास्तर झाला हा. गावात पण ल्हान पोरांका शिकवता. गावात सगळे सुकात हत आता. चार रिक्षो झाल्यो हत. माजी तेतलीच हा. बेंकेन हप्त्यान दिल्लल्यान. हप्ते भरून झाले. आता मी मालक. खावचो पिवचो सुकाळ झालो हा.

सायबानु रस्तो बनवुचा केलास नी गावाक सुखी केलास. पण तुमी एकदम कशे ईलास? खंय असतास आता?"

मंगेश भडाभडा बोलत होता. मागचं सर्व आठवून त्याला ते मला सांगायचं उधाण आलं होतं.

"माझी सरकारी नोकरी फिरतीची. इकडे आलो होतो. मलाही वाटलं हिरणं किती सुधारलं पाहून यावं. माझी पहिली नोकरी होती ती. म्हणून आलोय. तू सांगतोस ते ऐकून फार बरं वाटतंय."

"सायब आता पंचायतीत तलाटी बसता. आंगनवाड़ी पण काडली हा. सगळी ल्हान पोरा आंगनवाडीच्या बायकडे जातत. दुसरी डाक्तर बाय पंधरा दिवसान येता. गावात फिरून महिन्यात जलमलेल्या पोरांका इंजेक्शान लावन जाता. शीक पडू नये म्हणून वो.

तुमी रवास ता पंचायतीचा घर लय मोठा झाला हा. तीन नव्यो ओरड्यो बांदलानी.

तालुक्या सरक्या सगळा गावता गावात. कपडो, कांबळा नी फावडा तगारा असला कायमाय घेवक तालुक्याक जातत लोक. खाली पिली उंडराक पण जातत. आमका गिरायकी गावता. कणकवलेक रोज जातंय. सांजच्याक येताना माशे हाडतय. बापाशीक बरा वाटता. तुमची आठाव काडता मग."

"कसे आहेत तुझे बाबा? आणि बाकीचे लोक?"

"तेका काय धाड भरली हा? वर्सात्सून एकदा नळे पाडून भट्टी लावल्यान काय काम सोपला. मगे कशाक हात लावीत नाय. वायच हवाळी लागता मधसून. दोन दीस झोपता. परत गावात उंडरूक तयार."

मंगेश आता खास मालवणी टेचात सगळं सांगत होता. अस्सल मालवणी कानावर पडत होती. मला सगळं ऐकून बरं वाटत होतं. हिरणं सुधारलं होतं. त्यांना चांगले दिवस आले होते. सुधारणा, सरकारी योजना हिरण्यापर्यंत पोचत होत्या.

"सायब एकच वायट झाला गावात. सुताराचो पांडो कायमचो आत गेलो वो! ठाकराच्या शांतूक डोस्क्यात दगड घातल्यान. जागेर पडलो तो मेलो. मारल्यान म्हणून पोलीस घेवन गेले. कोर्ट चल्ला नी निकाल ईलो जनमटीप. आत गेलो. सुतारान घरदार घाण ठेवन वकीलाक पैशे दिलान. पण गावड्यानी साक्ष बदलली नाय. पांड्यान दगड शांतूच्या डोस्क्यात घातल्यान ता बगलंय म्हणून साक्ष दिल्यानी गावड्यानी. सुतार पाया पड पड पडलो. पण ऐकलानी नाय. म्हणूक लागले असली घाण गावात नुको. गाव भंडत चल्लो हा. आता गावड्यांका गाव ईचारीत नाय. सगळे गुश्शात हत. वायच नाय म्हणाले आसते तर वाचलो असतो पांडो. भांडणात रागान होता कदी कदी. सुताराचो एकच पोरगो. आता सुतार काय करीत?"

ही पहिली वाईट बातमी मला मिळाली होती. रिक्षा घाट उतरून हिरण्याच्या रस्त्याला लागली. पिंपळ दिसत नव्हता. रस्ता छान रूंद झाला होता. डांबरी केला होता.

"खंय घेव? पंचायतीत? तुमी रवास थंय?"

"नाही रे! मला गाव बघायचंय गावातच फिरून चार लोकांना भेटणार आहे. तू सगळी कडे फिरव व मग कणकवलीला नेऊन सोड."

"पुरो दीस फिरतलास? जेवशात खंय? डबो हाडललो तर दिसत नाय. जेवशात आमच्या थंय? सांगून जावया बायलेक?"

"चल तू गावची सुधारणा बघून माझं पोट भरेल. चल."

पिंपळाच्या जागी पार नव्हता. पिंपळ पाडला होता. पार पुरा तोडला होता. लाल मातीच्या गोलाकाराला मधून छेदत रस्ता गेला होता. रिक्षा थांबवली उंच जागेवरून हिरण्याला एकदा पाहावं म्हणून थांबलो. समोरच्या डोंगरावरून उतरणाऱ्या शेत मळयात गवताचं रान झालं होतं. हा तर सप्टेंबर महिना. यावेळी कापलेल्या भात शेतीचे खुंट दिसायला हवे होते, तिथे गवत कसं? नजर खाली खाली फिरत गेली आणि समजलो. सगळी शेती पड होती.

"कुणाची रे समोरची जमीन?”

“ती वरची हा ती गावकरांची. चार भावांची हा. आणि खालची तेलयाची."

"त्यांनी शेती केली नाही या वर्षी? सगळीकडे गवत का उगवलंय?"

"शेती? चार वर्सा झाली. कोणय नांगर धरत नाय. खेका धरतीत. सरकार आमका घहू नी तांदूळ इतके देता तेच उरतत. कोण कशाक नांगर धरीत नी फुकटची म्हेनत करीत."

मला आता एक एक धक्का बसू लागला. गावातल्या लोकांची मेहनत मी बघीतली होती. सराईवर धान्य घरी आलं की चेहेऱ्यावर दिसणारा तृप्ततेचा आनंद मी वाचलाय. या गावानं शेती सोडली खरं नाही वाटत.

"सायब खंय रवलात? कसलो ईचार करतास?"

"अरे गावात कोणीच शेती करत नाहीत मग जमिनीचा उपयोग काय?"

"काय काय लोक जमिनीत काजी, रातांबे, आंबे असली मोठी झाडा लावक लागले हत. एकदा रुजली मगे फळा काडायचाच काम न्हय वो. ईकून रोकडे रुपये गावतत. शेती केली तर आवक वाडात. आवक वाडली तर गरीबाक मिळणारा राशन बंद होयत. कशाक करतीत शेती! पयल्या सरक्या नाय आता. आता ‘रुपायो आसलो तर बापूस आपलो नायतर शेणाचो ठेपलो’ असली गत हा."

तो बोलत होता पण मला घाबरायला होऊ लागलं होतं.

गावात रिक्षा शिरली. वाऱ्याबरोबर एक प्लास्टीकची पिशवी भिरभिरत आली आणि माझ्या चेहऱ्यावर चिकटली. कशीतरी तिला काढली. पण विचार आला. प्लास्टीक आणि हिरण्यात?

हिरणं मी सोडलं तेव्हा एकदम स्वच्छ होतं. नैसर्गिक स्वच्छता होती. पाऊस जोरात पडू लागला की पाण्याचे ओहोळ चालू होत. पहिले काही तास मातकट पाणी रस्त्यावरून वाहे पण तासा दोन तासात काचे सारखं स्वच्छ पाणी रस्त्यावर वाहताना दिसे. सोबत पाला पाचोळा घेऊन जाई.

छोट्या वहाळातून तर पहिल्या दोन दिवसानंतर अगदी स्वच्छ पाणी वाहताना दिसे. कचरा प्लास्टीकच्या पिशव्या मी तरी केव्हाही पाहील्या नव्हत्या. आज सगळं हिरणं कचऱ्याने भरलेलं दिसलं. शेव, चिवडा, शेंगदाण्याच्या प्लास्टीक पॅकींगच्या पिशव्या सगळीकडे विखुरल्या होत्या. पुरं हिरणं फारच सुधारलं होतं. शेती बंद करून रुपये कमवू लागलं होतं. आणि चैनीच्या तयार वस्तु सहजतेने येऊ लागल्या होत्या.

मी अशी सुधारणा कधीच अपेक्षिली नव्हती.

शेवटी गावडें कडे जायचं म्हणालो.

"कशाक जातास थंय! आता गाववाले पण जायत नाय तेंच्याकडे. आता ते सरपंच नाय रवले. आता येडे झाल्लंले दिसतत. गाव सुधारलो तरी ते नी तेंचो धाकू शेती करतत, पयल्या सारकीच. सुदरूचा नाव नाय घेयत."

मंगेशच्या बोलण्यातला अनादर मला बोचला. त्याला जोरात सांगताच तो घेऊन गेला खरा पण थांबला नाही. "फुडे नाक्यार हय मिया. झाला काय हात करा. येयन घेवक" म्हणून तो निघून गेला.

आत गेलो तर गावडे पडवीत जायच्या पायरी वरच बसलेले दिसले. पाया जवळ धाकू बसला होता. माझी चाहूल लागताच म्हणाले,"को रे तो?"

"कोणतरी सायब हत." धाकू म्हणाला. त्यांची नजर कमी झालेली वाटली.

"सायब? आता खयचो सायब येतलो रे हय?"

मी पुढे होऊन म्हणालो, "गावडे! ओळखलं नाहीत? मी पहिला सरकारी माणूस इथे नोकरीला आलो होतो तो. आठवलं?"

काही न बोलता त्यांनी धाकूला माझ्यासाठी खुर्ची आणायला सांगीतलं.

मग त्यांनी धाकूशीच म्हणा की स्वतःशीच म्हणा बोलायला सुरवात केली.

"अरे वळकलंस नाय? पिपळावरच्या आमच्या मुंजाक पळवून लावन ह्यो नवो मुंजो गावावर सोडलो ना ते हे सायब. धाकू हाँ... हाँ..

अरे आमचो मुंजो निसती भीती घाली. कोणाचा नुकसान केला काय रे? कदीच नाय... हाँ

गावात कदी भांडाण होयत काय रे? कदीच नाय. . धाकू--.हाँ

एकमेकाक धरून होता गाव. सगळे शेतात काम करीत सोना पिकईत. आता करतत काय रे? नाय ना? . .धाकू...नाय

शेताचे बांद पक्के होते कोणाची हद कधी बदालली काय रे? नाय ....नाय

आज किती बांद फुडे होतत एका रातीत मग भांडतत. खरा की नाय? ....हाँ

पोरांच्या, चेडवांच्या, बायांच्या आंगार कापडा पुरती नाय होती. तरी कोणी हवस दाकवलल्यान काय रे? नी आज आंगभर कपडे घालतत पण चेडवांकडे बघताना? लाज वाटता रे बोलूक पण.

तरी मी सांगलंलय आमच्या गावात कली येवचो नाय ह्या बगा. आता कली शिवाय दिसता काय रे दुसरा? नाय ना"... नाय.. नाय

मी बसल्या जागी शरमेने विरघळत होतो. ते हे सगळं मला ऐकवत होते. एक शब्दही मी खोडू शकत नव्हतो. माझ्या सुधारणेच्या प्रयत्नांना त्यांनी मुंजा ठरवला होता. तो आज हिरण्यावर राज्य करत होता. त्याचं वाईट करत होता.

त्यांच्या पाच पिढ्यांनी मुंजाची भीती घालून जोपासलेल्या संस्कृतीवर सुधारणेने घाला घातला होता.

"अरे पयले सुकी होतंव. कदी पोलीस ईल्ले काय रे गावात? कदीच नाय.. धाकू..नाय नाय

कदी भांडाण मारामारी आयकलंलस? आता खून पण झालो गावात.... हाँ

पांडो गेलो कायमचो आत. बाप रडता तेचो. पयलो असो कोण रडा काय रे?.... नाय... नाय

ठाकराचो शांतो मेलो एकाच दगडात. पण कित्या ह्या गावाक खंय म्हायत हा. माका खरा म्हायत हा. शांत्यान पांड्याक पकडलान, रानात, तेच्या भयणी बरोबर. राग येतलोच ना? धावन गेलो आंगार पण पांड्यान दगड मारलान. वरमार बसलो. शांतो थंयच गचाकलो. भयणीक वाचवूक गेलो नी मेलो. नाय ते चाळे करता म्हणान ठाकरान चेडवाक घरात्सून भायर काडलान. ह्या सगळा बगणारो मीच रे.

सुतार रड रड रडलो पण पांड्या सारकी घाण गावात नुको, म्हणान कोरटात जरापण हटलंय नाय. पिपळारचो मुंजो माका आजून कानात सांगता कायमाय. ताच मी आयकतंय नी करतंय.

सुदारणेचो मुंजो ईलो तर काय होयत ह्या माका आदीच म्हायत होता. आयकलंस! माज्या आज्याच्या आजान सांगितललान पिपळावरच्या मुंजाक जावक देव नुको. ता माज्या सगळ्या पितरानी पाळला. माज्या

बापाशीन, तेच्या बापाशीन माज्या बापाशीच्या आज्यान सगळयांनी मुंजाक जावक दिला नाय. गाव खुशाल होतो तवसर....नी आज?"

मग त्यांचा आवाज कापरा झाला. बोलले

"मी मुंजाक नाय संबाळू शकलंय. एकदाच मनात ईला. सुदारणा ईली तर बगुया. चांगला होयत. म्हणान एकच सांगलंलय रे सायबांका कली येवचो नाय ह्या बगा. थंयच चुकलंय."

ते बोलायचे बंद झाले. माझ्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. मी त्यांचा अपराधी होतो. त्यांच्या शांत सुखी संस्कृती वरच सुधारणा कोसळली होती. सहज नजर धाकू कडे वळली. धन्याचं दुःख धाकुला सहन होत नव्हतं. त्याच्या नजरेत मला घृणा दिसली.

मी उठलो. पुढे झालो गावडेंच्या पायाला हात लावायला गेलो. त्यांनी पाय मागे घेतले. इतकी घृणा? हा माझा अपमान नव्हता, ही शिक्षा होती.

माझ्यात अपराधीपणाची भावना वेगाने पसरत होती.

मी निघालो खरा पण मनात असंख्य वादळं घेऊन.

मंगेशच्या रिक्षात बसताना एक अपयशाचं, अपराधीपणाचं प्रचंड ओझं मी घेऊन निघालोय या जाणिवेने अस्वस्थ झालो होतो.

ही खंत कायम मनात राहाणार होती.

कलेक्टर म्हणून काम करताना ती नेहमी अडथळा बनणार होती.

संस्कृती सुरक्षित ठेवून सुधारणा करायचा मार्ग मला ठाऊक नव्हता आणि कलेक्टर झालो होतो. सरकारी योजना जशाच्या तशा राबवायच्या होत्या. परीणामांचा विचार न करता, गावच्या परंपरा चाली रीतींचा विचार न करता. आता होईल हे माझ्या हातून?

आता तर जिल्हा "पर्यटन जिल्हा" म्हणून मोठा करायचा होता. वेगवेगळ्या प्रकारचे पर्यटक येणार आणि या संस्कृतीला आणखी ढवळणार, दूषित करणार.

रिक्षा घाट रस्त्याला लागली होती. मनातलं वादळ प्रत्येक वळणावर वेगळंच वळण घेत होतं.

गावडे किती दूरदर्शी होते. अशिक्षित होते पण गावाशी आणि मातीशी घट्ट मिसळले होते. स्वार्थ नव्हता. मुंजाच्या भीतीने त्यांनी गाव बांधलं होतं. आपणही तेच करतो. देवाची भीती असते म्हणून वाईट वागत नाही. मग देव सवयीचा होतो आणि मन भरकटतं. म्हणून गावड्यांच्या आजोबांच्या आजोबानी मुंजा पिंपळावर बसवला असेल?

काहीच समजत नाही. संभ्रम संपत नाहीत. कोणी सांगेल का काय खरं काय खोटं ते?

*समाप्त*

# *हिरणं*

१९७३पासून बडोदा वासी झालो पण गाव विसरलो नाही. आज जवळ जवळ ५० वर्ष होत आली बडोद्यात. गेली वीस वर्षे नित्यनेमाने वर्षातून दोनदा गावी जात असे. होणारे बदल मनाला दुःखी करत. हिरण्यात लिहीलंय तशीच शेती करायची बंद झालेली पाहीली. मालवणी बोलीच्या जागी मराठी बोलायला लागलेल्या गाववाल्यांचा राग यायचा. मी आग्रहाने मालवणीत बोललो तरी ते मराठीत बोलत.

हल्लीच बातमी वाचनात आली. जवळ जवळ १००० बोलीभाषा नजीकच्या काळात नामशेष होणार. बातमी वाचून मला गाव आठवलं. मायबोली "मालवणी" आठवली.

त्या हजारात माझी मालवणी तर नाही? हा विचार स्वस्थ बसू देईना.

लहानपणापासूनचं गाव आठवलं. बदल का आणि कसे होतात ते पाहीले. आणि मनात आलेले संभ्रम "हिरणं" या कथेत आपसूक उतरत गेले.


सरकारने दिलेली मदत ऐतखाऊ प्रजा तर निर्माण करत नाही ना? हा प्रश्न मनात आला. लोकांना काय पाहिजे ते गावाच्या संस्कृतीला धक्का न देता देणं शक्य आहे का? सर्वच जग अशा तऱ्हेनं सुधारलं तर शेतीचं काय?


हे आणि असे कितीतरी प्रश्न मनात उद्भवले. त्यातून हिरणं ही कथा मनात तयार होऊ लागली.


आज कोकणात जातो तेव्हा कोणी मालवणी बोलत नाहीत. का? मी मालवणीत बोललो तरी ते मराठीत बोलू लागतात. का? आज एवढ्या वर्षानंतर कोकणापासून दूर राहून मालवणी मनात जोपासली. मायबोली विसरलो नाही. ती जिवंत रहावी. हेच सारखं मनात येतं. मालवणी लोकांना एकच विनंती. मायभूमी आणि मायबोलीला विसरू नका. या दोन्ही आपल्या माया देवकी आणि यशोदे सारख्या लाभल्यात. मालवणी संपली तर आपली ओळख पण संपेल.

श्री अरूण कुळकर्णी यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके.

कव्हरवर क्लिक करताच उघडतील



















रंगारी


थोडे... हसू... थोडे... आसू


तीन शिल्पकार


इनामदारीण


श्रद्धा संस्कार

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १४ वे वर्ष.
## अरुण कुळकर्णी यांचे ईसाहित्यवर हे बारावे पुस्तक.

कोणाची भरभराट झाली तर वाईट वाटण्याचा आमचा स्वभाव नाही. मराठी माणूस दुसऱ्या राज्यात जाऊन एक छोटा व्यवसाय सुरू करून त्याचे रुपांतर एका भल्या मोठ्या कंपनीत करतो हे पाहून आनंदच व्हायचा. पण अरुण कुळकर्णी सरांबाबत मात्र तसे नाही होत. ते जर असे यशस्वी कारखानदार झाले नसते तर मराठीला एक ए जी कुळकर्णी नावाचा महान लेखक मिळाला असता असे राहून राहून वाटते. अरुण कुळकर्णी खरे तर चित्रकार व्हायचे. त्यांच्या कथा म्हणजे रंगांची उधळण असते. मानवी मनातल्या भावतरंगांचे रंग ते नेमके टिपतात आणि ती ती छटा त्यांच्या शब्दांतून व्यक्त होते. त्यांची कथा वाचक वाचत नाहीत, पहातात. एखाद्या चित्रपटासारखी. पण चित्रपट द्विमितीत असतो आणि अरुण कुळकर्णींच्या कथांना तिसरी मिती असते. त्यांच्या व्यक्ती आपल्या आयुष्याचा भाग होतात. मग ती इनामदारीण असो, तीन शिल्पकारांतले ते ग्रामीण कुटुंब असो की मैत्रबंधांतली इवली मैत्रीण.

अरुण कुळकर्णी यांची पुस्तके नामवंत प्रकाशकांनी छापून प्रसिद्ध केली आहेत. पण त्यांनी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश

नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, २३ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(११), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(११) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२) , मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।